• पुणे, गुरूवार, १७ ऑक्टोबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 307 • वर्ष ३ रे, अंक ३०७ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS



समुत्कर्षची कोथरुड मधील रंगकर्मींना दिवाळी भेट!

P3



शौरेन सोमण याला दुहेरी मुकुट

P12

## At a Glance

### एक हजार ग्रंथालयांना कायमस्वरूपी टाळे


**मुंबई :** गेल्या काही वर्षांत राज्यभरातील सुमारे एक हजार सार्वजनिक ग्रंथालयांवर टाळे ठोकण्याची वेळ आली आहे. ही ग्रंथालये कायमस्वरूपी बंद पडली आहेत. याचे कारण म्हणजे सरकारकडून मिळणारे तुटपुंजे अनुदान आणि अनुदान वेळेवर न मिळणे. राज्यभरातील ग्रंथालये आर्थिक अडचणीत असून, अशीच परिस्थिती राहिली तर राज्यात » पान ७ वर

### ...म्हणून मला तुरुंगात टाकले !



**दिल्ली :** दिल्लीचा विकास रोखण्यासाठी केंद्र सरकारने मला तुरुंगात टाकले, असा आरोप दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी बुधवारी केला. आम आदमी पक्षातर्फे 'जनसंपर्क अभियाना'ला सुरुवात करण्यात आली. यावेळी बोलताना अरविंद केजरीवाल यांनी केंद्र सरकारवर दिल्लीचा विकास थांबवल्याचे आरोप केले. केजरीवालांनी दिल्लीच्या जनतेला खुले पत्र लिहीले आहे, ते पत्र या कार्यक्रमात त्यांनी वाचून दाखवले. त्यांना तुरुंगात का टाकण्यात आले? हे सांगण्यासाठी त्यांनी हे पत्र लिहीले आहे. २९ ऑक्टोबरपर्यंत जनसंपर्क अभियान चालणार आहे. या अभियानात केजरीवालांचे पत्र पक्षाकडून दिल्लीकरांच्या घराघरात पोहोचवले जाणार असल्याचे केजरीवालांनी यावेळी सांगितले.

### इम्रान खानची रवानगी अंधार कोठडीत



**इस्लामाबाद :** पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांची रवानगी कारागृहातील अंधार कोठडीत करण्यात आली आहे. त्यांना आठवड्यातून एकदा आपल्या मुलांशी बोलण्याची परवानगीही नाकारण्यात आली आहे, असा दावा इम्रान खान यांच्या पूर्वाश्रमीच्या पत्नी जेमिमा गोल्डस्मिथ यांनी केला आहे.

## महायुतीचे रिपोर्ट कार्ड सादर ; विरोधक थोडे गडबडलेले

# महायुतीचा मविआवर हल्लाबोल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधानसभा जाहीर होताच महायुतीकडून अडीच वर्षात केलेल्या कामाचा लेखाजोखा बुधवारी प्रकाशित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत महायुतीने एकत्रित पत्रकार परिषद घेत आपले रिपोर्ट कार्ड सादर केले आहे. हे दोन पानांचे रिपोर्ट कार्ड असून या माध्यमातून केलेल्या कामाचा थोडक्यात आढावा सादर करत असल्याचे नेत्यांनी यावेळी सांगितले.

महाविकास आघाडीने तीन दिवसांपूर्वी महायुतीच्या भ्रष्टाचाराचा पंचनामा करणारा रिपोर्ट प्रसिद्ध केला होता, त्याला महायुतीकडून उत्तर देण्यात आल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान,



> आमच्या समोरच्या लोकांनी फेक नरेटिव्ह पसरवण्याचा प्रयत्न केला. आमचे महायुतीचे २०२२ ते २०२४ चे रिपोर्ट कार्ड देत आहोत. काहींनी महायुती सरकारने तिजोरी मोकळी केली असे आरोप केले. शेवटच्या अर्थसंकल्पमध्ये काही तरतुदी केल्यात त्यावर टिंगल टवाळी केली. लाडकी बहीण योजना खूप लोकप्रिय झाली. काहीही बोलायचं आणि जनतेमध्ये संभ्रम पसरवायचं. दोन पानांचे सुटसुटीत हे रिपोर्ट कार्ड काढले आहे. हा बदलाचा अहवाल आहे. आमच्या मेहनतीचा हा लेखाजोखा आहे.
>
> — **अजित पवार** उपमुख्यमंत्री

विरोधकांनी आमची टिंगलटवाळी केली, विरोधक गडबडलेले आहेत, ते घाबरले आहेत असं म्हणणार नाही पण गडबडले आहेत, असं अजित पवार म्हणाले. तर ज्यांचा गृहमंत्रीचं जेलमध्ये गेला त्यांनी आम्हाला कायदा शिकवू नये, असा कडकीचा हल्लाबोल देवेंद्र फडणवीसांनी केला.

यावेळी बोलताना एकनाथ शिंदे यांनी मविआवर जोरदार हल्ला केला. लाडकी बहीण योजनेसाठी आमचं टार्गेट २ कोटी ५० लाख » पान ७ वर



### शेतकऱ्यांना ३६५ दिवस वीज

● महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. शेती वीजेसाठी स्वतंत्र शेतकरी वीज कंपनी स्थापन केली. १४ हजार मेगावॅट वीज निर्मितीचं काम सुरू केले. येत्या १५ ते १८ महिन्यात पूर्ण काम होईल. त्यानंतर राज्यातील शेतकऱ्यांना ३६५ दिवस वीज देऊ. ही घोषणा नाही. प्रत्यक्ष काम सुरू केले आहे. आता साडे आठ रुपयाची वीज तीन रुपयांना पडणार आहे. १० हजार कोटी बजेट आणि पाच हजार कोटी क्रॉस सबसिडीचे आम्ही वाचवणार आहोत. त्याआधारे शेतकऱ्यांना मोफत वीजेची योजना आहे. प्रिंटिंग मिस्टेक घोषणा नाही. हा वेल थॉट म्हणजे विचारपूर्वक निर्णय घेतला आहे. अनेक वर्ष तो चालणार आहे. विजेच्या बाबतीत शेतकऱ्यांना चिंता मुक्त करण्याचं काम आपण केले असल्याचे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## प्रियंका गांधी निवडणुकीच्या रिंगणात


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** केरळच्या वायनाड लोकसभा मतदारसंघातून प्रियांका गांधी वाड्रा, तर केरळमधील पलक्कड विधानसभा मतदारसंघातून राहुल ममकुटाथिल आणि चेलक्कारा (अनुसूचित जाती) मधून रम्या हरिदास यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. काँग्रेसच्या महासचिव प्रियंका गांधी यांनी अखेर संसदीय राजकारणात पाऊल ठेवलं आहे. काँग्रेसने वायनाड लोकसभा मतदारसंघातून प्रियंका गांधी यांना मैदानात उतरले आहे. वायनाड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीची निवडणूक आयोगाने घोषणा केल्यानंतर काँग्रेसने प्रियांका गांधी वाड्रा यांच्या उमेदवारीची अधिकृत घोषणा केली आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केरळमधील लोकसभा आणि विधानसभा पोटनिवडणुकीसाठी सदस्यांना पक्षाने मंजुरी दिली आहे.

# गहू, हरभऱ्यासह सहा पिकांच्या हमीभावात वाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ केल्यानंतर आता केंद्रातील मोदी सरकारने शेतकऱ्यांना दिवाळी भेट दिली आहे. सरकारनं २०२५-२६ च्या रबी हंगामासाठी ६ पिकांच्या हमीभावात वाढ केली आहे.

या निर्णयामुळे शेतकऱ्यांच्या पिकाला चांगला भाव मिळणार असून कृषी क्षेत्राला चालना मिळणार आहे. वाढीव हमीभाव मिळालेल्या पिकांमध्ये गहू, जवस, हरभरा, मसूर, मोहरी आणि केसर यांचा समावेश आहे.

» दिवाळी भेट

**रुपये प्रति क्विंटल दर**

- जवस : १९८० रुपये प्रति क्विंटल (पूर्वी १८५० रुपये)
- हरभरा : ५६५० रुपये प्रति क्विंटल (पूर्वी ५४४० रुपये)
- डाळ : ६७०० रुपये प्रति क्विंटल (पूर्वी ६४२५ रुपये)
- मोहरी: ५९५० रुपये प्रति क्विंटल (पूर्वी ५६५० रुपये)
- केसर : ५९४० रुपये प्रति क्विंटल (पूर्वी ५८०० रुपये)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत यावर निर्णय घेण्यात आला. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळातील निर्णयांची माहिती दिली.

गव्हाची किमान आधारभूत किंमत प्रतिक्विंटल १५० रुपयांनी वाढवून २,२७५ रुपयांवरून २,४२५ रुपये करण्यात आली आहे. मोहरीचा हमीभाव ३०० रुपयांनी वाढवून ५,९५० रुपये आणि हरभऱ्याचा हमीभाव २१० रुपयांनी वाढवून ५,६५० रुपये करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे जवस, मसूर आणि केसराचा हमीभाव देखील अनुक्रमे १,९८० रुपये, ६,७०० रुपये आणि ५,९४० रुपये प्रति क्विंटल करण्यात आला आहे.



## 'रासप' चा स्वबळाचा नारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यातील विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून येत्या २० नोव्हेंबर रोजी राज्यात मतदान पार पडणार आहे. यादरम्यान महायुती सरकारला मोठा धक्का बसला आहे. राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर हे महायुतीतून बाहेर पडले आहेत. इतकेच नाही तर ते आगामी विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवणार आहेत. राज्यातील विधानसभा निवडणुकांची तारीख निवडणूक आयोगाने मंगळवारी रोजी जाहीर केली.

## विधानसभा लढवणार आणि जिंकणार - राज ठाकरे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधानसभा निवडणुकांची घोषणा होताच मनसेच्या बैठकांचे सत्र सुरू झाले आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ या निवासस्थानी एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीनंतर राज यांनी पत्रकार परिषद घेत विजयाचा निर्धार व्यक्त केला. पत्रकारांशी बोलताना राज म्हणाले की, विधानसभा निवडणुका लढवणार आणि जोरात लढवणार आहे. माझ्या सभेत सहज म्हणून किंवा कार्यकर्त्यांचा, सहकाऱ्यांचा उत्साह वाढावा म्हणून काही बोललो नाही. विधानसभा निवडणुका आम्ही जिंकू आणि सत्ता आणू.

» राजकारण

महायुती सोबत जाण्याच्या प्रस्तावावर बोलताना राज म्हणाले, की जर-तरची चर्चा करत नाही. मी माझ्या



सभेत बोललो ते बोललो आहे. टोलमाफीसाठी आमचीच मागणी होती. खूप पूर्वीपासून आम्ही ही मागणी करत होतो. टोलमुळे आपली फसवणूक होते हा मुद्दाच आम्ही मांडला. टोलमाफी झाली. यामुळे मी सरकारचे आभार मानतो. उशिरा का होईना त्यांना या गोष्टी समजल्या. मला काळजी फक्त एकाच गोष्टीची आहे, ती म्हणजे निवडणुकीच्या तोंडावर टोल नाके बंद करायचे आणि निवडणुकीनंतर पुन्हा सुरु करायचे हे चालणार नाही. यापूर्वी अशा गोष्टी घडलेल्या आहेत. अनेकांनी शब्द दिला टोलनाके बंद करतो. सरकारने निर्णय घेतला त्याचे लोकांना समाधान आहे.

# पुणे शहरासाठी १ हजार नव्या ई-बसचा प्रस्ताव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे शहरात मेट्रोचे जाळे विस्तारत असताना पीएमपीएमएलचं सक्षमीकरण करण्यावर आपला भर असून पीएमपीएमएलसाठी मोदी सरकारच्या माध्यमातून १ हजार नव्या ई-बस मिळाव्यात, या संदर्भातील प्रस्ताव केंद्रीय अवजड उद्योग मंत्री मा.श्री. एचडी कुमारस्वामी जी यांना दिला. शिवाय या प्रस्तावासंदर्भात पुणे शहरातील बसेसची आताची संख्या, आवश्यकता आणि भविष्यातील गरज, यासंदर्भात चर्चा केली.

यावर मा. मंत्रीमहोदयांनी आपल्या प्रस्तावावर कार्यवाही आणि प्रक्रिया करण्याचे निर्देशही अधिकाऱ्यांना दिले आहेत.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार २०१४ साली देशात आणि मा. देवेंद्रजींचे सरकार राज्यात आल्यानंतर पुणे शहराचा सर्वांगीण आणि नियोजनबद्ध विकास व्हायला सुरुवात झाली.

मा. मोदीजींच्या नेतृत्वात सार्वजनिक वाहतूक सक्षम करण्यासाठी पुणे मेट्रोची मुहूर्तमेढ रोवली गेली. त्यानंतर वनाज ते रामवाडी आणि पीसीएमसी ते स्वारगेट हे ३३ किलोमीटरचे दोन मार्ग १००% कार्यान्वित करत » पान ७ वर

# ओमर अब्दुल्ला यांनी घेतली मुख्यमंत्रिपदाची शपथ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**श्रीनगर :** जम्मू आणि काश्मीरच्या मुख्यमंत्रिपदी ओमर अब्दुल्ला यांनी शपथ घेतली. नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या शपथविधी सोहळ्यावेळी काँग्रेस खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्रियंका गांधी, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव आणि 'इंडिया' आघाडीचे इतर नेते उपस्थित होते.

कलम ३७० रद्द केल्यानंतर जम्मू- काश्मीरमध्ये झालेल्या पहिल्या विधानसभा निवडणुकीत 'नॅशनल कॉन्फरन्स' पक्षाला यश मिळाले. केंद्रशासित प्रदेश बनल्यानंतर ओमर अब्दुल्ला हे जम्मू- काश्मीरचे पहिले मुख्यमंत्री बनले आहेत. आज शेर-ए-काश्मीर इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर येथे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला आणि त्यांच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा पार पडला. 'नॅशनल कॉन्फरन्स'चे नेते सुरिंदर कुमार चौधरी यांनी जम्मू-काश्मीरचे उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. 'नॅशनल कॉन्फरन्स'चे नेते सकिना इट्टू, जावेद अहमद राणा, जावेद अहमद दार आणि अपक्ष आमदार सतीश शर्मा यांनी कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतली.

दरम्यान, नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेसने मिळून ही निवडणूक लढवली होती; पण काँग्रेस नवीन जम्मू आणि



काश्मीर सरकारमध्ये सहभागी झालेले नाही. काँग्रेसने नवीन सरकारमध्ये एका मंत्रिपदाची ऑफर नाकारली आहे. जम्मू आणि काश्मीर प्रदेश काँग्रेस समितीचे प्रमुख तारिक हमीद कारा यांनी पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांनी काल सांगितले, की काँग्रेस पक्ष सध्यातरी जम्मू आणि काश्मीर सरकारमध्ये सहभाग होणार नाही. काँग्रेसने केंद्र सरकारकडे जम्मू आणि काश्मीरला संपूर्ण राज्याचा » पान ७ वर

## शासकीय कर्मचाऱ्यांची दिवाळी होणार धुमधडाक्यात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने दिवाळीआधी शासकीय कर्मचाऱ्यांना मोठे गिफ्ट दिले आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी महागाई भत्ता (डीए) वाढवण्याच्या निर्णयाला केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. का मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत अनेक महत्वाचे निर्णय घेण्यात आले. याचवेळी शासकीय कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता वाढण्यासंदर्भातील निर्णय घेण्यात आला. त्यामुळे यंदा लाखो शासकीय कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली काल केंद्रीय मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली. यावेळी देशातील काही महत्वाच्या » पान ७ वर

## भाजप अध्यक्षाची निवड डिसेंबरअखेर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भाजपने संघटनात्मक निवडणुकीसाठी संघ जाहीर केला आहे. राज्यसभा खासदार के. लक्ष्मण यांना राष्ट्रीय निवडणूक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. ही टीम राष्ट्रीय अध्यक्षांची निवडणूक प्रक्रिया पार पाडणार आहे. भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवडणूक डिसेंबरमध्ये होणार आहे. त्याची सुरुवात सदस्यत्व मोहिमेपासून झाली आहे. » पान ७ वर

## काँग्रेसने संधी दिल्यास जनतेचे विकासाचे स्वप्न पूर्ण करु !

# परिवर्तनासाठी जनता सज्ज - मनिष आनंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेल्या दहा वर्षांपासून भाजपच्या ताब्यात असलेल्या शिवाजीनगर विधानसभा मतदार संघात मूलभूत सोयीसुविधांचा बोजवारा उडाला आहे. जनतेनं मोठ्या विश्वासानं दोनवेळा भाजपच्या हातात सत्ता दिली मात्र भ्रष्ट नेत्यांनी या मतदार संघाचं अक्षरश: वाटोळे केले आहे. निष्क्रिय आणि अकार्यक्षम लोकप्रतिनिधींमुळे हा मतदारसंघ विकासाच्या बाबतीत खूप मागे पडला आहे, अशी खंत मनिष आनंद यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केली.

आता विधानसभा निवडणूक जवळ आली आहे. पाच वर्षे गायब असलेले आमदार पुन्हा आता प्रकट होतील आणि नेहमीप्रमाणेच आश्वासनांचा पाऊस पाडतील. मतदारांना आमिषं दाखवतील. पण जनता सुज्ञ आहे.

मतदारराजा पुन्हा पुन्हा अशी चूक कधीच करणार नाही, याची मला खात्री आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मनिष आनंद हे




शिवाजीनगर मतदार संघात काँग्रेसकडून निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत. आज शिवाजीनगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी पत्रकारांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना सविस्तर उत्तरे दिली.

मनिष आनंद म्हणाले की,शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातील समस्यांची मला जाण आहे. खडकी छावणी परिषदेचा सदस्य म्हणून १२ वर्षे काम पाहिले आहे. तसेच उपाध्यक्ष म्हणून ६ वर्षांचा अनुभव आहे. याशिवाय पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचा उपाध्यक्ष म्हणूनही काम पाहिले आहे. तसेच स्व. सुरेंद्र आनंद मेमोरिअल फाउंडेशनच्या माध्यमातून अनेक समाजपयोगी कामे करत आहे. सर्वसामान्यांमध्ये जाऊन काम करणारा नेता म्हणून लोकांशी नाळ जुळलेली असल्याचेही मनिष आनंद यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, गेल्या १० वर्षांत शिवाजीनगर मतदारसंघातील नागरी प्रश्न » पान ७ वर

## प्रशांत जोशी यांना पीएचडी प्रदान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पंढरपूर :** पंढरपूरातील सुप्रसिद्ध ब्राह्मण पुरोहित प्रशांत दिलीप जोशी यांना विवाह योग आणि वैवाहिक समस्या या विषयावर लिहिलेल्या प्रबंधाला पीएचडी पदवी मिळाली असून उद्या महाराष्ट्रातील ज्योतीषाचार्य व विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सदस्य श्री. घैसास गुरुजी व खा. मेधाताई कुलकर्णी यांच्या हस्ते देण्यात येणार आहे. अंत्यंत प्रतिकुल परिस्थितीत वेदविद्या आणि पोरोहित्य शिक्षण घेतलेल्या जोशी गुरुजींनी नवीन तंत्रज्ञानाच्या आधारावर परदेशात अनेक » पान ७ वर

## ३२ गावांची थकबाकी व दंडाच्या रकमेच्या वसुलीला स्थगिती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेत २०१७ मध्ये ११ गावे तर २०२१ मध्ये २३ गावे अशी ३४ गावे समाविष्ट झाली आहेत. त्यातील फुरसुंगी आणि उरुळी देवाची ही दोन गावे वगळण्यात आल्याने सध्या ३२ गावे महापालिकेत आहेत. दरम्यान, ग्रामपंचायतीच्या तुलनेत महापालिकेचा कर अव्वाच्या सव्वा झाल्याने येथील नागरिकांना लाखो रुपयांचा कर भरावा लागणार आहे.



महापालिकेकडून रस्ता, पाणी, सांडपाणी, वीज आदी सुविधा मिळत नसताना कर जास्त घेतला जात असल्याने या गावांमधील नागरिक संतप्त आहेत. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत पुढील आदेश येईपर्यंत थकबाकी व दंडाच्या रकमेच्या वसुलीला स्थगिती देण्यात आली.

त्यानंतर आता विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याच्या अवघे काही तास आधी सुधारित आदेश काढण्यात आला आहे.

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर होण्याच्या दिवशी राज्य सरकारने पुणे महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३२ गावांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. » पान ७ वर

## पंपचालकांच्या आंदोलनाचा फटका

# पेट्रोल, डिझेलच्या तुटवड्याची शक्यता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** पेट्रोल डिलर्स असोसिएशन पुणेने पेट्रोल आणि डिझेलची वाहतूक बेमुदत बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. यात पुणे, पिंपरी-चिंचवड आणि ग्रामीण भागातील ९०० पंपचालक तसेच सातारा जिल्ह्यातील ५०० पंपचालक सहभागी झाले आहेत. पेट्रोलियम कंपन्यांकडून मागण्या मान्य होत नसल्याने पुण्यातील पेट्रोल पंपचालकांनी मंगळवारपासून आंदोलन सुरू केले. पंपचालकांनी पेट्रोलियम कंपन्यांच्या डेपोवर इंधन भरण्यासाठी त्यांचे टँकर पाठविणे बंद केले आहे. यामुळे पंपावर पेट्रोल, डिझेलचा तुटवडा भासू लागला असून, इंधन टंचाईचे सावट निर्माण झाले आहे.

पेट्रोलियम कंपन्यांच्या डेपोवरून इंधनाची वाहतूक करणाऱ्या टँकरमध्ये ८५ टक्के पंपचालकांचे तर १५ टक्के खासगी वाहतूकदारांचे आहेत. या बंदमुळे पंपचालकांनी इंधन वाहतुकीसाठी टँकर पाठविणे बंद केले आहे. यामुळे इंधन पुरवठा विस्कळीत झाला असून, शहरात रात्री अनेक पंपांवरील इंधन साठा संपला. उद्या पुरवठा सुरळीत न झाल्यास इतर पंपांवरील इंधन साठा संपून शहरात इंधन टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे.

> पेट्रोलियम कंपन्यांसोबत सोमवारी झालेल्या चर्चेतून कोणताही तोडगा निघाला नव्हता. त्यानंतर मंगळवारी या कंपन्यांकडून चर्चेचे पाऊल उचलण्यात आले नाही. आम्ही आमच्या मागण्यांवर ठाम आहोत. इंधन टंचाईमुळे नागरिकांची गैरसोय झाल्यास पेट्रोलियम कंपन्या जबाबदार असतील."
> — **ध्रुव रुपारेल,** अध्यक्ष, पेट्रोल डिलर्स असोसिएशन पुणे

यावाबत असोसिएशनचे अध्यक्ष ध्रुव रुपारेल म्हणाले की, इंधन वाहतुकीसाठी पेट्रोलियम कंपन्यांकडून चुकीच्या पद्धतीने निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. अव्यवहार्य दराने निविदा काढल्या जातात. सर्व भागधारकांना विचारात न घेता पेट्रोलियम कंपन्या पावले उचलत आहेत. यामुळे इंधनाच्या सुरक्षित वाहतुकीला हरताळ फासला जात असून, सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण होत आहे. पेट्रोलियम मंत्रालय, स्थानिक प्रशासन आणि पेट्रोलियम कंपन्यांना आंदोलनाची सूचना दिली होती. त्यामुळे जनतेची गैरसोय टाळण्यासाठी पेट्रोल आणि डिझेल पंपांवर योग्य प्रमाणात आणि वेळेवर पोहोचविण्याची जबाबदारी पेट्रोलियम कंपन्यांची आहे.

### पेट्रोल पंपचालकांच्या मागण्या

- इंधन वाहतुकीच्या सर्व निविदा त्वरित रद्द कराव्यात.
- सुरक्षित वाहतुकीसाठी व्यवहार्य दरांसह नवीन निविदा काढाव्यात.
- सुरक्षेकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांचे तत्काळ निलंबन करावे.
- इंधन चोरीतील या अधिकाऱ्यांच्या सहभागाचीही पोलीस चौकशी व्हावी.

इंधन चोरी थांबविण्यासाठी पावले उचलण्याची मागणी असोसिएशनने वारंवार पेट्रोलियम कंपन्यांकडे केली होती. तरीही या दृष्टीने कोणत्याही उपाययोजना झालेल्या नाहीत. यामुळे गेल्या दोन वर्षांत इंधन चोरीच्या १० घटनांची नोंद झाली आहे. अशाच इंधन चोरीच्या प्रकरणात पोलिसांनी एक महिन्यापूर्वी मोक्काअंतर्गत कारवाई केली. पेट्रोलियम कंपन्यांकडून चोरी होऊ नये यासाठी मोठा खर्च करून अत्याधुनिक यंत्रणा बसविण्यात आली आहे. अधिकाऱ्यांकडून या यंत्रणेकडे दुर्लक्ष झाल्याने या चोऱ्या होत आहेत, असे रुपारेल यांनी सांगितले.

## बोपदेव अत्याचार प्रकरणी आरोपीचे कपडे जप्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बोपदेव घाट सामूहिक लैंगिक अत्याचाराची घटना घडली ते ठिकाण आरोपीने पोलिसांना दाखवले. या प्रकरणी धाक दाखवण्यासाठी आरोपीकडून वापरले गेलेले दांडके आणि कपडे जप्त करण्यात आले आहेत. अटकेत असलेल्या आरोपीने मुलगी आणि त्याच्या मित्राला धमकावण्यासाठी वापरलेले दांडके व त्याचे कपडे पोलिसांनी जप्त केले आहेत. चंद्रकुमार कनोजिया असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या गुन्ह्यातील मुख्य सूत्रधार अख्तर शेख याला उत्तर प्रदेशमधून ताब्यात घेतले आहे; मात्र त्याला अद्याप न्यायालयात हजर करण्यात आलेले नाही. पुणे पोलिसांकडून आणखी एका आरोपीचा शोध अद्याप सुरूच आहे.

सामूहिक अत्याचार प्रकरणात दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, पसार झालेल्या तिसऱ्या आरोपीचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे. सामूहिक बलात्कार प्रकरणातील आरोपींचा पोलिस सर्वत्र तपास करत होते.

» Selected

## प्रसाद ओक, मंदार आगाशे यांना युवा कलाकार व युवा उद्योजक पुरस्कार



**पुणे :** शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन महाराष्ट्रीय ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचा उपक्रम असलेल्या याज्ञवल्क्य उद्योजक विकास अभियान (युवा) च्या वर्धापनदिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोहळ्यांतर्गत वितरित होणारे सृजन आर्ट गॅलरी पुरस्कृत सृजन युवा कलाकार पुरस्कार व स्व. चंद्रकांत जोशी स्मृतिप्रित्यर्थ युवा उद्योजक पुरस्कार अनुक्रमे लोकप्रिय सुप्रसिद्ध अभिनेता दिग्दर्शक व निर्माता प्रसाद ओक आणि सर्वत्र टेक्नॉलॉजीज प्रा. लि. चे संस्थापक, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मंदार आगाशे यांना प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेचे कार्याध्यक्ष विश्राम कुलकर्णी व कार्यवाह श्रीकांत जोशी यांनी पत्रकार परिषदेत दिली. पत्रकार परिषदेला संस्थेचे उपेंद्र केळकर, सचिन पंडित, चैतन्य सराफ, अपूर्वा देवगावकर, मंजुषा वैद्य,अजय कुलकर्णी, आशिष कुलकर्णी, आशिष भावे आदी उपस्थित होते. टिळक स्मारक मंदिर येथे शनिवार, दिनांक १९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष मिलिंद काळे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे. यावेळी संस्थेच्या युवा महिला अध्यक्ष व खासदार प्रा.डॉ. मेधा कुलकर्णी या देखील उपस्थित राहणार आहेत. सन्मानचिन्ह, मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे. यापूर्वी युवा कलाकार पुरस्कार स्वप्नील जोशी, मनोज जोशी, बेला शेंडे, संदीप खरे, संकर्षण क-हाडे आदींना देण्यात आला आहे.

## महाराष्ट्र चित्पावन संघाच्या वतीने योगेश्वरी पुरस्कार जाहीर

**पुणे :** महाराष्ट्र चित्पावन संघाच्या वतीने देण्यात येणारा योगेश्वरी पुरस्कार यावर्षी प्रसिद्ध व्याख्यात्या डॉ धनश्री लेले यांना जाहीर करण्यात आला आहे. संघाच्या वतीने देण्यात येणाऱ्या पुरस्काराचे हे पहिलेच वर्ष असून येत्या शनिवार दि २६ ऑक्टोबर रोजी सायं ५ वाजता टिळक स्मारक मंदिर येथे सदर पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र चित्पावन संघाच्या कार्यवाह सुप्रिया दामले यांनी दिली. राज्यातील सुप्रसिद्ध पु. ना. गाडगीळ पेढीच्या वैशालीताई गाडगीळ यांच्या हस्ते सदर पुरस्कार डॉ लेले यांना प्रदान करण्यात येईल. रु ११ हजारचा धनादेश, श्री योगेश्वरी देवीचा टाक असलेली फ्रेम व महावस्त्र असे या पुरस्काराचे स्वरूप असणार आहे, असेही दामले यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात कोजागिरी पौर्णिमेनिमित्त 'मानवंदना' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

## विद्यार्थ्यांना साहित्यिक पुस्तके भेट देवून वाचन प्रेरणा दिन साजरा



**पुणे :** वाचन संस्कृती संवर्धन अभियानाच्या माध्यमातून डॉ.ऐ.पि. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो, त्या निमित्ताने स्वांनंद विद्यालयात विद्यार्थ्यांना साहित्यिक पुस्तके भेट देवून देण्यात आली. आश्विन शिंदे यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते. त्या निमित्ताने विद्यार्थ्यांसोबत संवाद साधताना काही प्रश्न विचारले असता ते ज्या शाळेत शिकतात त्या संस्थेचे संस्थापक कोण आहेत हे विद्यार्थ्यांना माहीत होते, तसेच आपल्या आजुबाजूला कोणत्या शिक्षण संस्था आहेत हे ही मुलांनी तात्काळ सांगितले.परीसरातील काही साहीत्यीकांची नावेही मुलांना माहीत होती. या उपक्रमाचा हेतू विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची गोडी निर्माण व्हावी आणि वाचन संस्कृती वृद्धिंगत व्हावी असा आहे पण मुलं मात्र त्यात आपल्या अपेक्षे पेक्षा सरस आहेत हे त्यांच्या सोबत संवाद साधताना दिसून येत होते. मुलांना पुस्तके उपलब्ध करून दिली तर ते नक्की वाचतात याची अनुभूती या निमित्ताने आली. पस्तकांचे किंवा वृत्तपत्रांचे वाचन करताना वेगवेगळी सदर, अग्रलेख आदिंचे आवर्जून वाचन वाढविण्याचा सल्ला आश्विन शिंदे यांनी दिला. कार्यक्रमाला शाळेच्या मुख्याध्यापिका श्रृती मनोरे आणि प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक प्रशांत पोकळे उपस्थीत होते.

राष्ट्रसंचार बेकायदा फ्लेक्स रा

## आचारसंहिता जाहीर झाली तरी आम्हाला नाय फरक

### नेत्यांचे जाहिरात फलक 'जैसे थे'

**पुणे :** विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर झाल्यानंतरही शहरातील विविध रस्त्यांवर आणि चौकांमध्ये लावण्यात आलेले राजकीय पक्षांच्या नेत्यांचे जाहिरात फलक 'जैसे थे' आहेत. आचारसंहिता जाहीर झाल्यानंतर तरी महापालिकेच्या आकाशचिन्ह विभागाला शहरभर लावण्यात आलेले हे बेकायदा फ्लेक्स काढण्यास कधी मुहूर्त मिळणार? असा सवाल आता नागरिकच उपस्थित करत आहेत. विधानसभा निवडणुकांच्या घोषणेनंतर महापालिकेकडून शहरात तत्काळ सर्वत्र लागलेल्या राजकीय जाहिराती काढणे अपेक्षित होते. पण, अनधिकृत फ्लेक्स चौकाचौकात उभे असल्याचे रात्री उशिरापर्यंत दिसून आले. त्यामुळे महापालिकेच्या आकाशचिन्ह आणि परवाना विभागाची प्रशासकीय अनास्था समोर आली आहे.

महापालिका आयुक्तांनी स्वत: याबाबत दोन दिवसांपूर्वी लेखी आदेश दिले होते. त्यानंतरही ही कारवाई होत नसल्याने अतिरिक्त आयुक्तांनी पुन्हा एकदा याबाबत आदेश दिले आहे. दोन दिवसांच्या आत शहरातील सर्व जाहिराती काढण्याचे आदेश संबधित विभागास दिले आहेत. शहरातील सर्वच विधानसभा मतदारसंघांत इच्छुकांची रांग असून त्यांच्याकडून दावेदारी करण्यासाठी मतदारसंघात बोर्ड, फ्लेक्स, जाहिराती लावण्यात आल्या आहेत. हे फ्लेक्स अनधिकृत असूनही त्यावर कारवाई करण्यात येत नव्हती.

असे असतानाच जिल्हाधिकाऱ्यांनीही महापालिकेस पत्र पाठवित निवडणुकांच्या घोषणेची शक्यता असल्याने तत्काळ असे जाहिरात फलक काढण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार मनपा आयुक्तांनीही लेखी आदेश काढले होते. मात्र, त्यानंतरही हे फलक शहरात कायम असून आता निवडणूकांची घोषणा झाली तरी महापालिकेचा आकाशचिन्ह विभाग सुस्तावलेला दिसून आले.

> गुरुवारी दुपारपर्यंत शहरातील सर्व राजकीय व अन्य जाहिरातीचे फ्लेक्स काढून टाकले जातील. त्याबाबत उपायुक्तांना सूचना देण्यात आली आहे."
> – **पृथ्वीराज बी.पी.,** अतिरिक्त आयुक्त, मनपा



## मुलाखती...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा





### यू एस डीच्या रोजगार मेळाव्यात तरुणांच्या मुलाखती

# माफक व मोफत कौशल्यविकास प्रशिक्षण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** युनिक एज्युकेशन सोसायटीचे युनिक स्किल डेव्हलोपमेंट सेंटर यांच्या माध्यमातून शेठ हिरालाल सराफ मोती चौक येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात जवळ जवळ दोनशे तरुण तरुणीनीं रोजगार मिळवण्यासाठी मुलाखती दिल्या. युनिक स्किल डेव्हलोपमेंट सेंटर हे नेहमीच कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यासाठी पुढे आहे. कुशल मनुष्य निर्मिती करुन त्यांना रोजगार स्वयंरोजगार देण्याचे काम संस्था गेले दहा वर्ष झाली करत आहे. अजुनही भविष्यात लाखो तरुण तरुनींना स्वयंरोजगार व रोजगारसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यासाठी कटीबद्ध आहे. या मेळाव्यात गोडसे इंटरप्राइजेस, असक्युअर, प्रॅडिगम, फिट कंपनी, इनरीच, अट्स्पिअर, गोदरेज, डी प्रोजेक्ट अन सोल्युशन, कुलिंग अन कॉमफरट, हजबूस्टिंग, शुभम बीज फॅसिलिटी मॅन प्रा. ली., बजाज, डिजिटल बारकोड, स्क्युअर कॉम्प्युटर, ग्रीन आयटी, एम एच आर इन्फॉटेक, हार्डवेअर, इन्टेन्स टेकनॉलॉजि, टेलिफोन, सॅमसंग मोबाईल, अस्तु क्रेटिव्हस, टोरनाडो ग्राफिक्स अन ब्रॅण्डिंग, अश्या अन्य कंपन्यांनी सहभाग नोंदवला होता. या रोजगार मेळावा वेळी युनिक स्किल डेव्हलोपमेंट सेंटरचे संस्थापक संचालक, विजय कुलकर्णी, संस्थापक संचालक बाळासाहेब झरेकर, सी एस आर हेड मुक्ता खासनीस, श्रीराम देशपांडे, सुगंधा टेकाळे, प्लेसमेंट ऑफिसर शरयू पाटील, मार्केटिंग हेड अनिल टेकाळे, प्रकल्प समन्वयक विशाल सातपुते, ऋचा राऊत, कौशल्य प्रशिक्षक चंद्रकांत सोनवणे, निशिगंध अहिरे, तेजस फरांदे, सुजय पवार, हर्षदा मानमोडे, राजेश कुऱ्हाडे, समुपदेशक धरती कुलुंगे, कार्यालय सहाय्यक स्वाती गायकवाड, कृष्णा वडमारे , आदी उपस्थित होते.

### विविध कोर्स उपलब्ध

- समाजातील विशेषत: वंचित, गरीब तरुण आणि महिलांसाठी तसेच शहरी भागातील झोपडपट्ट्या आणि ग्रामीण भागात महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्याच्या ठिकाणी कौशल्य केंद्र उभारून अश्या केंद्रात इलेक्ट्रिशियन, एसी अँण्ड रेफ्रिजरेशन मेकॅनिक, कॉम्प्युटर हार्डवेअर अँण्ड नेटवर्किंग, मोबाईल फोन रिपेअर टेक्निशियन, पीसीबी अँण्ड हार्नेस असेम्ब्ली ऑपरेटर, अकाऊंटिंग अँण्ड टॅक्सेशन, डेटा एंट्री ऑपरेटर, ग्राफिक्स डिझाईनिंग, वेबसाईट डिझाईनिंग, टुडी व थ्रीडी ॲनिमेशन, फॅशन डिझाईनिंग, ऑपरेशन थिएटर टेक्निशियन, रेडीओलॉजी टेक्निशियन, अश्या विविध कोर्सेस चे माफत व मोफत कौशल्य विकास प्रशिक्षण दिले जात आहे.

### सिंहगड टेक्निकल एजुकेशन सोसायटीच्या इंडक्शनमध्ये

# विविध कार्यशाळांचा समावेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**वडगाव :** भारत सरकारचे वस्त्रोद्योग मंत्रालय आणि सिंहगड टेक्निकल एजुकेशन सोसायटी च्या श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ आर्किटेक्चर पुणे येथे (CDAP) कार्यक्रम आयोजित आला होता. हा कार्यक्रम वडगाव शाखेच्या वतीने आर्किटेक्चरच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी १० दिवसीय कार्यशाळा कम इंडक्शन अशा स्वरूपाचा होता. भारतातील विविध भौगोलिक पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांचे पुणे शहरात सुरळीत समावेश होण्यासाठी हा कार्यक्रम आखडण्यात आला होता.

यापुढे विद्यार्थी पुणे शहरात आणि STES कॅम्पसमध्ये ५ वर्षांचे आर्किटेक्चरल शिक्षण घेतले जाईल. कार्यशाळेत सहभागी झालेले सर्व विद्यार्थी १२ विज्ञान पार्श्वभूमीचे होते आणि त्यांना पुणे शहर, सिंहगड कॉलेजचा परिसर, सुविधा, कलावास्तू कला क्षेत्राची पद्धतशीरपणे ओळख करून देण्यात आली. १० दिवसांच्या कार्यकाळा आणि इंडक्शन प्रोग्राम मध्ये - क्रिएटिव्ह ॲब्स्ट्रॅक्ट फेस मेकिंग सारख्या विविध कार्य शाळांचा समावेश होता.

- परिचय (स्लॅम बुक) ने विद्यार्थ्यांना सांस्कृतिक मूल्ये, लोक, त्यांच्या मूळ ठिकाणाबद्दल देवाणघेवाण करण्यासाठी अनौपचारिक व्यासपीठ दिले. रंगांचा शोध, हेरिटेज वॉक दरम्यान विद्यार्थ्यांनी डेक्कन कॉलेजला भेट दिली आणि मानवी भूतकाळातील निवडक सांस्कृतिक अवशेष पाहण्यास मिळाले आणि विद्यार्थ्यांना प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती आणि पुरातत्वशास्त्राची माहिती प्रदान करण्याचा उद्देश होता. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी संस्थेतील मराठा हिस्ट्री म्युझियम-कम-अर्काइव्हज पाहीले आणि व्हिक्टोरियन निओ-गॉथिक शैलीतील डेक्कन कॉलेजाच्या मुख्य इमारतीला भेट दिली.

चंद्रशेखर सिंग यांनी विविध माध्यमांतून कारागीर, कला आणि हस्त कलेची ओळख करून दिली. सुश्री लीना भावे क्रोशेट, रचना भावसार पेस्टल पेंटिंग, मिलू थिटे मिनाकारी पेंटिंग, राजश्री पवार बांबू केन, पूजा कुमारी मिथिला पेंटिंग, संध्या गावडे एम्ब्रॉयडरी, नागेंद्र कुंभार टेराकोटा या सर्व कलाकारांनी सहभागींना विविध कौशल्ये आणि कलाकौशल्यांमध्ये मदत केली. तीन दिवस सहभागी ना छोट्या गटात विभागण्यात आले.

समारोपाच्या सत्रात श्री चंद्रशेखर यांनी या कला आणि हस्तकलेचा आणखी प्रचार करण्याचे आवाहन केले आणि SKNCOA चे प्राचार्य डॉ. सुधीर चव्हाण यांनी वास्तुशास्त्राच्या शिक्षण प्रवासाविषयी मार्गदर्शन केले. कार्यशाळा दरम्यान डॉ शोभन केळकर (एचओडी बी आर्च) आणि नेहा मसलेकर (एचओडी एम आर्क) हे देखील उपस्थित होते. कला व हस्त कलेतील विजेत्यांना प्रमाणपत्रे देऊन तसेच विजेत्यांना प्रमाणपत्र देऊन कार्य शाळेचा उत्साहात समारोप करण्यात आला.

## जलवाहिनी फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोरेगाव पार्क :** साधू वासवाणी पुलाच्या कामासाठी जेसीबीने खोदाई करताना जलवाहिनी फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया गेले. त्यानंतर पालिकेकडून दुपारी दोन वाजता या जलवाहिनीचा शोध घेण्यास सुरुवात केली. त्यामुळे या जलवाहिनीतून कोरेगाव पार्क परिसरातील साऊथ मेन रोड आणि नॉर्थ मेन रोडच्या दोन्ही बाजूचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला.

लष्कर जलकेंद्रातून ही जलवाहिनी आली असून, पहाटे या जलवाहिनीतून कमी पाणी असल्याने त्याची तीव्रता कमी होती. मात्र, सकाळी पुरवठा सुरू झाल्यानंतर या जलवाहिनीतून मोठ्या प्रमाणात पाणी रस्त्यावर येण्यास सुरुवात झाली. या वेळी जेसीबीने खड्ड्यातील पाणी काढण्याचे काम सुरू होते. या प्रकाराची माहिती महापालिकेस देण्यात आली. त्यामुळे पालिकेकडून तत्काळ या भागाचा पाणीपुरवठा बंद करण्यात आला. मात्र, त्यानंतरही मोठ्या प्रमाणात पाणी येत असल्याने महापालिकेस जलवाहिनी शोधण्यात अडचण येत होती. अखेर दुपारच्या सुमारास जलवाहिनी दुरुस्त करण्याचे काम हाती घेण्यात आले.

## युवासेना जिल्हाप्रमुख गणेश बाळासाहेब सातव यांची निवड

**पुणे :** पुणे महापालिकेच्या हद्दीत नव्याने सामाविष्ट ३४गावांच्या मुलभूत सोयी सुविधा सोडवण्यासाठी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीच्या स्वीकृत सदस्य पदी १५आक्टोबर २०२४ रोजी युवासेना जिल्हाप्रमुख गणेश बाळासाहेब सातव यांची निवड करण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य प्रतोद,व गटनेते भरतशेठ गोगावले, शिवसेना शहर प्रमुख नाना भानगिरे,युवासेना निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत राहणार असल्याचे युवासेना जिल्हाप्रमुख तथा शासन नियुक्ती सदस्य (नगरसेवक) गणेश सातव यांनी सांगितले.

### मंडई परिसर देखभाल दुरुस्तीसाठी उपाय

# पालिकेद्वारे सव्वा कोटीची तरतूद



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिवाजीनगर न्यायालय ते स्वारगेट या भुयारी मार्गावरील मेट्रोला काही दिवसांपूर्वी सुरुवात झाली. स्वारगेट ते महात्मा फुले मंडई तसेच चिंचवड ते मंडई या स्थानकादरम्यान प्रवास करणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. मंडई मेट्रो स्थानकाच्या अंतर्गत भागातील स्वच्छता सुखावणारी आहे. परंतु, मेट्रो स्थानकाच्या बाहेर पडताच नागरिकांना अतिक्रमणांमधून वाट काढत पुढे जावे लागते. मंडई परिसरातील बेशिस्त पार्किंग व वाहतूक कोंडीच्या समस्येला सामोरे जावे लागते. त्यामुळे मेट्रो स्थानक होऊन बाहेरील चित्र मात्र 'जैसे थे' आहे. या पार्श्वभूमीवर, महापालिका प्रशासनाकडून हे चित्र बदलण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

> महात्मा फुले मंडई परिसराची दोन ते तीन वेळा प्रत्यक्ष पाहणी केली. मंडई परिसर शहराचे वैभव असून आता तेथे मेट्रो स्थानक झाले आहे. तेथे अतिक्रमणे आहेत. मेट्रोतून ये-जा करणाऱ्या प्रवाशांना अतिक्रमणांचा अडथळा ठरतो आहे. त्यामुळे योग्य नियोजन करून पादचाऱ्यांना चालणे सोईस्कर होईल आणि व्यावसायिकांचेही नुकसान होणार नाही, यादृष्टीने प्रयत्न केले जातील. अतिक्रमणे काढून त्यांची विभागनिहाय व्यवस्था केली जाईल. याबरोबरच मुख्य इमारतीमधील पावसाळी पन्हाळी बदलण्यात येतील. अन्य देखभाल दुरुस्तीची कामे केली जातील, त्यामुळे मंडई परिसर सुस्थितीत येईल."
> — **डॉ. राजेंद्र भोसले,** आयुक्त, पुणे महापालिका

मेट्रो स्थानकामुळे महात्मा फुले मंडई परिसर बदलू लागला आहे. गर्दीतही भर पडू लागली आहे. मात्र, स्थानकाबाहेर पडल्यानंतर बाहेर दिसणारे अतिक्रमण, अस्वच्छता, बेशिस्त पार्किंग, वाहतूक कोंडीची समस्या कायम आहे. हे चित्र बदलण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून आता प्रयत्न केले जाणार आहेत. त्यामध्ये मंडई परिसर अतिक्रमणमुक्त करण्यासह मंडईच्या ऐतिहासिक वास्तूच्या देखभाल दुरुस्तीसाठी विशेष लक्ष दिले जाणार आहे. यासाठी देखभाल दुरुस्तीसाठी सव्वा कोटी रुपयांची तरतूद महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी केली आहे.

#रा

# एमआयटी एडीटी'ची मानसिक आरोग्यासाठी पथनाट्याद्वारे जनजागृती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टॅक्नॉलॉजी विद्यापीठ, विश्वराजबाग, पुणेच्या स्कूल ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च व स्कूल ऑफ वेदिक सायन्सेस यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त 'मानसिक आरोग्य सप्ताह' साजरा करण्यात आला. या सप्ताहाच्या समारोपप्रसंगी विद्यार्थ्यांच्या वतीने 'संवेदनशीलता - मानसिक आरोग्याची' या विषयावर लोणी-काळभोर गावात रॅली काढून व पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात आली.

विद्यापीठातील 'मॅनेट' या इमारतीपासून या रॅलीला विद्यापीठाचे प्र.कुलगुरू प्रा. डॉ. अनंत चक्रदेव व डॉ.मोहित दुबे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ करण्यात आला. यावेळी, स्कूल ऑफ एज्युकेशन अँड रिसर्चच्या प्रभारी प्राचार्या डॉ. प्रिया सिंग आणि स्कूल ऑफ वेदिक सायन्सेसच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माधवी गोडबोले यांच्यासह दोन्ही स्कूलचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि शेकडो विद्यार्थी देखील उपस्थित होते.

## ५० टक्के सवलतीच्या दरात धान्य उपलब्ध

# समुत्कर्षची कोथरूड मधील रंगकर्मींना दिवाळी भेट!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**कोथरूड :** महिलांनी महिलांसाठी सुरु केलेल्या समुत्कर्ष ग्राहक पेठेने कोथरुडमधील रंगकर्मींना दिवाळीच्या पार्श्वभूमीवर विशेष भेट दिली असून, ५० टक्के सवलतीच्या दरात धान्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मंगळवार दिनांक १५ ऑक्टोबर

**» गोड दिवाळी**

रोजी कोथरुडचे आमदार चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते समुत्कर्ष ग्राहक पेठेच्या कार्डचे वाटप करण्यात आले. दिवाळीला आता काहीच दिवस बाकी आहेत. त्यामुळे सर्वच ठिकाणी खरेदीसाठी नागरिकांची गडबड सुरू आहे. मात्र, रंगभूमीची मनोभावे सेवा करणाऱ्या नाट्यकला जिवंत ठेवणाऱ्या, पण वयामुळे घरीच असलेल्या आणि लोकांच्या दृष्टीने काहीशा विस्मृतीत गेलेल्या ज्येष्ठ नाट्य कलावंतांनाही दिवाळीचा मनमुराद आनंद लुटता यावा, यासाठी कोथरुडमधील समुत्कर्ष ग्राहक पेठेने विशेष पुढाकार घेतला आहे.



> ऑल आर्टिस्ट फाउंडेशन च्या बॅक स्टेज आर्टिस्ट साठी ही योजना सुरु करण्यात आली आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमिवर कलाकारांची दिवाळी गोड व्हावी असा यामागील उद्देश आहे. या कार्ड च्या माध्यमातून कलाकारांना आज शिधा वाटप होणार आहे. ५० टक्के सवलती मध्ये धान्य या कार्ड च्या माध्यमातून उपलब्ध होईल."
> — चंद्रकांत पाटील

या अंतर्गत कोथरुड मधील ज्येष्ठ रंगकर्मींना ५० टक्के सवलतीच्या दरात धान्य उपलब्ध करून देण्याचा ग्राहक पेठेने निर्णय घेतला आहे. त्यामुळे रंगकर्मींना मोठा आधार मिळाला आहे.

- **कोथरूडकर व पुणेकरांना समुत्कर्षचं उत्कर्ष दालन सुरू..!**
- **आमदार चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते कार्ड वाटप**

मंगळवार दिनांक १५ ऑक्टोबर रोजी कोथरूडचे आमदार चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते समुत्कर्ष ग्राहक पेठेच्या कार्डचे वाटप करुन धान्य उपलब्ध करून देण्यात आले. यावेळी भाजप प्रवक्ते संदीप खर्डेकर, ऑल आर्टिस्ट फाऊंडेशनचे अध्यक्ष योगेश सुपेकर, सचिव गणेश मोरे, उपसचिव अश्विनी कुरपे, उप खजिनदार मनोज माझिरे, पश्चिम महाराष्ट्र संपर्क प्रमुख सोमनाथ फाटके, संचालक मोनिका जोशी समुत्कर्ष फाऊंडेशनच्या वनिता काळे, शशिकला मेंगडे, धनंजय रसाळ, पार्थ मठकरी यांच्या सह ज्येष्ठ रंगकर्मी, बॅक स्टेज आर्टिस्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'काँट्रीब्युशन शो' मुळे गायक-कलाकारांवर आली संक्रांत !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गायन आणि मनोरंजनाचे कार्यक्रम विनामूल्य करण्याचा,'काँट्रीब्युशन शो' करण्याचा ट्रेंड पडत असून विनामूल्य कार्यक्रमांमुळे गायक-कलाकारांवर संक्रांत येईल आणि त्यांच्या भवितव्यापुढे गंभीर प्रश्न उभा राहील, त्यामुळे या क्षेत्रातील सर्वांनी वेळीच विचार करून या ट्रेन्डला अटकाव करावा,असे आवाहन गायिका आरती दीक्षित यांनी पत्रकाद्वारे केले आहे. कुठलाही स्टेज शो करण्यासाठी भरपूर मेहनत असते. थिएटर, साउंड, व्हिडीओ, बॅनर, जाहिराती असा भरपूर खर्च असतो. एवढं सगळं करुन सादरीकरण विनामूल्य करायचे असेल आणि तरच प्रेक्षक येणार असतील, तर तिकिटांचे गायनाचे, मनोरंजनाचे दर्जेदार होणार नाही, होत पण नाही आणि विनामूल्य कार्यक्रमाचा दर्जाचं चांगला दर्जा म्हणून रूढ होण्याची भीती आहे, असे दीक्षित यांनी म्हटले आहे.

## अवतीभवती
CITY UPDATE



### 'प्रकृती' या प्रदर्शनाचे २३ ते २७ ऑक्टोबर दरम्यान आयोजन

**पुणे :** चित्रांसोबतच क्रोशे कला यांच्या माध्यमातून निसर्गाचे अनेकविध आविष्कार अनुभविण्याची संधी पुणेकर रसिक प्रेक्षकांना मिळणार आहे. निमीत्त आहे सुप्रसिद्ध चित्रकार कल्याणी भोगले आणि क्रोशे कलाकार असलेल्या रचना बजाज यांच्या 'प्रकृती – दी इसेन्स ऑफ नेचर' या प्रदर्शनाचे. येत्या २३ ऑक्टोबर पासून सकाळी ११ ते सायं ७ दरम्यान घोले रस्त्यावरील राजा रवी वर्मा आर्ट गॅलरी येथे हे प्रदर्शन संपन्न होणार आहे. सदर प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य खुले आहे. आपल्या कलेच्या माध्यमातून या दोन्ही कलाकारांनी निसर्गाबद्दल असलेला आपला नितांत आदर आणि नव निर्मितीच्या मागे असणाऱ्या उर्जेचे प्रकटीकरण रसिकांसमोर आणण्याचा प्रयत्न केला आहे हे विशेष. कल्याणी भोगले यांनी 'प्रकृती' अर्थात निसर्गातील गूढता आणि नव निर्मिती मागे असलेली ऊर्जा यांची सांगड घातलेली दिसते. या दोन्ही तत्त्वांचा साधलेला संगम हे त्यांच्या चित्रांचे आकर्षण असेल. तर रचना बजाज यांनी निसर्गाचे सौंदर्य, ऊर्जा आपल्या कलाकृतींमधून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. 'प्रकृती' या प्रदर्शनाचे उद्‍घाटन मंगळवार दि २२ ऑक्टोबर रोजी सायं ५ वाजता घोले रस्त्यावरील राजा रवी वर्मा आर्ट गॅलरी येथे होईल.

### सेंट्रल किचन प्रणालीला कामाचा ठेका देण्यासाठी निविदा देण्याची प्रथा बंद

**पुणे :** शासनाने आता सेंट्रल किचन प्रणालीला कामाचा ठेका देण्यासाठी निविदा देण्याची प्रथा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. परिणामी शाळा व्यवस्थापनांनी स्थानिक महिला बचतगट किंवा संस्थांची निवड करून त्यांच्यामार्फत विद्यार्थ्यांना आहार पुरवावा लागणार आहे. कारण महापालिका व नगरपालिका क्षेत्रातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना केंद्रीय स्वयंपाकगृह (सेंट्रल किचन) प्रणालीद्वारे पुरविण्यात येत असलेल्या आहाराच्या दर्जाबाबत अनेकदा तक्रारी मिळाल्या आहेत. राज्यातील पात्र शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना पोषण आहार देण्यात येतो. नागरी भागातील ज्या शाळांत धान्य साठविण्यासाठी, तसेच स्वयंपाकगृहासाठी जागा उपलब्ध नाही, त्यांना केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीद्वारे आहार पुरविण्यात येतो. यासाठी निविदा प्रक्रिया राबवून महिला बचतगट, स्वयंसेवी संस्था, अशासकीय संस्थांची निवड केली जात होती. निविदेत अनियमिततेच्या अनेक तक्रारी शासनाला प्राप्त झाल्या. आहाराचा दर्जा, विद्यार्थ्यांना शासन नियमाप्रमाणे पूरक आहार न देणे आदी तक्रारीचांही त्यात समावेश होता. निराज्य शासनाने या तक्रारींची दखल घेऊन योजनेची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने सुधारणा करण्यास मान्यता दिली आहे. सेंट्रल किचनबरोबर करण्यात आलेला करारनामा अस्तित्वात आहे, तोपर्यंतच त्यांच्यामार्फत योजनेचा लाभ घेता येईल.

# गणेशखिंड रस्ता रुंदीकरण जमिनीच्या मोजणीचे काम पूर्ण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आता गणेशखिंड रस्ता रुंदीकरणासाठी जमिनीच्या मोजणीचे कामदेखील पूर्ण झाले आहे. ५२ मिळकतींची मोजणी झाली असून या प्रक्रियेचा सविस्तर भूमापन अहवाल भूमी अभिलेख विभागाकडून महापालिकेला सादर केला जाणार आहे.

> महापालिकेचा पथ विभाग, मालमत्ता विभाग व भूमी अभिलेख विभाग या तिन्ही विभागांच्या प्रयत्नातून गणेशखिंड रस्त्याच्या रुंदीकरणासाठी आवश्यक जमिनीच्या मोजणीचे काम झाले आहे. त्याचा सविस्तर अहवाल आम्हाला लवकरच प्राप्त होईल."
> — महेश पाटील, उपायुक्त, मालमत्ता विभाग, पुणे महापालिका

> गणेशखिंड रस्त्याच्या डाव्या व उजव्या बाजूच्या मिळकतींच्या मोजणीचे काम करण्यात आले आहे. त्याचा अहवाल लवकरच महापालिका प्रशासनाला दिला जाईल."
> — गणेश कराड, नगर भूमापन अधिकारी. भूमी अभिलेख विभाग

शहरातील सर्वाधिक वर्दळीचा रस्ता असलेल्या गणेशखिंड रस्त्यावरील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासमोरील आचार्य आनंदऋषी महाराज चौकात सध्या दुहेरी उड्डाणपूल व शिवाजीनगर हिंजवडी मेट्रो प्रकल्पाचे काम सुरू आहे. दरम्यान, या रस्त्यावरील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात आले. मेट्रो, उड्डाणपुलाच्या काम एकीकडे सुरू असतानाच वाहतूक कोंडी फोडण्यासाठी महापालिकेने विकास आराखड्यात असलेल्या गणेशखिंड रस्त्याच्या रुंदीकरणाचेही काम हाती घेतले आहे. शिवाजीनगरकडून विद्यापीठाकडे जाताना धोत्रे पथापासून ते महावितरण कार्यालयापर्यंत तसेच विद्यापीठाकडून शिवाजीनगरकडे येताना नॅशनल इन्फर्मेटिक्स सेंटर (एनआयसी) रिझर्व्ह बँकेच्या कृषी महाविद्यालयापर्यंतच्या रस्ता रुंदीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. त्यापुढील रस्ता रुंदीकरणाचे काम विविध तांत्रिक कारणांमुळे अडखळले होते.

# चारचाकींसाठी लवकरच नवीन मालिका

**पुणे :** चारचाकी खासगी वाहनांसाठी लवकरच सुरु होणाऱ्या नवीन मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक शुल्क भरुन राखून ठेवण्याकरिता आगाऊ अर्ज करण्याचे आवाहन पुणे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे. मालिकेतील आकर्षक तसेच पसंतीचा क्रमांक हवा असेल त्यांनी विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. हा अर्ज आणि धनाकर्ष (डीडी) २१ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० दरम्यान कार्यालयाच्या नवीन नोंदणी विभागात पत्त्याचा पुरावा, आधारकार्ड, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह जमा करणे आवश्यक राहील. एकाच क्रमांकाकरिता जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी कार्यालयीन सूचनाफलकावर लावण्यात येईल.

या यादीतील अर्जदारांनी लिलावासाठी जास्त रक्कमेचा एकच डीडी २२ ऑक्टोबर रोजी रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत सीलबंद लिफाफ्यात घालून कार्यालयात जमा करावा.

**अन्यथा नोंदणी क्रमांक रद्द**

- एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर केले नाही तर राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व भरलेले शुल्क शासनाच्या तिजोरीत जमा होईल.

## खडकवासला विधानसभा मतदारसंघामधील वाद चव्हाट्यावर

# उमेदवारीवरून भाजपमध्येच रस्सीखेच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यातील सहा जागांपैकी ५ जागांवर विद्यमान आमदारांनाच पसंती असल्यामुळे इच्छुक उमेदवारांमध्ये नाराजी आणि संतापाची लाट उसळली आहे. पुण्यामध्ये भाजपमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर येत आहे. काही भाजपचे नगरसेवक निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत. त्यांच्यामध्येच उमेदवारीवरून नाराजी आहे. अशामध्येच खडकवासला विधानसभा मतदारसंघामध्ये उमेदवारीवरून भाजपमध्येच रस्सीखेच सुरू आहे.

भाजपच्या माजी नगरसेविका मंजुषा नागपुरे यांनी खडकवासला विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची इच्छा भाजपच्या वरिष्ठांकडे व्यक्त केली. गेली १५ वर्षे नगरसेवक असताना आपण लोकांची काम केली आहेत. त्यामुळे मला विधानसभा निवडणूक लढवायची आहे अशी इच्छा त्यांनी वरिष्ठांकडे व्यक्त केली. मंगळवारी पुण्यातील आठही विधानसभा मतदारसंघातील माजी नगरसेवकांची आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीत ही मागणी केली आहे.

**नेमकी संधी कोणाला**

- खडकवासला विधानसभा मतदारसंघाच्या बैठकीत भाजपने यावेळी उमेदवार बदलला पाहिजे, तरच ही जागा आपण जिंकू अशी मागणी काही माजी नगरसेवकांनी केली आहे. त्यामुळे आता भाजपचा खडकवासल्याचा उमेदवार कोण? पक्ष नेमकी कोणाला संधी देतोय. याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या बैठकीला पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस सी टी रवी, पश्चिम महाराष्ट्र प्रभारी अजय जामवाल, माजी संघटन मंत्री रघुनाथ कुलकर्णी शहराध्यक्ष धीरज घाटे हे पदाधिकारी उपस्थित होते.


# राष्ट्रवादीच्या नाराजीचा कोथरूडमध्ये भाजपाला बसणार फटका ?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोथरूड :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून दीपक मानकर यांनी कोथरूड परिसरातील झोपडपट्टी भागात मोठ्या प्रमाणात काम केले आहे. जर त्यांनी या निवडणुकीतून अंग काढून घेतले तर त्याचा फटका भाजपाला बसण्याची शक्यता आहे.

विधानसभा निवडणुकीचे तिकीट न मिळाल्याने अजित पवार गटाचे पुणे शहर अध्यक्ष दीपक मानकर यांनी नाराजी व्यक्त केली आहे. दीपक मानकर यांनी पक्षावर नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी सांगितलं की, २०१२ पासून मी संघटनेचे काम करत आहे. कार्यकर्त्यांनी माझ्यासाठी दादांकडे मागणी केली होती. मागणी होत असताना अनेक कार्यकर्ते भेटले. दादा कार्यकर्त्यांना न्याय देण्याचे काम करतात, त्यावेळी दादा विचार करू, असे म्हणत होते.

परवा तिकिट जाहीर झाले पण त्यात नाव नव्हते. मी कुठे कमी पडलो, हे पक्ष पक्षश्रेष्ठींनी मला सांगितलं पाहिजे. नायकवडे आणि भुजबळ यांचं काय काम आहे मला माहित नाही. मी कधीही पार्टी कडून पैसे घेत नाही, पुढे पुढे करत नाही. कार्यकर्ता म्हणून जबाबदारी पार पाडणार आहे, परंतु तरीही सगळ्यांचा विरोध मला पत्करावा करावा लागतो, अशा शब्दांत त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. दीपक मानकर यांनी सुनील तटकरे यांच्यावरही आरोप केले आहेत.



> घराणेशाहीचं राजकारण करत बसला तर कार्यकर्त्यांचं काय? भुजबळ यांच्या घरात दिलं, आम्ही लोकसभेत एकत्रित काम केलं. पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष या पदाचा शनिवारपर्यंत राजीनामा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे देणार आहे. मी दादांसोबत आता फक्त कार्यकर्ता म्हणून काम करणार. मला अनेक ऑफरदेखील येत आहे. कार्यकर्त्यांनी ठरवलं तर निवडणुकीत फटका बसू शकतो."
> — दीपक मानकर

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात डॉ. एपीजे अब्दुल कलाम जयंती साजरी



**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात भारताचे माजी राष्ट्रपती तसेच मिसाईल मॅन म्हणून प्रख्यात असलेल्या भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त विद्यापीठाच्या सरस्वती सभागृहात कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अपर्ण करून अभिवादन केले. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव प्रा. डॉ. ज्योती भाकरे, वित्त व लेखा अधिकारी चारुशीला गायके, अधिसभा सदस्य प्रा. डॉ. राजेंद्र घोडे, मुकुंद पांडे, प्रा.डॉ. विलास आढाव तसेच शैक्षणिक व प्रशासकीय विभागांचे विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## RS NEWS DIGEST

**जमावबंदी**

### नेस वाडिया कॉलेज व त्याच्या १०० मीटर परिसरात जमाव बंदीचा आदेश

**पुणे :** नेस वाडिया कॉलेज व त्याच्या १०० मीटर परिसरात पोलिसांनी जमावबंदीचा आदेश लागू केला आहे. हा आदेश आजपासून २६ ऑक्टोबरपर्यंत लागू राहणार आहे. सह पोलीस आयुक्त यांचा अतिरिक्त कार्यभार असलेले अपर पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी हा आदेश काढला आहे. नेस वाडिया कॉलेजमधील तरुण तरुणीबाबत अत्याचाराचा प्रकार समोर आला होता. यावरुन विविध पक्षातील नेते, कार्यकर्ते हे गेले काही दिवस येथे आंदोलन करत होते. याबाबत नेस वाडिया कॉलेजच्या प्राचार्यांनी कोरेगाव पार्क पोलिसांना पत्र दिले. त्यामुळे हा आदेश काढण्यात आला आहे. याबाबत आदेशात म्हटले आहे की, नेस वाडिया कॉलेज मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणास पुरक सौदार्हपूर्ण व शांततामय वातावरणाची आवश्यकता असते. मात्र गेल्या काही दिवसात महाविद्यालय परिसरात बाहेरील व्यक्ती व संघटना यांनी महाविद्यालयाची अथवा पोलिसांची पूर्व परवानगी न घेता मोर्चा, आंदोलने, निदर्शन यांचे महाविद्यालयाचे आवारामध्ये आयोजन केले.

## निर्माती - अभिनेत्री प्राजक्ताने साधला सिटी प्राइडमध्ये मनमोकळा संवाद

### मराठी संस्कृतीची भव्य-दिव्यता दाखविणारी 'फुलवंती'






**कोथरूड :** 'फुलवंती' हा केवळ एका कादंबरीवरील चित्रपट नाही, तर मराठी संस्कृतीची भव्य दिव्यता, प्रेम, त्याग, अव्यक्त प्रेमातील समर्पण याची सिद्धता करणारा एक अफलातून प्रयोग आहे. याच आठवड्यात तीन-चार भव्य दिव्य दक्षिणात्य चित्रपटांच्या स्पर्धेत देखील 'फुलवंती'ने अफाट प्रगती साधली. यातच मराठी वर्गाच्या अभिजात रसिकतेची साक्ष पटते, असे 'फुलवंती' चित्रपटाची मुख्य नायिका आणि निर्माती असलेल्या प्राजक्ता माळी हिने सांगितले.

बुधवारी प्राजक्ता माळी हीने कोथरूड येथील सिटी प्राइडमध्ये भेट देत तेथील रसिकांशी मनमोकळा संवाद साधला. माजी उप नोंदणी महानिरीक्षक वसंतराव मस्के, राष्ट्र संचारचे संपादक अनिरुद्ध बडवे, नुपूर पवार, गौरी ढोले - पाटील यांनी प्राजक्ता हिचे स्वागत केले. यावेळी सर्व रसिकांशी तिने मनमोकळा संवाद साधला. यावेळी बोलताना प्राजक्ता माळी हीने सांगितले की मराठी चित्रपटांमध्ये प्रथमच इतकी भव्य दिव्यता, प्रचंड महागडे सेट, संवाद - पटकथेवरती अविश्रांत मेहनत घेऊन हा चित्रपट बनविण्यात आला आहे. यामध्ये बाबासाहेब पुरंदरे यांचे आशीर्वाद आहेत. यामध्ये केवळ पुण्याची ऐतिहासिक श्रीमंतीच नव्हे तर पेशवेकलीन थाट, संस्कृती, येथील विद्वत्ता, रसिकता दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. भरत नाट्यम हा प्रकार हळूहळू चित्रपटांमधून लुप्त होत चालला आहे आणि वेगळ्याच संगीताने याची जागा घेतली आहे. परंतु भरत नाट्यम हा भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे. त्याला प्रोत्साहन दिले पाहिजे. मी स्वतः भरतनाट्यमची साधिका आहे. त्यामुळे 'फुलवंती'च्या माध्यमातून हा प्रकार पुन्हा एकदा अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याला प्रेक्षकांनी प्रचंड साथ दिली, प्रेम दिले याबद्दल मला आनंद आहे. प्रत्येकाने हा चित्रपटगृहामध्ये जाऊनच पहावा तरच याची भव्य दिव्यता लक्षात येईल, असे आवाहन यावेळी माळी यांनी केले.

## सिंहगडच्या एमबीए विद्यार्थ्यांच्या

### दोन दिवसीय प्रेरणा कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद



**पुणे :** सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन अँड रिसर्च (SIBAR) येथे नुकताच एमबीए पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय प्रेरण कार्यक्रम (इंडक्शन प्रोग्रॅम) मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर उपस्थित होते.

कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. डीपी मीडिया हाऊसच्या संस्थापिका देवयानी पवार यांनी 'मीडिया आणि ब्रँड बिल्डिंग: स्टोरीटेलिंगची ताकद' विषयावर विद्यार्थ्यांना माहिती दिली. त्यांनी सांगितले की मीडिया आणि ब्रँडिंगमध्ये कथाकथनाची (स्टोरीटेलिंग) किती महत्त्वपूर्ण भूमिका आहे आणि प्रभावी स्टोरीटेलिंगद्वारे कसे ब्रँड उभारता येतात याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. नागरीकशास्त्र यूट्यूब चॅनलचे संस्थापक ओमकार जाधव यांनी 'व्यक्तिगत ब्रँड उभारणी' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या व्यक्तिमत्वाचे ब्रँड कसे तयार करावे, तसेच सोशल मीडिया आणि संवाद कौशल्ये यांचा वापर कसा करावा यावर भर दिला. दिल्ली एंजल डेनच्या संस्थापिका मिस. श्वेता राका, महाराष्ट्र इकॉनॉमिक डेव्हलपमेंट कौन्सिलच्या संचालिका शीतल पांचाल उपस्थित होत्या. या प्रसंगी कॉलेजचे संचालक डॉ. धनंजय मंडलिक यांनी विद्यार्थ्यांच्या नवीन शैक्षणिक प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी शब्दांत नवीन सुरुवातीचे महत्त्व समजावले आणि त्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रवासासाठी उत्तम शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांनीही या दोन दिवसीय कार्यक्रमात नवीन शिकण्याची दिशा मिळवली आणि सांस्कृतिक उपक्रमांतून भरपूर आनंद अनुभवला. संस्थापक अध्यक्ष प्रा .एम एन नवले, संस्थापक सचिव डॉ. सुनंदा नवले, उपाध्यक्ष्य एच.आर डॉ .रोहित नवले , उपाध्यक्ष प्रशासक डॉ. रचना नवले-अष्टेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# छप्परफाड निर्णय!

सरकार मग ते कुणाचेही असो निवडणुका तोंडावर आल्या की, प्रचंड कार्यतत्पर होते! सत्ताधाऱ्यांना जनतेचा प्रचंड कळवळा येतो आणि मग सरकार 'जो जे वांछिल तो ते लाहो..' असे पसायदान आळवत जनतेच्या सुखासाठी, समृद्धीसाठी, विकासासाठी, स्वप्नपूर्तीसाठी असे झपाटल्यागत कामाला लागते की, काही विचारता सोय नाही. सरकारच्या या झपाटलेपणासमोर राज्याची तिजोरी, तिची स्थिती, तिचे स्वास्थ्य, निरंतर व शाश्वत विकासाचा मार्ग वगैरे वगैरे सगळे मुद्दे निरर्थकच ठरतात. एवढंच काय पण 'मतांसाठीच घोषणांचा पाऊस' ही विरोधकांनी बेंबीच्या देठापासून ओरडून केलेली टीकासुद्धा बुळबुळीत ठरते. मतदारांनीही सगळ्याच राजकीय पक्षांचा पुरेपूर अनुभव घेतलेला असल्याने त्यांनाही सत्तेवर कोणी का असेना व विरोधात कोणी का असेना हेच होणार हे पुरते ठाऊक असल्याने मतदार विरोधकांची टीका गांभीर्याने घेण्याची अजिबात तसदी घेत नाहीतच! मग मतदारांनी आपल्याकडे आकर्षित व्हावे यासाठी आपल्या जाहीरनाम्यात आश्वासनांची बरसात करणे विरोधकांना क्रमप्राप्त ठरते. त्यातून मग जाहीरनाम्यातील आश्वासनांचे 'वॉर' सुरू होते. भारतातील केंद्रीय निवडणुकीपासून विधानसभेच्याच नव्हे तर स्थानिक स्वराज्य संस्थेपर्यंतच्या कोणत्याही निवडणुका बघा, तुम्हाला त्यात हाच एकमेव कॉमन व सातत्यपूर्ण पॅटर्न दिसेल! असो!! सांगायचा मूळ मुद्दा हा की, निवडणूक जवळ आली की, राजकीय पक्षांना मतदारांचा प्रचंड कळवळा येतो व ते झपाटल्यासारखे कार्यरत होतात. त्यात सत्तेवर असलेल्यांना असणारा कळवळा टोपल्याने व पोत्याने जास्त असणे ओघाने आलेच. त्यातच जर मतदारांनी लोकसभा निवडणुकीत सत्ताधाऱ्यांवर नाराजी व्यक्त केली असेल तर मग सत्ताधारी खडबडून जागे होणे व त्यांनी ताकही फुंकून पिणे ओघाने आलेच! हेच सगळे सध्या महाराष्ट्रात घडत आहे व ते घडणे अजिबात अनपेक्षित वगैरे नाहीच. वेगळेपण जर काही असेल तर ते हेच की, विद्यमान सत्ताधाऱ्यांनी 'छप्पर फाड' घोषणांचा व निर्णयांचा नवा विक्रम स्थापन करणे! आजवरच्या कुठल्याही सरकारने जी कार्यतत्परता दाखविली नाही ते सध्याचे सरकार दाखवते आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तर आपल्या सरकारची टॅगलाईनच 'हे देणारे सरकार आहे' अशीच करून टाकली आहे. त्यामुळे मागच्या एक महिन्यापासून मुख्यमंत्र्यांच्या या टॅगलाईनचा संपूर्ण पाईक होत त्यांचे सरकार 'मागेल त्याला, मागेल ते'या मोडमध्ये जाऊन छप्पर फाड निर्णय घेत आहे. ऑक्टोबर महिन्याच्या १४ तारखेपर्यंत महायुती सरकारने एकूण १,३४२ शासन निर्णय घेतले आहेत. त्यातील १८९ निर्णय एकट्या १४ ऑक्टोबरच्या मंत्रिमंडळ बैठकीत झाले आहेत. याव्यतिरिक्त सरकारने गेल्या काही दिवसांमध्ये मोठमोठ्या घोषणांचाही धडाका लावला आहे. अशा घोषणांची संख्याही आता दीडशेच्या वर गेली आहे. अर्थातच हे सगळे निर्णय घेताना ते राज्याच्या तिजोरीला सोसतील का? आणि या निर्णयांचा भविष्यात निभाव लागेल का? हे प्रश्न सत्ताधाऱ्यांच्या लेखी गौणच आहेत. उदाहरणार्थ मुंबईत प्रवेश करताना असणाऱ्या पाचही टोलनाक्यांवर हलक्या वाहनांना संपूर्ण टोलमाफी देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. याचा अर्थ आता टोलची ही रक्कम सरकार राज्याच्या तिजोरीतून कंत्राटदाराला देणार! या टोलनाक्यांवर सर्व मिळून रोज साधारण तीन लाख खाजगी कार व लहान वाहने ये-जा करतात. त्यादृष्टीने सरकारचा हा निर्णय लाखो वाहनधारकांना दिलासा देणाराच आहे व ते या निर्णयाने खुश होणेही साहजिकच आहे. मात्र, या निर्णयापोटी राज्याच्या तिजोरीवर पाच हजार कोटी महिन्याला बोजा पडेल. मुख्यमंत्री शिंदे हा टोल आता कायमचा बंद झाल्याचे सांगत आहेत. जर खरेच तसे घडले तर मग सरकारी तिजोरीवरच्या महिन्याकाठी पाच हजार कोटी रुपयांच्या अतिरिक्त बोजाची तरतूद सरकार कोणत्या मार्गाने करणार? हा कळीचा प्रश्न! त्याचे उत्तर सरळच ते म्हणजे करवाढ! जर सरकार हे सत्य नाकारून करवाढ करणार नसल्याचा दावा करत असेल तर त्याचा सरळ-सरळ अर्थ हाच की, ही टोलमाफी फक्त निवडणुकीपुरती आहे. बरं सरकारने दुसरा मार्ग शोधून या बोजाची तरतूद केली तरी तेवढ्यावर हा प्रश्न संपणार नाही कारण राज्यातील इतर सर्वच टोलनाक्यांवर टोलमाफीची मागणी समोर येईल व सरकारला समन्यायी पद्धतीने त्याबाबत निर्णय घ्यावाच लागेल. अशावेळी सरकार राज्याच्या तिजोरीवर वाढणाऱ्या प्रचंड बोजाची तरतूद कुठून करणार हा प्रश्न निर्माण होतोच! अर्थातच अशा प्रश्नांची उत्तरे कुठलेच सरकार देत नाहीच त्यामुळे ती न मिळणे अपेक्षितच. मात्र, त्याची दुसरी बाजू ही की, जेव्हा अशी उत्तरे मिळत नाहीत तेव्हा तो निर्णय, त्या योजना, त्या घोषणा, ती आश्वासने ही अल्पजीवीच असतात. थेट सांगायचे तर असे निर्णय, अशा योजना, घोषणा, आश्वासने ही निवडणुकीपुरती असतात व निवडणुकीनंतर हे सगळे हवेत विरून गेलेले असते. मतदारांना हा अनुभव नवा आहे असे अजिबात नाहीच. त्यांनाही याचा अंदाज असतोच. मात्र, पाच वर्षे आपल्याला थारा न देणारे सरकार निवडणूक काळात आपल्यासमोर हात जोडून उभे असेल व 'बोल आका क्या हुक्म है?' असे विचारत असेल तर जेवढे पदरात पाडून घेता येईल तेवढे घ्या, असाच विचार सामान्य मतदारही करतो. लाडकी बहीण, लाडका भाऊ, डझनावारी महामंडळे हे सगळे त्यातूनच येते. हे म्हणजे राज्याचा व पर्यायाने राज्यातील जनतेचा शाश्वत व सातत्यपूर्ण विकास मार्गापासूनची कायमची घेतली जात असलेली फारकतच आहे व त्यात कुणाचेही भले नाहीच! मात्र, सत्ताकारणासमोर हे सगळे शहाणपण गौणच ठरते. त्यामुळे घोषणा, निर्णय, आश्वासनांचा सार्वत्रिक व सर्वपक्षीय मुसळधार पाऊस अटळ! अतिवृष्टीने नुकसानच होते हा निसर्ग नियम! तो नियम सगळीकडेच सारखाच लागू होतो. मात्र, सत्ताकारणाने हा नियम पुरता धाब्यावर बसवला आहे आणि विद्यमान सरकारने या कामी आपल्या नावे नवा विक्रम प्रस्थापित केला आहे, हे मात्र निश्चित!

> छत्तीसगडमधील बस्तर भागात नक्षलवादी बंडखोरांविरुद्ध सुरक्षा दलांची कारवाई बऱ्याच दिवसांपासून सुरू आहे, मात्र थोड्या-थोड्या अंतराने घातपात आणि जवानांच्या मृत्यूच्या घटना घडत आहेत. मात्र, यादरम्यान सुरक्षा दलांनी मोठ्या प्रमाणात नक्षलवाद्यांचा खात्मा केला आहे किंवा त्यांना कायद्याच्या कचाट्यात आणले आहे. अबुझमदच्या थुलाथुली गावाच्या जंगलात झालेल्या चकमकीत सुरक्षा दलांच्या संयुक्त पथकाने ३० हून अधिक नक्षलवाद्यांना ठार केल्याने एक महत्त्वाचे यश मिळाले. गेल्या काही महिन्यांत सुरक्षा दलांनी मोठ्या प्रमाणात माओवाद्यांचे हल्ले हाणून पाडले असून अनेक नक्षलवाद्यांना ठार केले आहे. नक्षलवादाच्या समस्येचे समूळ उच्चाटन करण्यासाठी, या गटांच्या हिंसक हल्ल्यांना तोंड देण्याबरोबरच, लोकांच्या कल्याणासाठी धोरणात्मक आणि तळागाळाच्या पातळीवर ठोस पुढाकार घेण्याची गरज आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

# नक्षलवाद्यांवर वज्रप्रहार

**देवेंद्र व्यास**

भारताच्या अंतर्गत सुरक्षेसमोरील सर्वांत मोठे आव्हान म्हणून नक्षलवादाचा उल्लेख केला जातो. महाराष्ट्र, छत्तीसगड, मध्य प्रदेश यांसह देशातील अनेक राज्यांमध्ये नक्षलवादी हिंसाचारात आजवर असंख्य सुरक्षा दलांचा आणि नागरिकांचा मृत्यू झाला आहे. तथापि, अलीकडील काळात नक्षलवादाचा बिमोड करण्यासाठी सरकारने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. लोकसभा निवडणुकांपूर्वी नक्षलवाद्यांची जोरदार नाकेबंदी करण्यात सुरक्षा यंत्रणांना यश आले होते. त्यामुळेच भीतीमुक्त वातावरणात आणि कोणताही हिंसाचार न होता या निवडणुका पार पडल्या. खास करुन छत्तीसगडमध्ये गेल्या वर्षी नोव्हेंबर २०२३ पासून नक्षलवाद्यांविरोधातील कारवाया वाढल्या आहेत. विशेषतः गतवर्षी नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये झालेल्या नक्षलवाद्यांविरोधी कारवाया गेल्या सहा महिन्यांतील सर्वाधिक होत्या. वास्तविक, छत्तीसगडमधील बस्तर भागात नक्षलवादी बंडखोरांविरुद्ध सुरक्षा दलांची कारवाई बऱ्याच दिवसांपासून सुरू आहे, मात्र थोड्या-थोड्या अंतराने घातपात आणि जवानांच्या मृत्यूच्या घटना घडत आहेत. यादरम्यान सुरक्षा दलांनी मोठ्या प्रमाणात नक्षलवाद्यांचा खात्मा केला आहे किंवा त्यांना कायद्याच्या कचाट्यात आणले आहे. अलीकडेच, अबुझमदच्या थुलाथुली गावाच्या जंगलात झालेल्या चकमकीत सुरक्षा दलांच्या संयुक्त पथकाने ३० हून अधिक नक्षलवाद्यांना ठार करत एक महत्त्वाचे यश मिळाले. नक्षलवाद्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार सुरू केला होता, त्यानंतर त्यांच्यावर प्रत्युत्तराची कारवाई करण्यात आली. या घटनेची एक विशेष बाब म्हणजे चकमकीत सर्व जवान सुरक्षित राहिले. यानंतर घटनास्थळावरून एके-४७ रायफल्ससह घातक शस्त्रांचा मोठा साठा जप्त करण्यात आला. यापूर्वी एप्रिलमध्ये झालेल्या चकमकीत २९ नक्षलवादी ठार झाले होते. गेल्या काही महिन्यांत सुरक्षा दलांनी मोठ्या प्रमाणात माओवाद्यांचे हल्ले हाणून पाडले असून अनेक नक्षलवाद्यांना ठार केले आहे.

अलीकडेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नक्षलग्रस्त आठ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची एक बैठक आयोजित केली होती. त्यात विषद करण्यात आलेल्या माहितीनुसार, गेल्या वर्षभरात नक्षलवादाशी संबंधित हिंसाचाराच्या घटना १६,४६३ वरून ७,७०० पर्यंत कमी झाल्या आहेत. पुढील वर्षी ही संख्या आणखी कमी करण्याचा सरकारचा मानस आहे. नागरीक आणि सुरक्षा दलांच्या मृत्यूमध्ये सुमारे ७० टक्के घट झाली आहे. हिंसाचाराची तक्रार करणाऱ्या जिल्ह्यांची संख्या ९६ वरून ४२ वर घसरली आहे. हिंसाचाराची तक्रार करणाऱ्या पोलिस ठाण्यांची संख्या ४६५ वरून १७१ वर आली आहे, त्यापैकी ५० पोलिस ठाणी नवीन आहेत, म्हणजे फक्त १२० पोलिस ठाण्यांमध्ये हिंसाचाराची नोंद होत आहे. केंद्र आणि राज्यांच्या संयुक्त प्रयत्नांचे हे फळ आहे. आता नक्षलवाद्यांच्या विरोधात गृह मंत्रालय राज्यांसोबत एक मोठी योजना तयार करत आहे. त्यानुसार, ज्याप्रमाणे जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद्यांना मिळणारा निधी रोखण्यात आला, त्याचप्रमाणे नक्षलवाद्यांना रोखण्यासाठी मोठा ॲक्शन प्लॅन तयार करण्यात येत आहे.केंद्र सरकारच्या अहवालानुसार २०१० च्या तुलनेत २०२३ पर्यंत देशात नक्षली हिंसाचारात ७२ टक्के आणि मृत्यूंमध्ये ८६ टक्के घट झाली आहे.

केंद्र आणि राज्य सरकारे असे दावे प्रदीर्घ काळापासून करत आहेत, परंतु वास्तव हे आहे की विविध उपाययोजना, रणनीती आणि प्रयत्न करूनही तेथील माओवादी हिंसाचारावर नियंत्रण मिळवणे कठीण ठरत आहे. वेळोवेळी नक्षलवादी सक्रिय होऊन सुरक्षा दलांवर घात घालून हल्ले करतात, हे वास्तव आहे. खरोखरच नक्षलवादी काही भागांपुरते मर्यादित राहिले असते आणि त्यांच्या संघटना कमकुवत झाल्या असत्या, तर त्यांच्याकडे अत्याधुनिक शस्त्रे उपलब्ध झाली नसती आणि लष्कराच्या कारवायांवर लक्ष ठेवण्यासाठी त्यांच्याकडे प्रभावी संपर्क यंत्रणा नसती.

छत्तीसगडमध्ये जवळपास चाळीस वर्षांपासून माओवाद्यांचा हिंसाचार सुरू आहे. दरम्यान, अनेक रणनीती अवलंबल्या गेल्या, पण त्या प्रभावी ठरल्या नाहीत. सुरक्षा दलांना मिळालेल्या ताज्या यशामुळे नक्षलवाद्यांचे मनोधैर्य नक्कीच खच्ची होईल, पण ही समस्या मुळापासून उखडून टाकण्यासाठी व्यावहारिक पावले उचलण्याची अजूनही आशा आहे. वास्तविक, आदिवासी भागात माओवाद्यांच्या हिंसाचाराचे अनेक पदर आहेत. सरकारला त्यांची जंगले आणि जमीन हिसकावून उद्योगपतींच्या ताब्यात द्यायची आहे, असे आदिवासींना वाटते. त्यांनी याला विरोध केला आहे. सुरुवातीला चर्चेच्या माध्यमातून हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र त्यातून कोणताही निष्कर्ष निघू शकला नाही. त्यानंतर बंदुकीच्या सहाय्याने त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न सुरू झाले. खूप रक्तपात झाला, पण नक्षल समस्या संपवणे शक्य झाले नाही. हेलिकॉप्टर, ड्रोन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नक्षलींच्या हालचालींवर नजर ठेवण्यात आली, पण त्यातही फारसे यश मिळू शकले नाही. नक्षलवादी अनेक वेळा सुरक्षा दलांना आपल्या जाळ्यात अडकवून त्यांच्यावर हल्ले करताना दिसले आहेत. काही वर्षांपूर्वी त्यांनी विजापूरमध्ये अशाच पद्धतीने २२ सुरक्षा जवानांची हत्या केली होती.

नक्षलवादी समस्येवर मात करण्यासाठी दोन प्रकारच्या संकल्पना कार्यरत आहेत. एक म्हणजे आदिवासींना मुख्य प्रवाहाशी जोडण्यासाठी त्यांच्या भागात विकास कार्यक्रमांवर भर देण्याची शिफारस करण्यात आली आहे. या अंतर्गत मागील सरकारनेही अनेक योजना सुरू केल्या होत्या, जेणेकरून त्यांची आर्थिक स्थिती मजबूत होईल. दुसरी कल्पना म्हणजे बंदुकीच्या जोरावर नक्षलवाद्यांचा खात्मा करणे. मात्र आजपर्यंत त्यांना सामोरे जाण्यासाठी कोणतेही व्यावहारिक धोरण आखलेले नाही, हे वास्तव आहे. आज हजारो निरपराध आदिवासी तुरुंगात आहेत, त्यांच्या सुटकेसाठी कोणतीही पावले उचलली जात नाहीत. पाच-सहा वर्षांपूर्वी याबाबत धोरण ठरवण्यावर भर देण्यात आला होता, त्यात त्यांच्याशी चर्चा करण्याचाही प्रस्ताव होता, पण ते धोरण होऊ शकले नाही. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्थानिक आदिवासींमध्ये सरकार त्यांचे जीवन सुधारण्यासाठी कटिबद्ध आहे, हा विश्वास निर्माण करणे गरजेचे आहे. त्यांच्या जल, जंगल आणि जमिनीच्या प्रश्नांवर गांभीर्याने चर्चा झाली, तर कदाचित ते हिंसेचा मार्ग सोडण्यास तयार होतील.

अबुझमदच्या जंगलात झालेल्या ताज्या चकमकीचा एक पैलू म्हणजे घटनास्थळावरून घातक शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. माओवादी गटांकडे एवढ्या मोठ्या प्रमाणात प्राणघातक शस्त्रे असणे आश्चर्यकारक नसले तरी प्रश्न असा आहे की छत्तीसगडमधील वनक्षेत्राबाहेर पाळत आणि सुरक्षा कडेकोट बंदोबस्त असताना माओवादी गटांकडे एवढ्या मोठ्या प्रमाणात घातक शस्त्रे कशी पोहोचताहेत? सुरक्षा दलांच्या विशेष दलांनी नक्षलवाद्यांच्या हल्ल्यांना यशस्वीपणे तोंड दिले आहे आणि त्यांना कमकुवत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. परंतु नक्षलवादाच्या समस्येचे समूळ उच्चाटन करण्यासाठी, या गटांच्या हिंसक हल्ल्यांना तोंड देण्याबरोबरच, लोकांच्या कल्याणासाठी धोरणात्मक ठोस पुढाकार घेण्याची गरज आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

मध्यंतरी,केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आपल्या छत्तीसगड दौऱ्यात मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद संपविणार, असे वक्तव्य केले होते. त्यानंतर ४ ऑक्टोबरची ताजी चकमक घडली असून नारायणपूर-दंतेवाडा या जिल्ह्यांच्या सीमावर्ती भागात ३० हून अधिक नक्षलवादी मारले गेले आहेत. गेल्या काही वर्षातील ही मोठी चकमक समजली जात आहे. बिहार, झारखंड, ओडीशा, आंध्र प्रदेश, तेलंगणा, मध्य प्रदेश आणि गडचिरोली जिल्ह्यात सोडल्यास महाराष्ट्र ही राज्ये नक्षलवाद मुक्त झाली आहे. सद्यःस्थितीत छत्तीसगडमधील बस्तर विभागात नक्षलवाद्यांचा मोठ्या प्रमाणात वावर आहे. मात्र, पोलीस कारवायांमुळे आता तोही कमी झाल्याचे एकंदरीत चित्र आहे.

## गुड 'मॉर्निंग'

दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

### पंचांग

**गुरुवार, दिनांक १७ ऑक्टोबर २०२४**
अश्विन शु. १५, रेवतीस श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू **नक्षत्र** : रेवती, योग : हर्षन, करण : विष्टि बालव नवान्न पौर्णिमा सायं. ४.५६ पर्यंत. कुलधर्म, कार्तिक स्नानारंभ आग्रयण, महर्षी वाल्मिकी जयंती, पंचक सायं. ४.२० पर्यंत. कावेरी संक्रमण स्नान मु. १३
**सूर्योदय :** स.०६.१२ **सूर्यास्त :** सायं. ०५.४२ वा.
**राहू काळ :** दुपारी : १:३० ते ३:००

### दिनविशेष

▶१८८२: अव्वल इंग्रजीतील मराठी व्याकरणकार, ग्रंथकार आणि कळवळीचे धर्मसुधारक दादोबा पांडुरंग तर्खडकर यांचे निधन. ▶१८९० : नाटिका संप्रदायाचे प्रवर्तक अनंत हरी गद्रे यांचा जन्म. ▶१८९२: रावबहादूर नारायणराव बोरावके, पहिले मराठी साखर कारखानदार. ▶१९५३ : अणुशक्तीवर वीज निर्माण करण्याच्या जगातील पहिल्या अणुभट्टीचे ब्रिटनच्या राणी एलिझाबेथ यांच्या हस्ते उद्‌घाटन. ▶१९५९ : अमेरिकन सेनापती व मुत्सद्दी जनरल मार्शल यांचे निधन. ▶१९६२ : मुंबईचे दानशूर उद्योगपती, केंद्रीय कायदेमंडळाचे सभासद सर कावसजी जहांगीर यांचे नियुक्ती. ▶१९६५ : श्रीलंकेचा क्रिकेटपटू अरविंद डिसिल्व्हा यांचा जन्म, ▶१९६६: महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नासाठी न्या. मेहेरचंद्र महाजन यांच्या अध्यक्षतेखाली आयोगाची नियुक्ती.▶१९७०: अनिल कुंबळे यांचा जन्म.

### राशीभविष्य

▲ **मेष** : प्रतिष्ठा वाढेल. ▲ **वृषभ** : तणाव कमी होईल ▲ **मिथुन** : नको त्या कामात वेळ जाईल. ▲ **कर्क** : आवडत्या व्यक्तीची भेट होईल. ▲ **सिंह** : पथ्यपाणी सांभाळा. ▲ **कन्या** : चांगली बातमी कळेल. ▲ **तुळ** : घरगुती समारंभ आखाल ▲ **वृश्चिक** : अपेक्षित पत्रे येतील. ▲ **धनु** : मेजवानीचा योग. ▲ **मकर** : सर्व कार्यात यश. ▲ **कुंभ** : आश्वासने देऊ नका. ▲ **मीन** : धनदायक दिवस.

### चिंतन

एका दिवसात मी प्रसिद्ध होईन अशी बढाई मारू नये. ते कधीच शक्य नाही. 'होम वॉज नॉट बिल्ट इन ए डे' ही म्हण काय सांगते, जो सतत यश मिळविण्यासाठी धडपडत असतो मात्र त्यासाठी एक प्रकारची सातत्याने साधना, तपश्चर्या करावी लागते. अपयश आले तरी सातत्याने चिकाटी ठेवावी लागते. अविरत श्रम करावे लागतात.

'असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी' असे म्हणत बसून कर्तव्यशून्य बनू नका. 'कायदा पाळा गतीचा – थांबला तो संपला' म्हणून सतत परिश्रम करा म्हणजेज अपेक्षित यश मिळते.

### व्यक्तीविशेष

## अनंत हरी गद्रे

जाती पातीचा भेदभाव न करता आयुष्यभर नि:स्वार्थ बुद्धीने सामाजिक कार्य करणाऱ्या अनंत हरी गद्रे ऊर्फ समतानंद यांचा जन्म १७ ऑक्टोबर १८९० रोजी देवरुख येथे झाला. त्यांनी श्री. म. माटे आणि राम गणेश गडकरी यांच्या सहवासात शिक्षण घेतले. स्वरचित गद्य, पद्यात्मक आख्याने बसविणाऱ्या या सुधारकाने आध्यात्मिक ओढीने हिमालयातही भ्रमंती केली आणि अखेर लोकसंस्कारपीठ असणाऱ्या गाडगेबाबांच्या आज्ञेवरून १९५४ पासून १००८ झुणका भाकर सत्यनारायणाचे व्रत सुरु केले. लोकमान्यांबरोबर कलकत्ता ते कोलंबो असा प्रवास केला. गद्रे यांनी माझा देश, वीरकुमारी, भवानी तलवार ही नाटके लिहिली. चित्रपटांच्या स्पर्धेत पाच-सहा तासांची नाटके टिकाव धरु शकणार नाहीत, हे जाणून १९३० मध्ये नाटिका संप्रदाय सुरु केला. दोन तासाच्या ९ नाटिका लिहिल्या. त्यांच्या या नाट्यसेवेमुळे त्यांना १९३० च्या रौप्यमहोत्सवी नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद मिळाले. गद्रे यांनीच सिनेसृष्टीला हाऊसफुल्ल हा शब्द दिला. नामाचा महिमा हा मराठी चित्रपट काढणाऱ्या गद्रे यांना आचार्य अत्रे यांनी जाहिरातजनार्दन म्हणून गौरविले.

### बोधकथा

## परोपकाराचे फळ

नामदेव अतिशय दयाळू आणि परोपकारी होता. कोणालाही मदत करायला तो नेहमी तत्पर असायचा. एके दिवशी संध्याकाळी तो घरी येत असताना एका घराला आग लागलेली दिसली. बाहेर उभी राहून एक स्त्री जोरजोरत रडत होती. कारण तिचा लहान मुलगा घरात अडकला होता. घरात शिरण्यास कोणी तयार होत नव्हते. नामदेवने तात्काळ घराकडे धाव घेतली. आत जाऊन त्याने त्या मुलाला उचलले आणि तो बाहेर येऊ लागला. बाहेरच्या दारापाशी येताच, त्याच्या हातातून ते मुल कोणीतरी हिसकावून घेतले. गोंधळामध्ये ते मुल कोणी हिसकावले हे नामदेवला समजले नाही. तो बाहेर आला तेंव्हा त्याच्या हाताला बरंच भाजलं होतं. त्याच्या हातातून ज्याने मुल काढून घेतलं होतं तो त्या घराच्या मालकाचा नोकर होता. नामदेव कुठलीही शहानीशा न करताच तसाच घरी गेला. नोकराने मालकाला सांगितले की मीच तुमच्या मुलाला वाचवले. ते ऐकून मालकाला खूप आनंद झाला त्याने नोकराला मोठे बक्षीस दिले. इकडे नामदेवने भाजल्यामुळे आठवडाभर विश्रांती घेतली. जखमा थोड्याशा बऱ्या झाल्यानंतर एके दिवशी आईने त्याला सांगितले की, 'त्या दिवशी तुझ्या शर्टाला ही साखळी अडकली होती. तुला त्रास होत होता. म्हणून मी तुला याबद्दल सांगितले नाही.' नामदेवनी ती साखळी हातात घेतली आणि तो त्या घराकडे आला. तिथल्या मालकाला भेटून ही साखळी आपल्याकडे त्या दिवशी राहिली होती. (पूर्वार्ध)

### जिज्ञासा

## रेणवीय जीवशास्त्रज्ञ सुसुमू टोनेगावा

जपानमधील नागोया या शहरात ६ सप्टेंबर १९३९ रोजी सुसुमू टोनेगावा यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच टोनेगावा तल्लख बुद्धीचे होते. एसएससीची परीक्षा ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. पुढे त्यांनी क्योटो विद्यापीठातील विषाणू संशोधन संस्थेत प्राध्यापक वाटानावे यांच्याकडे संशोधन करण्यास सुरुवात केली. टोनेगावा यांचे प्रमुख संशोधन म्हणजे एकाच प्रकारची पांढरी पेशी ही लाखो प्रकारची प्रतिपिंडे (ॲण्टीबॉडीज) कशा प्रकारे तयार करू शकते याची उकल होय. या त्यांच्या संशोधनाबद्दल त्यांना १९८७ चे वैद्यक शास्त्राचे नोबेल पारितोषिक प्रदान करण्यात आले. टोनेगावा यांनी रोगप्रतिकार शक्तीविज्ञान या विषयात संशोधन केले. आपल्या शरीरात कोणत्याही प्रकारचे विषाणू, जीवाणू किंवा इतर रोगजंतू प्रवेश करतात त्यावेळी त्यांच्या विरोधात रक्तातील विशिष्ट प्रकारच्या पांढऱ्या पेशी ॲण्टी बॉडीज तयार करतात. अशा प्रतिपिंडांमध्ये असणाऱ्या वैविध्याचा आपल्या शरीरात प्रवेश करणारे रोगजंतू आणि इतर प्रकारचे प्रतिजन (ॲण्टीबॉडी) यांच्या विरोधात बी पेशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रक्तपेशी अगणित प्रकारचे ॲण्टीबॉडीज तयार करतात. परंतु या पेशींमध्ये असणाऱ्या जनुकांची संख्या मर्यादित असते. (पूर्वार्ध)

### नवं संशोधन

## पुसट ठसे ओळखण्याचे तंत्र

अतिनील किरणे या पदार्थांवर पडल्यानंतर ते आपोआपच चमकू लागतात. अतिनील किरणे आणि प्रतिदिप्त पदार्थ यांच्या साहाय्याने अस्पष्ट ठसेही स्पष्ट दिसू लागतात. ज्यावेळी हाताची बोटे एखाद्या ठिकाणी ठेवल्यानंतर त्या व्यक्तीच्या घामामध्ये जमा झालेले पदार्थ त्या वस्तूवर जमतात त्या ठिकाणी ठसे निर्माण होतात. मानवी शरीरात एक्राईन, एपोक्रोम आणि सिबॅशियस नावाच्या तीन ग्रंथी असतात. या ग्रंथींपासून निघणाऱ्या घामरुपी स्त्रावापासून ठसे तयार होतात. हात आणि तळव्यामध्ये असंख्य एक्राईन ग्रंथी असतात. यापासून निघणाऱ्या घामासोबत रक्तात असणारी अनेक रसायनेदेखील वातावरणात मिसळली जातात.
(क्रमश:)

### सोडवा सुडोकू

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक : ४६९**

| | | | |
|---|---|---|---|
| | 3 | | 1 |
| | | 2 | |
| | | 3 | |
| | 4 | | 2 |

**क्रमांक : ४७० चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | 1 | 3 | 2 |
| 1 | 2 | 4 | 3 |
| 2 | 3 | 1 | 4 |
| 3 | 4 | 2 | 1 |

### दोस्ती संगणकाशी

तुमचं ई-मेल अकाउंट जीमेलवर असेल तर तुम्हाला मेल पाठवताना मराठीतून संदेश अथवा पत्र लिहिता येते. यासाठी सब्जेक्ट आणि त्याखालील रिकाम्या चौकोनाच्या मध्यभागी असणाऱ्या पट्टीमध्ये डाव्या बाजूला चूझ लँग्वेज असा पर्याय उपलब्ध असतो. त्यावर क्लिक करून त्यातील मराठी भाषा निवडा. यानंतर टायपिंग करण्यास सुरुवात करा. इथं तुम्हाला मराठी शब्दांचे इंग्रजी स्पेलिंग माहित असणं आवश्यक आहे. इंग्रजी अर्थांची गरज भासत नाही. त्यामुळे तुम्हाला जर प्रिय दादा असे लिहायचे असेल तर त्यासाठी priy dada असे टाईप करावे लागते. अशा प्रकारे तुम्ही मोठं पत्रही इंग्रजी कीबोर्डवर टाईप करून मराठीतून पाठवू शकता. यासाठी कोणत्याही सॉफ्टवेअरची गरज भासत नाही.

### महिलायन

## सांभाळा घराचं बजेट

देशाच्या अर्थसंकल्पाकडे आपलं साऱ्यांचंच लक्ष लागलेलं असतं. देशाचं बजेट हे सर्वसामान्यांच्या जीवनावर परिणाम करणारं असतं. ते आपल्याला अनुकुल असण्यासाठी घराच्या बजेटपासूनच सुरुवात करायला हवी. घरचं बजेट म्हणजेही एक प्रकारची आर्थिक योजनाच असते. ती बनवल्यामुळे अनेक प्रकारचे फायदे होतात. त्यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतील. सर्वात आधी आपल्या उत्पन्नाचा हिशेब ठेवला पाहिजे. आपण आपल्या महिन्याची सरासरी कमाई एका कागदावर लिहा. त्यामध्ये व्याजातून मिळणारे पैसे, लाभांश आणि बोनस यातून मिळणारी रक्कमही सामील करा. यातून आपली कमाई किती होत आहे हे कळलं तर खर्चाचा हिशेब ठेवणं सोपं जाईल.

ज्याप्रमाणे सरकारचं बजेट वर्षातून एकदा सादर होतं त्याप्रमाणे घराच्या बजेटसाठीही एक वेळ ठरवून घ्यावी. सुरुवातीला त्यासाठी काही वेळ लागेल. पण निराश होऊ नका. त्यामध्ये आपल्याला अडचणी येत असतील तर तज्ज्ञांचा सल्लाही घ्यायला हरकत नाही. ज्यावेळी आपल्याला बोनस किंवा एखाद्या गोष्टीमध्ये फायदा होईल, त्यावेळी मोठ्या खर्चासाठी ते पैसे वाचवा. सर्वात महत्त्वाचं म्हणजे आपण खर्च कमी करु शकत नसाल तर जास्त कमाई करण्याचा प्रयत्न करा. बजेट बनवण्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे झालेल्या खर्चांचा हिशेब ठेवणं.

सरकारच्या बजेटमध्ये वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी पैशांची जशी तरतूद केलेली असते तशी ती घराच्या बजेटमध्येही करण्याचा प्रयत्न करा. एका बाजूला सामान्य गोष्टी नमूद करु शकता. त्यामध्ये घराचं भाडं, केबल, रिकरिंग, डिपॉझीट, क्रेडीट कार्ड, खाण्यापिण्यावर, मनोरंजनावर होणारा खर्च लिहू शकता. दुसऱ्या वर्गामध्ये मुलांच्या शिक्षणावर होणारा खर्च नमूद करावा. त्याचप्रमाणे पर्यटन किंवा पार्टीसाठी होणारा खर्चही त्यामध्ये नोंदवावा. वर्षातून एकदा एखाद्या गोष्टीवर मोठी रक्कम खर्च करावी लागत असेल तर त्याची स्वतंत्र नोंद करावी.

आजकाल वेगवेगळ्या गोष्टींसाठी होणारे खर्च वाढले आहेत आणि आपण त्याला नियंत्रित करण्याचा प्रयत्न करत आहात. त्यासाठी पैसा कोठे खर्च होणं अपेक्षित आहे आणि तो कोठे होत आहे, हे जाणून घ्यायचा प्रयत्न करा. खरंतर आपल्या गरजा कमी असतात. पण खर्च मात्र जास्त होत असतो. (पूर्वार्ध)

### बालांगण

## नारायणगड

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात नारायणगावानजीक एक अप्रतिम गड उभा आहे, नारायणगड त्याच्यावरील दोन शिखरांमुळे पुणे- नाशिक महामार्गावरून प्रवास करणाऱ्यांचे लक्ष वेधून घेतो. कातळकोरीव पायऱ्या, काळ्या कातळभिंतीची नैसर्गिक तटबंदी, शांत सुंदर परिसर लाभलेले मंदिर, कातळ कोरीव टाकी, देवनागरी लिलीतील शिलालेख अशा एखाद्या डोंगरी किल्ल्यास आवश्यक असणाऱ्या गोष्टींनी नारायणगड सजला आहे. या गडाच्या कातळ कोरीव पायऱ्या आणि खाबंटाकी पाहात याची अभारणी प्राचीन काळी झाली असणार याची आपणास खात्री पटते. मराठ्यांच्या अंमलाखाली हा गड सतराव्या शतकाच्या सुरूवातीच्या काळात आला.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# 'या' लोकांनी पिऊ नये नारळपाणी

नारळ पाणी पिण्याचे अनेक फायदे आहेत. कारण त्यात भरपूर पोषक घटक असतात. हे प्यायल्याने डिहायड्रेशन होत नाही आणि शरीरातून विषारी पदार्थ बाहेर टाकण्यासही मदत होते. व्यायामानंतर नारळ पाणी प्यायल्याने स्नायूंना खूप आराम मिळतो. हे सर्व आहेत नारळाच्या पाण्याचे फायदे पण तुम्हाला माहीत आहे का की, ते पिण्याचे फायदे तर आहेतच पण काही गंभीर तोटे देखील होऊ शकतात. तज्ज्ञांच्या मतानुसार, काही आरोग्य समस्या असल्यास, व्यक्तीने नारळ पाणी पिणे टाळावे, अन्यथा समस्या आणखी वाढू शकते.

मधुमेहाच्या रुग्णांनी जर नारळाचे पाणी जास्त प्रमाणात प्यायले तर ते तुमच्या रक्तातील साखरेची पातळी वाढवते. त्यात कार्बोहायड्रेट असते आणि ते जास्त प्रमाणात प्यायल्याने कॅलरीज वाढतात. अशा स्थितीत याचे जास्त प्रमाणात सेवन केल्यास वजन वाढू शकते आणि रक्तातील साखरेची पातळीही वाढते. जर तुम्हाला मधुमेह असेल तर तुम्ही दररोज एक ग्लास पेक्षा जास्त नारळाचे पाणी पिणे टाळावे.



जर तुम्हाला कमी रक्तदाबाची समस्या असेल तर तुम्ही नारळ पाणी पिण्यापूर्वी तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. नारळाच्या पाण्यात असलेल्या पोटॅशियममुळे रक्तदाबाची पातळी आणखी कमी होऊ शकते. तसेच उच्च रक्तदाबाचा धोका असलेल्या लोकांना नारळाचे पाणी सेवन करणे फायदेशीर ठरू शकते. विशेषत: तुम्हाला तुमचे बीपी कोणत्याही औषधाशिवाय सामान्य ठेवायचे असेल तर तुमच्यासाठी हा एक चांगला पर्याय असू शकतो. जर तुम्ही नारळाच्या पाण्याचे जास्त प्रमाणात सेवन केले तर त्याचा तुमच्या पचनसंस्थेवर परिणाम होऊ शकतो. त्यात पोटॅशियमचे प्रमाण जास्त असते आणि जास्त पोटॅशियममुळे अतिसार होऊ शकतो. तुम्हाला ब्लोटिंगचा त्रास होत असला तरीही तुम्ही जास्त नारळ पाणी पिणे टाळावे. एका वेळी जास्त नारळाचे पाणी प्यायल्याने पोटात जास्त पाणी साचते, ज्यामुळे पोट फुगणे आणि बद्धकोष्टता होऊ शकते. नारळाच्या पाण्यात लघवीचे प्रमाण वाढवणारे गुणधर्म असल्याने ते जास्त प्रमाणात प्यायल्याने वारंवार लघवी होण्यासारख्या समस्या उद्भवू शकतात. जर तुम्ही नारळाच्या पाण्याचे योग्य प्रमाणात सेवन केले तर ते तुम्हाला अनेक फायदेही देऊ शकतात. नारळाचे पाणी प्यायल्याने काही लोकांमध्ये ऍलर्जीची समस्या देखील होऊ शकते. त्यामुळे ट्री नट ॲलर्जीसोबत इतर ॲलर्जी होण्याचा धोका असतो. जर तुम्हाला नारळाचे पाणी पिण्याची ऍलर्जी असेल तर तुम्हाला खाज सुटणे, जळजळ होणे, लालसरपणा येणे इ. समस्या उद्भवतात. ◆◆◆

# रक्तगुठळी समजणार एकाच चाचणीने



रक्ताची गुठळी झाली की हृदयविकाराच्या झटक्यापासून स्ट्रोकपर्यंत अनेक बाबींचा धोका निर्माण होतो. शरीरात कुठल्याही भागात रक्ताच्या गुठळ्या असतील तर त्या एकाच चाचणीत ओळखण्याची पद्धत वैज्ञानिकांनी विकसित केलेली आहे. त्यामुळे पक्षाघात आणि त्यामुळे येणारी विकलांगता यांचे प्रमाण रोखता येईल, असा दावा हे तंत्रज्ञान शोधणाऱ्या शास्त्रज्ञांनी केला आहे.रक्ताच्या गुठळ्या शरीराच्या नेमक्या कुठल्या भागात आहेत हे चटकन ओळखणे डॉक्टरांना शक्य नसते. सध्याच्या वैद्यकीय तंत्रामुळे शरीराच्या एकाच भागात एकावेळी त्याचा शोध घेतला जातो. त्यामुळे रक्ताच्या गुठळ्या नेमक्या कुठे आहेत याचा शोध घेण्यात विलंब होतो. जेव्हा एखाद्या व्यक्तीला अचानक पक्षाघात होऊन त्याच्या शरीराचा भाग विकलांग होतो. त्याला पक्षाघाताचा दुसरा झटका येण्याची शक्यताही असते. सुरुवातीची रक्ताची गुठळी फुटते आणि त्यानंतर पक्षाघाताचा मोठा झटका येतो. त्यापूर्वी ती गुठळी शोधून उपचार करणे आवश्यक असते. रक्ताची गुठळी कोठे आहे हे कळले तर त्यानुसार उपचार करता येतात, असे मॅसॅच्युसेटस रुग्णालयातील संशोधक पीटर कारवान यांनी सांगितले. काही वेळा रक्ताची गुठळी काढण्यासाठी शस्त्रक्रिया करावी लागते. रक्ताची गुठळी शोधण्यासाठी तीन पद्धती वापरतात. त्यात अल्ट्रासाऊंड पद्धतीने कॅरोटिड धमन्या किंवा पायातील रक्तवाहिन्यांत असलेल्या गुठळ्या शोधतात, तर चुंबकीय सस्पंदन प्रतिमाचित्रण (एमआरआय) पद्धतीने हृदयाची तपासणी केली जाते. संगणकीकृती स्थानशास्त्रीय तपासणीने फुप्फुसातील रक्ताच्या गुठळ्या कुठे आहेत हे समजते. जर गुठळी कुठे आहे हे समजले नाही तर योग्य उपचार करता येणार नाही. अनेक वेळा त्यासाठी वेगवेगळ्या पद्धती वापरून प्रयोग करत बसावे लागते, पण तोपर्यंत रुग्णाची स्थिती खालावलेली असते. आता शरीरात कुठेही रक्ताची गुठळी असली तरी ती एकाच तपासणीत कळणार आहे, असे कारवान यांचे म्हणणे आहे. संशोधकांच्या पथकाने रक्तातील गुठळीत असलेल्या अविद्राव्य अशा फायब्रिन या प्रथिनाला चिकटणारे पेप्टाईड शोधले आहे. रेडिओन्युक्लाईड्स पेप्टाईडला जोडले तर शरीरात रेडिओन्युक्लाईस कुठे आहेत हे पॉझिट्रॉन एमिशन टोमोग्राफी तंत्राने (पीईटी) शोधता येते. वेगवेगळे रेडिओन्युक्लाईड्स व पेप्टाईड्स यात वापरतात आणि रेडिओन्युक्लाईड व पेप्टाईड्स यांना जोडण्यासाठी वेगवेगळी रसायने वापरली जातात. कुठल्या मिश्रणाने रक्ताच्या गुठळीचे पीईटी संदेश स्पष्ट मिळतील याचा विचार केला जातो. आतापर्यंत १५ रुग्णांच्या रक्तातील गुठळ्यांची तपासणी करण्यात यश आलेले आहे. ◆◆◆

# मंगळावर पिसाऱ्यासारखे ढग



पृथ्वीचा शेजारचा मंगळ ग्रह नेहमीच मानवासाठी कुतुहलाचा विषय बनून राहिलेला आहे. पृथ्वीसारखाच खडकाळ, कठीण पृष्ठभाग असलेल्या या लाल ग्रहावर एकेकाळी वाहते पाणीही होते. त्यामुळे संशोधकांच्या दृष्टीने हा ग्रह महत्त्वाचा ठरतो. मंगळावर अनेक रोव्हर पाठवलेले असून त्याच्या कक्षेत अनेक ऑर्बिटरही फिरत आहेत. त्यामधून मंगळाबाबत सातत्याने नवे नवे संशोधन होत असते. मंगळावर गूढ स्वरूपाचे ढगही सापडलेले आहेत. तेथील वातावरणाचा अभ्यास चालू असताना हे ढग सापडले. हौशी खगोलवैज्ञानिकांना दोन वेळा या ग्रहावर हे ढग दिसले व त्यांचा आकार पिसाऱ्यासारखा होता. दोन्ही निरीक्षणात साधारण २५० कि.मी. उंचीपर्यंत या ढगांचा पिसारा फुललेला होता. तुलनात्मक विचार करता अशीच वैशिष्ट्ये पूर्वीही दिसली होती, पण ते ढग १०० कि. मी. उंचीपेक्षा जास्त नव्हते.

२५० किलोमीटपर्यंत ढगांचा पिसारा व बाहेरच्या वातावरणात त्याचे बारीक होत जाणे ही विचित्र वैशिष्ट्ये मानता येतील, असे स्पेनमधील ऑगस्टीन सँचेझ लॅवेंगा यांनी नेचर या नियतकालिकातील शोधनिबंधात म्हटलेले आहे. दहा तासात हे ढग तयार झाले व त्यांनी १००० बाय ५०० कि.मी.चा भाग व्यापून टाकला असे दिसत होते. दहा दिवस हे ढग दृष्टीस पडले व दिवसेंदिवस त्यांचा आकार बदलत होतो, असे संशोधकांचे मत आहे. मंगळाभोवती फिरणाऱ्या यानांनाही तेथील या ढगांचा मागमूस लागलेला नाही कारण त्यांची भौमितिक व प्रदीप्तीय योजना वेगळी आहे .

हबल अवकाश दुर्बीणीने जी छायाचित्रे टिपली आहेत त्यांची तुलना करता मंगळावर हे ढग नेहमी नसतात. साधारण १०० कि.मी. इतकी त्यांची उंची असते. पिसाऱ्यासारख्या या ढगांचे स्वरूप व कारणे समजून घेण्याचा प्रयत्न वैज्ञानिक करीत आहेत. ऑगस्टिन यांनी सांगितले की, पाण्याचे बर्फाचे किंवा कार्बन डायॉक्साईडचे बर्फ व धूळ यामुळे ते बनले असावेत पण ते सिद्ध करण्यासाठी अधिक उंचीवर असे ढग तयार होण्यासाठी आवश्यक असलेले प्रारूप मांडावे लागेल. युरोपीय अवकाश संशोधन संस्थेचे गार्सिया मुनोझ यांच्या मते हा ध्रुवीय प्रकाशाचा खेळ असावा कारण तेथे चुंबकीय क्षेत्रही जास्त आहे. ध्रुवीय प्रकाशातून बाहेर फेकल्या जाणाऱ्या प्रारणांनी ते ढग बनले असावेत. ◆◆◆

# ग्रहाचा जन्म होत असताना...

ग्रह-ताऱ्यांची निर्मिती ही एक दीर्घकालीन प्रक्रिया असते. अर्थातच, ग्रह- ताऱ्यांचे आयुष्यही अतिशय दीर्घ असते. ग्रहांची निर्मिती कशी झाली, याबाबत खगोल संशोधन जगतात नानाविध कल्पना व प्रमेये मांडली जातात. प्रत्यक्ष ग्रहाची निर्मिती होताना पाहण्याचा योगही संशोधकांना लाभलेला आहे. चिलीतील एका आंतरराष्ट्रीय संशोधकाच्या तुकडीने पृथ्वीपासून ३३५ प्रकाशवर्षे अंतरावरील एचडी १००५४६ या ताऱ्याभोवती निर्माण होत असलेल्या ग्रहाचे छायाचित्रण करण्यात यश मिळवले आहे.



चिलीत असलेल्या युरोपियन सदर्न ऑब्झर्व्हेटरीच्या महाकाय दुर्बिणीतून संशोधकांच्या पथकाने हा शोध लावला. सध्या धूलिकण आणि वायूच्या चकतीप्रमाणे दिसणारा हा ग्रह हळूहळू आकार घेईल, असे या संशोधकांनी म्हटले आहे. दुर्बिणीतून अत्यंत स्पष्टपणे दिसणारा हा वायूचा पट्टा एक ग्रहच असून, त्याचा आकार गुरूइतका असू शकेल, असे या संशोधकांचे म्हणणे आहे. आम्ही केलेले छायाचित्रण एका ग्रहाच्या निर्मितीचेच असेल तर असा योग इतिहासात पहिल्यांदाच जुळून येईल. यामुळे ग्रहांच्या निर्मिती अवस्थेतील वातावरणाचा अभ्यास करणे सहज शक्य होईल, असे स्वित्र्झलडमधील ईटीएच संस्थेचे प्रमुख संशोधक साशा क्वांझ यांनी सांगितले. एचडी १००५४६ हा आतापर्यंत अनेकदा संशोधनाचा विषय ठरला आहे. नव्याने निर्माण होत असलेला ग्रह या ताऱ्याच्या बाह्यकक्षेतून त्याला प्रदक्षिणा घालतो. तारा व ग्रह यांच्यातील अंतर पृथ्वी व सूर्यातील अंतराच्या सहापट असावे, असा अंदाज आहे. संशोधकांच्या अभ्यासानुसार, एखाद्या ताऱ्याची निर्मिती झाल्यानंतर त्याच्यापासून विलग राहिलेले वायू आणि धूलिकण यांच्या एकत्रीकरणातून ग्रहाची निर्मिती होते. सुरुवातीला एखादा पट्टा अथवा धूलिकणांच्या समूहाच्या स्वरूपात असलेल्या या ग्रहाला ताऱ्याभोवती फिरता फिरता आकार येतो. ◆◆◆



# वर्किंग स्ट्रेस धोकादायक

पैसे कमावण्यासाठी, चांगले काम करण्यासाठी किंवा आरोग्यासाठीही कष्ट करणे आवश्यक आहे, पण त्यालाही काही मर्यादा आहेत. कष्टाचा अतिरेक आरोग्यासाठी घातक असून त्यामुळे पक्षाघाताचा झटका येण्याची शक्यता असते, असे मत ब्रिटिश वैद्यकीय तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. सध्याच्या आधुनिक युगात अधिक पैसे कमाविण्यासाठी अधिक वेळ काम केले जाते, पण आठवडाभरात तुम्ही ५५ तासांपेक्षा अधिक वेळ काम केले, तर तुम्हाला नक्कीच पक्षाघाताचा झटका येण्याचा धोका संभवतो, असा दावा या तज्ज्ञांनी केला आहे.

लंडन विद्यापीठात 'साथीचे आजार' या विषयाचे प्राध्यापक असलेल्या मिका किविमाकी यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अधिक कष्ट आणि आजार या संदर्भात संशोधन केले आहे. अधिक वेळ काम केल्याने मेंदू आणि हृदयावर ताण पडतो आणि परिणामी पक्षाघाताचा झटका येऊ शकतो, असे किविमाकी यांनी सांगितले. या आरोग्यतज्ज्ञांनी युरोप, अमेरिका आणि ऑस्ट्रेलियामधील विविध स्त्री-पुरुषांचा अभ्यास केला. ज्या व्यक्ती आठवडाभरात ५५ तासांपेक्षा अधिक वेळ काम करीत होत्या, अशा काही व्यक्तींना हृदयविकाराची लक्षणे आढळली. अधिक कष्ट करणाऱ्या व्यक्तींना हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता १३ टक्क्यांनी अधिक असते, तर काही व्यक्तींना पक्षाघाताचा झटका येण्याची शक्यताही १.३ पट अधिक असते, असे किविमाकी यांनी सांगितले. या संशोधकांनी तब्बल ६,०३,८३८ व्यक्तींचा साडेआठ वर्षे अभ्यास केला. अधिक वेळ काम करणाऱ्यांना धूम्रपान, मद्यपान आदी व्यसने लागतात, पण त्याचबरोबर उच्च रक्तदाब, उच्च कोलेस्ट्रॉल आदी हृदयाशी संबंधित विकारही जडतात, असेही या संशोधकांनी सांगितले. एका आठवड्यात केवळ ३५ ते ४० तास काम करणे आवश्यक आहे. मात्र एखादी व्यक्ती जर ५५ तासांपेक्षा अधिक वेळ काम करीत असाल तर ते आरोग्यासाठी धोकादायकच आहे. अधिक कष्ट करणाऱ्या व्यक्तींमध्ये हृदयविकाराची लक्षणे आढळतात. प्रसंगी त्यांना पक्षाघाताचा झटकाही येऊ शकतो, असे ब्रिटिश शास्त्रज्ञ मिका किविमाकी यांनी सांगितले. ◆◆◆

# दीर्घकाळ उपाशी राहू शकणारे जीव

**जगण्यासाठी आहार आवश्यक असतो; मात्र काही लरवांमध्ये दीर्घकाळ आहार न घेताही तग धून राहण्याची नैसर्गिकच क्षमता असते. वाघ-सिंह असोत किंवा अजगर, एकदा त्यांचे पोट भरले की ते अनेक दिवस न खाता राहू शकतात. मात्र त्यांच्यापेक्षाही अधिक काळ आहार न घेता राहू शकणारे काही जीव निसर्गात आहेत. त्यांची ही माहिती...**



**मगर :** महिनाभर काहीही न खाता जगणाऱ्या प्राण्यांतध्ये मगरीचाही समावेश होतो. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांचे पचनदेखील खूप मंद असते,ज्यामुळे ते काहीही न खाता-पिता दीर्घकाळ जगू शकतात आणि शरीरातील ऊर्जा पातळी राखू शकतात. ◆





**पेंग्विन :** पेंग्विन ज्याठिकाणी राहतात तिथे तापमान इतके कमी असते की त्याची भूक आपोआप कमी होते. अशा परिस्थितीत ते २ ते ४ महिने काहीही खाल्ल्याशिवाय राहू शकतात. विशेष म्हणजे जेव्हा शून्यापेक्षा कमी तापमानात शिकारीची वेळ येते, तेव्हा नर पेंग्विन पिल्लांना उबदार ठेवण्यासाठी त्यांच्या जवळ राहतात आणि मादा शिकारीसाठी बाहेर पडतात. ◆



**कोमोडो ड्रॅगन :** कोमोडो ड्रॅगन हा प्राणी शिकार करण्यात अत्यंत कुशल समजला जातो. हा ड्रॅगन काहीही न खाता आठवडे किंवा महिनेही जगू शकतो. त्यांच्या तोंडातून अशी लाळ बाहेर पडते, ज्याचे विष काही मिनिटांत कोणाचाही जीव घेऊ शकते. हरणाचे पिल्लू असो वा शेळी, त्यांना गिळणे कोमोडो ड्रॅगनसाठी अवघड काम नाही. त्यांच्या शरीरात अन्न खूप हळू पचते. त्यामुळे ते कित्येक दिवस त्यावर जगू शकतात. ◆

**टार्डीग्रेड :** तुम्हाला वाचून आश्चर्याचा धक्का बसेल पण टार्डीग्रेड हा असा सूक्ष्म जीव आहे जो अन्नाशिवाय ३० वर्षे जगण्यास सक्षम आहे. हे जीव त्यांच्या शारीरिक हालचाली थांबवतात आणि त्यांच्यातील पाण्याचे प्रमाण केवळ ३ टक्के राहते. तेव्हा त्यांना अन्न मिळताच ते पुन्हा सक्रिय होतात. ◆





**वाळवंटी कासव :** जवळपास ५० ते ८० वर्षांपर्यंत जगू शकणारे वाळवंटातील कासव ५०-६० अंश तापमानातही आरामात जगतेच, शिवाय त्याला अनेक महिने पाण्याची गरजसुद्धा नसते, कारण ते आपल्या मूत्राशयात पाणी साठवून ठेवते. या पाण्यात ऊर्जेत रुपांतर करून ते त्यांच्या अन्नाची गरजही पूर्ण करतात. त्यामुळे हे कासव अनेक महिने खाल्ल्याशिवाय राहू शकतात. ◆

# प्राचीन महिलेच्या मकबऱ्याचा शोध

इजिप्तमध्ये वेळोवेळी हजारो वर्षांपूर्वीची थडगी, मकबरे सापडत असतात. काळाच्या ओघात टिकून राहिलेली ही प्राचीन स्मारके लोकांच्या कुतूहलाचा विषयही बनतात. आता इजिप्तमध्ये इसवी सनपूर्व २०३० ते १६४० या काळातील मध्य साम्राज्याच्या वेळेचा एक मकबरा पुरातत्त्व संशोधकांनी शोधला आहे. हा मकबरा इदी नावाच्या एका मुलीचा असून, ती स्थानिक गव्हर्नरची कन्या होती. तिचा मृतदेह एकामध्ये एक असलेल्या दोन शवपेट्यांमध्ये ठेवून दफन करण्यात आला होता. या मुलीचा एक पुतळाही तिथे सापडला आहे.



इजिप्तच्या प्राचीन कलाकृती व पर्यटन मंत्रालयाने याबाबतची माहिती प्रसिद्ध केली आहे. यूसीएलएममधील इजिप्शियन कला विभागाच्या प्राध्यापिका कॅथलिन कूनी यांनी सांगितले की, मध्य साम्राज्याच्या काळातील दोन सुंदर शवपेट्या सापडणे ही एक असामान्य गोष्ट आहे. या शवपेट्या अजूनही सुरक्षित आहेत व त्यावरील कलाही सुंदर आहे. या शवपेट्यांवर मृत व्यक्तीला परलोकात जाण्यासाठी मार्गदर्शन करणारा मजकूर लिहिलेला आहे. सास्काटचेवान युनिव्हर्सिटीतील इतिहासाच्या प्राध्यापिका कॅरोलिन अर्बुकल यांनी सांगितले की, या मजकुरावरून प्राचीन इजिप्शियन लोकांची मृत्यूपश्चात जीवनाबाबत कोणत्या संकल्पना होत्या, हे समजून घेण्यास मदत मिळेल. ज्या मुलीची शवपेटी सापडली आहे, ती इदी नावाची मुलगीइसवी सनपूर्व १९६१ ते इसवी सनपूर्व १९१७ या काळातील सेन्वोर्सेटच्या राजवटीत राहत होती. त्या काळात संपन्न प्रांतांपैकी एक असलेल्या अस्युतचा गव्हर्नर जेफायहापी याची ती कन्या होती. जुन्या काळात तिच्या मकबऱ्याची लूट झाली होती, असे दिसते; मात्र तिच्या सांगाड्याचे काही अवशेष अजूनही शिल्लक आहेत. या अवशेषांच्या अभ्यासातून असे दिसून आले की, मृत्यूवेळी ही महिला चाळीशीच्या आतच होती. ती जन्मतःच एका पायाने अधू होती. तिच्या शवपेट्यांपैकी सर्वात मोठी पेटी ८.६ फूट लांबीची असून, आतील लहान पेटी ७.५ फूट लांबीची आहे. त्यामध्ये इदीचीच मानली जाणारी एक लाकडी मूर्तीही सापडली आहे. ◆◆◆

## चिंचवडमध्ये घराणेशाही बंद करा तरच उमेदवार निवडून आणू

# माजी नगरसेवक व पदाधिकारी एकवटले..!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**चिंचवड :** राज्यात विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. आज पासून आचारसंहिता देखील लागू झाली आहे. असे असताना भाजपचा बालेकिल्ला असलेल्या चिंचवड विधानसभेत मात्र उमेदवारीवरून मोठा संघर्ष सुरू झाला आहे. जगताप कुटुंबियांच्या घराणेशाहीला विरोध करत चिंचवड मधील भाजपचे अनेक माजी नगरसेवक व पदाधिकारी एकवटले आहेत. आज झालेल्या बैठकीत 'जगताप' सोडून आमच्यापैकी कोणालाही एकाला उमेदवारी द्या..आम्ही काम तर करूच व निवडूनही आणू असा निर्धार देखिल यावेळी करण्यात आला. तसेच पक्षाने दखल न घेतल्यास आम्ही आमची ताकद दाखवून देऊ असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे. आज झालेले आहे बैठकीला माजी नगरसेवक चंद्रकांत नखाते, शत्रुघ्न काटे, संदिप कस्पटे, कैलास बारणे, सिद्धेश्वर बारणे, बाळासाहेब ओव्हाळ, माजी नगरसेविका माधुरी कुलकर्णी, सुनिता तापकीर, सविता नखाते यांसह भाजप युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष राज तापकीर, माजी शहर उपाध्यक्ष राम वाकडकर आदि प्रमुख उपस्थित होते.

या बैठकी संदर्भात माहिती देताना चंद्रकांत नखाते आणि शत्रुघ्न काटे म्हणाले की, चिंचवड विधानसभेत भारतीय जनता पार्टीला माननारा एक मोठा मतदार वर्ग आहे, की जो एखादी व्यक्ती किंवा घराणेशाहीला नाही तर पक्षाला, हिंदुत्ववादी विचारधारेला महत्व देतो. त्यामुळे एकाच कुटुंबात एकाच छताखाली राहणारे सख्ख्या दीर-भावजय यांना महत्वाची पदे देणे हे हिंदुत्ववादी विचारांवर मतदान करणाऱ्या मतदारांना आवडलेले नाही व आता तर ते बोलूही लागले आहेत. जशजशी विधानसभा निवडणूक जवळ येत चालली आहे, तसतसा चिंचवड विधानसभेतील जगताप परीवाराचा विरोध शमण्याऐवजी तो वाढतच चालला आहे. यापूर्वी भाजपाच्या गोटात यांच्या कार्यपद्धतीला व घराणेशाहीला विरोध करीत नगरसेवक तुषार कामठे, नवनाथ जगताप, नगरसेविका माया बारणे, चंदा लोखंडे, सीमा चौघुले यांनी भाजपला रामराम केला आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा असतील किंवा पक्षाचे आजपर्यंतचे सर्वच मोठे नेते यांनी नेहमीच एकाच कुटुंबात एकापेक्षा जास्त महत्वाची पदे देण्यास विरोध केला आहे. त्यामुळे भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाने देखिल घराणेशाहीला महत्व न देता एकाच कुटुंबात सर्व महत्वाची पदे देऊ नये, अशी एकमुखी मागणी या बैठकीत सर्वांनी केली. आणि 'जगताप' सोडून आमच्यापैकी कोणालाही एकाला उमेदवारी द्या..आम्ही काम तर करूच व उमेदवार निवडूनही आणू असा निर्धार देखिल यावेळी या सर्व नगरसेवक व पदाधिकारी यांनी केला आहे.

पक्षाच्या वरीष्ठांनी आम्हाला संपर्क केला आहे. परंतू आम्ही आमच्या भूमिकेवर ठाम आहोत आणि जर पक्षाने आमच्या मागणीची दखल घेतली नाही, तर आम्ही १४ ते १५ नगरसेवक वेगळी भूमिका घेऊन आमची ताकद दाखवून देऊ, असा इशारा देखील यावेळी सर्व नगरसेवक पदाधिकारी यांनी दिला आहे.

## Selected



### असंघटित कामगार विभाग शहराध्यक्षपदी रवींद्र ओव्हाळ

**पिंपरी :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे क्रियाशील पदाधिकारी रवींद्र कमल रामदास ओव्हाळ यांची असंघटित कामगार विभाग पिंपरी चिंचवड शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते रवींद्र ओव्हाळ यांना नुकतेच नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी असंघटित कामगार विभागाचे प्रदेशाध्यक्ष मनोज व्यवहारे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष योगेश बहल, शहर कार्याध्यक्ष फझल शेख, महिला शहराध्यक्ष कविता आल्हाट, युवती शहर अध्यक्ष वर्षा जगताप, शिक्षण मंडळाचे माजी सभापती विजय लोखंडे, माऊली मोरे, दीपक साकोरे आदी उपस्थित होते. युवा नेते पार्थ पवार यांनी देखील रवींद्र ओव्हाळ यांचे नियुक्ती बद्दल अभिनंदन केले. रवींद्र ओव्हाळ यांनी यापूर्वी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या चिटणीस पदावर आणि दहा वर्षांपेक्षा जास्त काळ राष्ट्रवादी शहर उपाध्यक्षपदी काम केले आहे.

### पिंपरी येथे खंडेनवमी निमित्त मशीन व टूल्स पूजनाचा कार्यक्रम संपन्न

**पिंपरी :** स्पार्क लाईन इक्विपमेंटस् प्रायव्हेट लिमिटेड, एमआयडीसी पिंपरी येथे खंडे नवमी निमित्त मशीन व टूल्स पूजनाचा कार्यक्रम अति उत्साहात पार पडला.या वेळी कॉन्शियस क्लीन अप" चा संकल्प सोडण्यात आला. यामध्ये कंपनीतील व ऑफिस मधील सर्व प्लास्टिक स्वतंत्रपणे गोळा करून महिन्याच्या शेवटी त्याची विभागणी करून रिसायकल करण्याचे ठरविले. यावेळी कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर शीतलकुमार दोशी, डायरेक्टर सिद्धार्थ दोशी ,वृषाली दोशी व परिवार उपस्थित होते. तसेच कंपनीतील सर्व व्यवस्थापक व स्टाफ हजर होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून श्री. आशिष जोशी पुणे, डॉक्टर सौरभ दोशी बारामती, प्राध्यापक दीपक जांभळे सासवड व श्री. हनुमंत कुंभार सासवड या सर्वांनी आपले प्रेरणादायी विचार कंपनी स्टाफ समोर मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री विकास रणवरे यांनी केले आभार संचालक श्री सिद्धार्थ दोशी यांनी मानले

### अरविंद एज्युकेशन सोसायटीत वाचन प्रेरणा दिन उत्साहात



**पिंपरी :** जुनी सांगवीतील अरविंद एज्युकेशन सोसायटीच्या लिटल फ्लॉवर इंग्लिश मीडियम स्कुल, भारतीय विद्यानिकेतन व ज्युनिअर कॉलेजमध्ये माजी राष्ट्रपती भारतरत्न ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. संस्थेच्या अध्यक्षा आरती राव यांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी सचिव प्रणव राव, भारतीय विद्यानिकेतच्या मुख्याध्यापिका आशा घोरपडे, लिटल फ्लॉवर इंग्लिश मीडियमच्या मुख्याध्यापिका नीलम पवार, लिटल फ्लॉवर प्री प्रायमरीच्या मुख्याध्यापिका पिंकी मनिकम, ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्य शीतल मोरे, पर्यवेक्षिका स्मिता बर्गे, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. 'वाचाल तर वाचाल' असे म्हणत आरती राव यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व सांगितले. तसेच वाचन आपल्याला संवादकौशल्य सुधारण्यात मदत करते. योग्य शब्दसंपदेमुळे वाक्यरचनेची समज वाढवते. वाचनामुळे एकाग्रता वाढवण्यास मदत होते. प्रणव राव यांनी डॉ. कलाम यांचा 'स्वप्न ते नव्हे जे झोपल्यानंतर पडते, तर खरे स्वप्न ते असते जे तुम्हाला झोपूच देत नाही, हा विचार सांगून विद्यार्थ्यांनी नेहमीच प्रयत्नशील राहिले पाहिजे, असे सांगितले.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## काळभोरनगर, मोहननगरची विजेच्या लपंडवापासून सुटका

**आमदार निधीचा 'पहिला निधी' कर्मभूमीत देऊ शकलो हे माझं मोठे भाग्य- आमदार अमित गोरखे**

**पिंपरी :** अंधारातून प्रकाशाकडे.. कधी काळी याच भागात अंधारात दिव्याखाली मी अभ्यास केला. काकडी विकली आणि आता आमदार



झाल्यांनतर माझा पहिला विकास निधी मला याच भागाला देता आला जिथं मी घडलो, त्या भागातील विकासासाठी मला काम करता आले हे मी माझे भाग्य समजतो अशा भावना आमदार अमित गोरखे यांनी व्यक्त केल्या.

निम्मित होते ते या परिसरातील ३० च्या ऐवजी ६० केव्हीचे २ ट्रान्सफार्मर आमदार अमित गोरखे यांच्या आमदार निधीतून पिंपरी चिंचवडमधील मोहननगर, काळभोरनगर भागाला देण्याच्या भूमिपूजन समारंभ पार पडले.

वर्षानुवर्षे मोहननगर, काळभोरनगर मधील नागरिक नवीन व अत्याधुनिक विजेच्या ट्रांसफार्मरची मागणी करीत होते. या मागणीची दखल घेत आमदार अमित गोरखे यांनी आपल्या आमदार निधीतून ट्रांसफार्मर बसविण्यात येत आहे. यावेळी आमदार अमित गोरखे यांनी आपल्या शालेय व बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच या पुढे आपल्या आमदारकीच्या कारकिर्दीत भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून संपूर्ण परिसराचा विकास करण्याचे आपले स्वप्न असल्याचे त्यांनी सांगितले.

या भूमीपूजन समारंभाला उपस्थितांमध्ये माजी नगरसेविका अनुराधा गोरखे, माजी नगरसेवक राजू दुर्गे, भाजपा शहर पदाधिकारी कैलास कुटे, गणेश लंगोटे, वैशाली काळभोर, विशाल काळभोर, मारुती भापकर, मनीषा शिंदे, दिलीप दातीर पाटील, दत्ता देवतरसे, विष्णू चावरिया, संजय जगताप, भास्कर पुणेकर, तुळशीराम काळभोर, मिनल यादव, रवि नामदे, राहुल बोरकर, राम दातीर, प्रशांत थरकुडे, संदीप बामने, प्रसाद हिरणवाळे, भाई भोसले, तुषार नामदे, कमलेश मुथा, नितिन चिलेकर, कमलेश लुंकड यासह पिंपरी चिंचवड परिसरातील नागरिक व भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मार्गदर्शन सभा...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पिंपरी :** विद्यार्थी वाहतूक संघटनेची वार्षिक महासभा व मार्गदर्शन शिबिर चिंचवड येथे नुकतेच संपन्न झाले. चिंचवड येथील प्रभू रामचंद्र सभागृह येथे संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात आली त्याप्रसंगी

## वाहतूक नियम काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना

# विद्यार्थी वाहतूक संघटनेची वार्षिक महासभा संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड विद्यार्थी वाहतूक संघटनेची वार्षिक महासभा व मार्गदर्शन शिबिर चिंचवड येथे नुकतेच संपन्न झाले. चिंचवड येथील प्रभू रामचंद्र सभागृह येथे संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात आली. सभेच्या सुरुवातीला उद्योगरत्न रतन टाटा व संघटनेतील मृत्यू झालेल्या सदस्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर वाहन चालक, मालक यांना काटेकोरपणे सर्व्हिस देण्याची शपथ ग्रहण करण्यात आली.

पिंपरी चिंचवड ब्लड डोनर्स असोसिएशनचे अध्यक्ष राजू शिवतारे, तानाजी धुमाळ, योगेश कांबळे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रादेशिक परिवहन अधिकारी संदेश चव्हाण, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, राहुल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तानाजी धुमाळ व योगेश कांबळे यांनी सभासद व चालक-मालक यांना वाहतूक सुरक्षा व शालेय वाहन देखभाल चालकांना मार्गदर्शन केले. तसेच स्कूलबस धोरण २०११ अनुषंगाने शालेय विद्यार्थी वाहतूक नियम काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी संघटनेचे एकूण सभासद १४८ पैकी शहरातील ४३ खाजगी व सरकारी शाळेतील २६७ सदस्य उपस्थित होते. या सर्वांच्या शंकेचे निरासन, तक्रारी, पुढील दिशा ठरवण्याची ग्वाही संघटनेचे अध्यक्ष सुनील लांडगे यांनी दिली. आणि अनपेक्षित घटना घडू नये याची काळजी घ्यावी. एखाद्या ड्रायव्हरचे चाल चलन वेगळे दिसले तर त्याला जागीच तंबी देऊन कामावरून काढण्याचा निर्णय घेण्यात आला. सर्वानुमते शहरात भविष्यात कुठलाही अनुचित प्रकार घडणार नाही. याची काळजी चालक मालक यांनी घ्यावी. येणाऱ्या अडचणींना एकजुटीने सामोरे जाऊ व महापालिका महाराष्ट्र सरकार यांच्याकडून आपल्याला काही सुविधा सुरु करता येतात का? याबाबतही चर्चा करण्यात आली आपला व्यवसाय असंघटित असल्यामुळे भविष्याच्या दृष्टीने पेन्शन किंवा अनुदान कसे मिळेल यासाठी प्रयत्न करण्यात यावा. कोरोना काळातील दोन वर्ष वाया गेल्यामुळे तो कालावधी वाढून मिळावा परमिट नूतनीकरण पासिंग व इतर प्रश्न सभेपुढे आले याचे निरसन आरटीओ तर्फे धुमाळ साहेब यांनी केले.

## बुथ कार्यकर्त्यांनी निवडणुकीची जबाबदारी पार पाडावी

# विधानसभेत बदल घडविण्यासाठी यंत्रणा सज्ज-अजित गव्हाणे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भोसरी :** निवडणुकीमध्ये केंद्र व बुथ प्रमुखांची जबाबदारी महत्वपूर्ण असून बुथ यंत्रणा सक्षम असेल तरच निवडणूक जिंकणे सोपे होते, त्यामुळे कार्यकर्त्यांनी बूथ यंत्रणेची जबाबदारी आत्मविश्वासाने पार पाडावी असे आवाहन स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केले. आपली बूथ यंत्रणा सक्षम आहे. आता केंद्रप्रमुख या संरचनेप्रमाणे आपल्याला निवडणुकीला सामोरे जायचे आहे. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर जो उमेदवार अधिकृतरित्या निवडणुकीला सामोरा जाणार आहे. त्यामागे ही यंत्रणा उभी करून भोसरी विधानसभेत आपल्याला बदल घडवायचा आहे. महाविकास आघाडीमध्ये एकजूट असून या एकजुटीतून भोसरी विधानसभेत महाविकास आघाडीचाच आमदार होणार असल्याचेही अजित गव्हाणे म्हणाले.

इंद्रायणीनगर येथील पर्ल बँक्वेट हॉल येथे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने बूथ व केंद्रप्रमुख, पदाधिकारी, माजी नगरसेवक यांची बैठक पार पडली. त्यावेळी अजित गव्हाणे बोलत होते. यावेळी महाविकास आघाडीचे आजी-माजी पदाधिकारी, पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**परिवर्तनाच्या लढाईतून बदल घडवायचा..**

● भोसरी मतदारसंघांमध्ये परिवर्तनाची लढाई आपण सुरू केली असल्याचे सांगून अजित गव्हाणे म्हणाले, भोसरी मतदारसंघातील भ्रष्टाचार, दडपशाही यामुळे येथील प्रत्येक नागरिक कंटाळलेला आहे. येथील प्रत्येक कामातील भ्रष्टाचार अनेक गैरसोयींसाठी कारणीभूत ठरत आहे. मतदार संघातील चहुबाजूच्या वाहतूक कोंडीने अक्षरशः येथील नागरिक मेटाकुटीला आला आहे. या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी आपल्याला परिवर्तन घडवायचे आहे.

अजित गव्हाणे यावेळी म्हणाले, प्रत्येक बुथ कार्यकर्त्यांनी गांभीर्याने घेऊन निवडणुकीची जबाबदारी पार पाडायची आहे. निवडणुकीची लढाई ही नेहमी कार्यकर्त्यांच्या जीवावर लढली जाते. कार्यकर्ते हाच निवडणुकीचा खरा कणा असतो. आपली बुथ यंत्रणा सक्षम आहे मात्र आता केंद्रप्रमुख या संरचनेप्रमाणे आपल्याला निवडणुकीला सामोरे जायचे आहे. राज्यात निवडणुकांचे बिगुल वाजले असून राज्यात निवडणुका देखील जाहीर झाल्या आहेत. त्यामुळे एकजुटीने कामाला लागायचे आहे.

# भोसरीतील कृष्णा जगदाळे याची विभागीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड पालिका व पुणे जिल्हा क्रीडा परिषद यांचा संयुक्त विद्यमाने शालेय जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धात उत्तम कामगिरी करणारा भोसरीतील डावखुरा गोलंदाज श्रीकृष्ण जगदाळे याची १४ वर्षांखालील विभागीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेमध्ये कृष्णा जगदाळे याची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. संगमनेर क्रीडा संकुल, संगमनेर येथे होणाऱ्या विभागीय निवड चाचणी स्पर्धेसाठी कृष्णाची निवड झाली आहे.

१४ वर्षाखालील मुलांचा जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धा नुकतीच पार पडली. या स्पर्धेत त्याने चमकदार कामगिरी केली. डाव्या हाताने जलदगती गोलंदाजी करणारा कृष्णा हा सिद्धेश्वर शाळेतील विद्यार्थी आहे. तो इयत्ता सहावीत शिकत असून, शालेय क्रिकेट स्पर्धेत त्याने सिद्धेश्वर हायस्कूल संघातून प्रतिनिधित्व केले होते. कृष्णा हा भोसरीतील आदिनाथ क्रिकेट क्लबचा खेळाडू आहे. तो दैनंदिन सराव प्रशिक्षक व वडील विजय जगदाळे यांचा मार्गदर्शनाखाली करीत आहे.

या कामगिरीबद्दल शाळेची मुख्याध्यापिका सुजाता सावंत, शिक्षक आदींनी पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देत अभिनंदन केले.

## पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघ

# काँग्रेसमधील इच्छुकांच्या मुलाखती पार पडल्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** विधानसभेच्या निवडणुकीचे पडघम वाजले आहेत. यामध्ये काँग्रेस पक्षाने आघाडी घेत सर्व मतदारसंघांमध्ये इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. महाराष्ट्र राज्याच्या सर्वच विधानसभा क्षेत्रात ज्या इच्छुक उमेदवारांनी पक्षाकडे उमेदवारी अर्ज केला होता त्या सर्वांची निरीक्षकांच्या उपस्थितीत मुलाखती पार पडल्या. याच




पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड व भोसरी मतदारसंघातील सर्व इच्छुक उमेदवारांची पुणे काँग्रेस भवन येथे निरीक्षक आमदार यशोमती ठाकूर यांनी मुलाखती घेतल्या.

याप्रसंगी पिंपरी चिंचवड शहर काँग्रेस अध्यक्ष डॉ. कैलास कदम, पुणे शहराचे अध्यक्ष अरविंद शिंदे, पुणे ग्रामीण काँग्रेसचे अध्यक्ष आमदार संजय जगताप, पुणे लोकसभा निरीक्षक अजित दरेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

चिंचवड (२०५) या मतदारसंघातून डॉ. कैलास कदम, संदेश नवले, तुकाराम भोंडवे, प्रियंका मलशेट्टी कदम, सज्जी वर्की, सायली नढे, शशी नायर, राजन नायर, भरत वाल्हेकर यांनी मुलाखती दिल्या. पिंपरी (२०६) मतदार संघातून विश्वनाथ जगताप, मनोज कांबळे, बाबासाहेब बनसोडे, गौतम आरकडे, शामला सोनवणे, ज्योती गायकवाड, डॉ. मनीषा गरुड, चंद्रकांत लोंढे, पंकज बगाडे, अर्चना राऊत यांनी तर भोसरी (२०७) मतदार संघातून सोमनाथ शेळके, विठ्ठल शिंदे, स्मिता पवार या सर्व इच्छुक उमेदवारांनी मुलाखती दिल्या.

पिंपरी चिंचवडमध्ये शहर काँग्रेसचे तळागाळात काम आहे व त्यामुळे काँग्रेस पक्षातील सर्वसामान्य कुटुंबातील कोणत्याही निष्ठावंत सैनिकास एकमताने उमेदवारी द्यावी अशी पक्षश्रेष्ठींना साद घालण्यात आली.

#रा

## आचारसंहिता लागण्यापूर्वी पिंपरी-चिंचवड

# महापालिकेत ८०० कोटींच्या कामांना मंजुरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी पिंपरी-चिंचवड महापालिकेत मंगळवारी अधिकाऱ्यांसह इतरांची चांगली धावपळ उडाली होती. स्थायी समितीच्या बैठकीमध्ये एकाच दिवसात तब्बल ८०० कोटी रुपयांच्या कामाच्या खर्चांना मंजुरी देण्यात आली आहे. शहरातील विविध विकास कामांच्या निविदा मंजूर करण्यासोबतच मंजूर झालेल्या कामांच्या वर्क ऑर्डर काढण्यासाठी ऑक्टोबरच्या पंधरवड्यात महापालिकेत सकाळपासूनच गर्दी दिसून येत होती. विशेषतः महापालिकेतील बांधकाम, नगररचना, लेखा, स्थापत्यसह अन्य विभागात मंगळवारी आचारसंहिता लागू होण्यापूर्वी लगबग पाहायला मिळाली.

महापालिका आयुक्तांकडून स्थायीच्या बैठकीत विषय मंजूर करून घेण्यात आले. त्यानंतर मंजूर केलेल्या कामांचे वर्क ऑर्डर देण्यासाठी आयुक्तांची सही घेण्यासाठी विभाग प्रमुखांसह अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची दिवसभर जोरदार धावपळ सुरू होती. महत्त्वाच्या आणि शहराच्या विकासाला आवश्यक असलेल्या विषयांचे प्रस्ताव तयार करून ते मंजुरीसाठी पालिका आयुक्तांच्या चौथ्या मजल्यावरील कार्यालयात घेऊन जात असल्याचे चित्र पाहायला मिळत होते. अधिकाधिक विकास कामे मार्गी लागावी, यासाठी संध्याकाळी उशिरापर्यंत काही विभाग आणि तेथील अधिकारी पालिकेत कार्यरत असल्याचे दिसून आले.

आचारसंहिता जाहीर झाल्यानंतर विविध कामांसाठी निविदा काढण्यास अडचणी येतात. या पार्श्वभूमीवर आपापल्या परिसरातील विविध विषय व कामे आचारसंहितेमध्ये अडकू नयेत, या कामांच्या वर्क ऑर्डर आणि निविदा आचारसंहितेपूर्वी मंजूर व्हाव्या, यासाठी विद्यमान खासदार-आमदारांसह माजी नगरसेवकांची आणि ठेकेदारांची चांगलीच धावपळ उडाली होती. धावपळ करणाऱ्यांमध्ये सत्ताधारी पक्षाचे पदाधिकारी आणि माजी नगरसेवकांची संख्या अधिक होती. आचारसंहिता सुरू झाल्यानंतर नव्याने कोणत्याही कामाची निविदा काढता येत नाही तसेच काम सुरू करण्याची परवानगीही दिली जात नाही. यामुळे आचारसंहिता काळात विकास कामे करताना प्रशासनाला मोठ्या प्रमाणात अडचणींना तोंड द्यावे लागते. हे टाळण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करून आचारसंहिता सुरू होण्यापूर्वी काम सुरू करण्याची परवानगी देण्याचे नियोजन महापालिकेच्या स्थापत्य विभागासह अन्य विभागात सुरू होती..

महापालिकेच्या विविध विभागात विकास कामांना मंजुरी दिलेल्या आहेत. त्यात निविदा प्रक्रियाही राबवलेल्या आहेत. मंजूर झालेल्या कामाचा कार्यारंभ आदेश काढण्यासाठी महापालिकेत धावपळ सुरू होती. आचारसंहितेमध्ये आपल्या भागातील विकासकामांच्या निविदा अडकून पडू नये, या निविदा मान्य होऊन काम सुरू करण्याची परवानगी मिळावी, यासाठी ठेकेदारांची गर्दी पालिकेत पाहायला मिळाली. महापालिका प्रशासनाने आचारसंहितेच्या धास्तीने कामाचा वेग वाढवला होता. महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीच्या बैठकांचा सपाटा लागलेला दिसून आला. या बैठकीमध्ये विविध कामांसाठी तब्बल ८०० कोटी रुपयांच्या कामाच्या खर्चांना मंजुरी देण्यात आली. आपले विषय मंजूर करून घेण्यासाठी विभागप्रमुखांसह अधिकारी व कर्मचाऱ्यांची धावपळ सुरू होती. जो तो फाइल घेऊन आयुक्तांच्या चौथ्या मजल्यावरील कार्यालयात जात असल्याचे चित्र पाहायला मिळत होते.

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागणार असल्याने महापालिकेत अधिकाऱ्यांसह काही बिल्डरांचीही धावपळ सुरू होती. निवडणुकीमुळे दीड महिना पुन्हा बांधकाम परवानगीच्या फाईल्स प्रलंबित राहणार आहेत. पुन्हा दिवाळीच्या तोंडावर गृहप्रकल्प लॉचिंग करता येणार नाहीत. त्याशिवाय नगररचना विभागातदेखील टीडीआरसह अन्य कामाच्या फाईल्सवर विभागप्रमुखांच्या सह्या करून घेण्याची गर्दी बघायला मिळत होती.विधानसभा निवडणूक आचारसंहिता कधीही लागेल, ही धास्ती राजकीय पक्ष व इच्छुकांना लागली होती. त्यामुळे आचारसंहितेपूर्वी जमेल तेवढ्या कामांना आणि त्यासाठी लागणाऱ्या अवाढव्य खर्चाला मंजुरी देण्याचा सपाटा प्रशासनामार्फत लावण्यात आला. सर्वसाधारणपणे आयुक्त शेखर सिंह दर आठवड्यात मंगळवारी बैठक घेऊन कामे मंजूर करतात. परंतु, मागील दोन आठवड्यात आयुक्तांनी बैठकांचा धडाकाच लावला आहे. यामध्ये सल्लागार संस्था नेमणे, मनुष्यबळ पुरविणे व स्वच्छताविषयक कामांना मुदतवाढ, रस्त्यांचे डांबरीकरण, नवीन रस्ते तयार करणे, जलवाहिनी टाकणे अशा कामांचा समावेश आहे.

## दृष्टीहीन मुलींचे सुसज्ज वसतिगृह

# आता विनामुल्य होणार विद्यार्थ्यांची सोय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**आळंदी :** फायसर्व्हने आळंदी येथे एनएफबीएम जागृती स्कूल फॉर ब्लाइंड गर्ल्स येथे एका नवीन वसतिगृह सुविधेचे उद्घाटन करण्यासाठी नॅशनल फेडरेशन ऑफ द ब्लाइंड महाराष्ट्रशी भागीदारी केली आहे. ही सुविधा व्यापक वयोगटातील दृष्टीहीन मुलींना विनामूल्य राहण्या-खाण्याची आणि शैक्षणिक साहाय्याची सुविधा प्रदान करून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वातावरण तयार करेल.

अंदाजे २ कोटी रु. च्या गुंतवणुकीसह फायसर्व्हचा उद्देश वेगवेगळ्या प्रमाणात व्हिज्युअल अक्षमता असणाऱ्या १२० पेक्षा जास्त वंचित मुलींना सक्षम बनवण्याचा आहे. हा उपक्रम केवळ निवासी मदत करण्यापुरता मर्यादित नसून त्यात शिष्यवृत्ती, शैक्षणिक संसाधने आणि इन्फ्रास्ट्रक्चर विकासाचा देखील समावेश आहे. या भागीदारीचा एक मुख्य भाग ब्रेल पब्लिशिंग सेंटरची स्थापना करण्याचा आहे, ज्याचा लाभ महाराष्ट्रातील सुमारे ७००० दृष्टीहीन विद्यार्थ्यांना होईल. या केंद्रामुळे विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्याची प्राप्यता वाढेल, जेणेकरून यशस्वी होण्यासाठीची साधने त्यांच्याकडे असतील ही खातरजमा होऊ शकेल.

उद्घाटन सोहळ्याच्या प्रसंगी ग्लोबल सर्व्हिसेस, फायसर्व्हचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर आणि सिनियर व्हाईस प्रेसिडेंट श्री. विशाल प्रतापवंत म्हणाले, "फायसर्व्ह येथे आमच्या कार्यस्थळी आणि व्यापक समुदायात समावेशकता आणि समता वाढविण्याबाबत आम्ही कटिबद्ध आहोत.

आमच्या जागतिक कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी कार्यक्रमामार्फत आम्ही समुदायांची पूर्ण क्षमता खुली करण्यासाठी त्यांच्याशी भागीदारी करतो. एनएफबीएम (NFBM ) जागृती स्कूल सोबत आम्ही राबवित असलेला उपक्रम अनोखा आहे, जो शिक्षण आणि सामाजिक समावेशाच्या छेदनबिंदूवर कार्यरत आहे.

# थेरगांव मध्ये 'खून का बदला खून'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**थेरगांव :** भावाचा खून केल्याच्या रागातून तरुणाने त्याच्या साथीदारांसोबत मिळून एका तरुणावर धारदार शस्त्राने वार करत दगडाने ठेचून त्याचा खून केला. ही घटना जगताप नगर थेरगाव येथे उघडकीस आली. साहिल राहुल साबळे (वय १८, रा. बौद्ध नगर, पिंपरी) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे.

याप्रकरणी साहिल याच्या आईने वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अरुण परदेशी (रा. काळेवाडी), ओमकार कामत, लक्ष्मण कोळी, साहिल (पूर्ण नाव पत्ता माहिती नाही), तीन अल्पवयीन मुले आणि त्यांचे साथीदार यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, साहिल साबळे याने मागील काही दिवसांपूर्वी गणेश उर्फ दादू शांताबाई रोकडे याचा खून केला होता. त्याचा राग मनात धरून या खुनाचा बदला घेण्याच्या उद्देशाने आरोपींनी कट रचून साहिल साबळे याला जगताप नगर थेरगाव येथे त्याच्यावर धारदार शस्त्राने वार केले. त्यानंतर दगडाने ठेचून त्याचा खून केला. वाकड पोलीस तपास करीत आहेत.

पान १ वरून

## महायुतीचा मविआवर हल्लाबोल

होते. आता २ कोटी ३० लाख महिलांच्या खात्यात पैसे गेले. नोव्हेंबर महिन्यात आचरसंहिता लागणार आहे, हे माहीत होते. त्यामुळे ते पैसे ऑक्टोंबर महिन्यात देऊन टाकले, असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. त्याचबरोबर शासन आपल्या दारी योजनेतून 5 कोटी लोकांना लाभ मिळाले. महायुती सरकारने दोन अडीच वर्षांत जे कामे केली आहे, ते समोर ठेवले आहे. दुष्काळग्रस्त भागात पाणी पोहचवण्याच्या योजना आम्ही आणल्या आहे. १४५ सिंचन योजना आम्ही आणल्या आहेत. दोन अडीच वर्षांत आम्ही ९०० निर्णय घेतले आहे, असंही त्यांनी सांगितलं आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ जाहीर झाल्यानंतर महायुतीने प्रचाराला सुरुवात केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून महायुतीच्या रिपोर्ट कार्डचे उद्घाटन मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थित झाले. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, रयत क्रांती संघटनेचे सदाभाऊ खोत, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, माजी विरोधीपक्षनेते प्रविण दरेकर उपस्थित होते.

## परिवर्तनासाठी जनता सज्ज- मनिष आनंद

अधिक बिकट बनले आहेत. प्रचंड वाहतूक कोंडी, रस्त्यांवरील खड्डे, अपूरा पाणीपुरवठा, कच-यांचे ढीग, वाढती गुन्हेगारी, प्रदुषण अशा नागरी प्रश्नांनी शिवाजीनगर मतदारसंघाचे नुकसान झाले आहे. त्यामुळे आता शिवाजीनगरमध्ये परिवर्तन हवे आहे. हा मतदारसंघ पुण्याच्या मध्यभागी येतो. या भागात नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येला सोयीसुविधा पुरविण्यात सत्ताधारी अपयशी ठरले आहेत. त्यामुळे समस्यांचा डोंगर वाढतच चालला आहे. शहरी भागात वाहतूक कोंडीसारखा विषय खूपच संवेदनशील बनला आहे. यासाठी मेट्रोचे कारण पुढे केले जात असले तरी प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे, ही वस्तुस्थिती आहे. त्यासाठी पर्यायी व्यवस्था करणे अपेक्षित होते. मात्र १० वर्षात सत्ताधाऱ्यांना तेही करता आले नाही. मतदारसंघात एकही सरकारी हॉस्पिटल नाही, येथील नागरिकांना ससून किंवा खासगी हॉस्पिटल्सवर अवलंबून राहावे लागते. या मतदार संघात पाण्याचा मोठा प्रश्न आहे. नागरिकांवर पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. जो लोकप्रतिनिधी दहा वर्षात नागरिकांच्या रस्ते, पाणी, वीज, आरोग्य या मूलभूत गरजा पूर्ण करू शकत नाही, ते मतदार संघाचा सर्वांगीण विकास करू शकतील? असा सवालही मनीष आनंद यांनी केला. शिवाजीनगर मतदार संघाला लागलेलं हे ग्रहण सोडविण्यासाठी कॉंग्रेसच्या माध्यमातून मला काम करायचे आहे. जनतेने पाहिलेले मतदार संघाच्या विकासाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी काम करायचे आहे. केवळ सत्तेच्या मागे लागलेल्या लोकप्रतिनिधींना याचाही विसर पडला आहे की, आपण ज्या मतदार संघाचे प्रतिनिधित्व करत आहे, त्याचं नाव शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघ ' आहे.

## पुणे शहरासाठी १ हजार नव्या ई-बसचा प्रस्ताव

हिंजवडी-शिवाजीनगर या मेट्रोच्या कामाचाही शुभारंभ केला. तसेच नुकतेच स्वारगेट-कात्रज या भूमिगत मार्गाचे भूमिपूजन झाले असून खडकवासला ते खराडी आणि नळस्टॉप ते माणिकबाग या दोन टप्प्यांना राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. एकीकडे मेट्रोचे जाळे विस्तारत असताना दुसरीकडे पीएमपीएमएलचे सक्षमीकरणही मोदी सरकारच्या माध्यमातून सातत्याने सुरू आहे. याचाच भाग म्हणून मोठ्या प्रमाणावर पुणे शहराला मोदी सरकारच्या माध्यमातून ई-बसेस प्राप्त झाल्या. आजवर ४५० हून अधिक ई-बसेस मोदी सरकारच्या माध्यमातून पुणे शहराला मिळाल्या आहेत. मेट्रोचे जाळे भक्कम होत असताना पीएमपीएमएलच्या बसेसची संख्या वाढावी आणि पुणेकरांना सार्वजनिक वाहतुकीच्या सोयी सहज, सुलभ आणि वेळेत उपलब्ध व्हाव्यात, यासाठी नव्या १ हजार ई-बसेसचा प्रस्ताव दिला आहे. मला विश्वास आहे, या प्रस्तावावर तातडीने कार्यवाही होऊन सकारात्मक निर्णय घेतला जाईल.

## एक हजार ग्रंथालयांना कायमस्वरूपी टाळे

असलेल्या 11 हजारहून अधिक ग्रंथालयांपैकी एक हजार ग्रंथालये तरी टिकतील का? हा प्रश्न उपस्थित केला जात आहे. सरकारी अनुदान वेळेवर येत नसल्याने ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना पगार देण्यासाठीही ग्रंथालयांकडे पैसे नाहीत. अनेक कर्मचाऱ्यांना नोकरी गमवावी लागली आहे. ऑक्टोबर महिना उजाडल्यानंतरही अनुदानाचा पहिला हप्ता ग्रंथालयांना मिळालेला नाही. ही परिस्थिती जाणून सरकारने अनुदानात वाढ करावी आणि अनुदान वेळेवर द्यावे, अशी मागणी केली जात आहे. शहरासह ग्रामीण भागातील ग्रंथालयांची स्थिती खुप कठीण आहे. काही ग्रंथालयांना कर्मचाऱ्यांना वेळेवर पगार देणेही अवघड होत आहे. आधी राज्यभरातील ग्रंथालयांमध्ये सुमारे 21 हजार 615 कर्मचारी कार्यरत होते. आता ही संख्या 20 हजारांवर आली आहे. काटकसर करुन ग्रंथालयांचा खर्च चालवला जात आहे. मराठीला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर सरकारने मिळणाऱ्या निधीतून ग्रंथालयाच्या सक्षमीकरणासाठी पाऊले उचलावीत, अशी मागणीही ग्रंथालय प्रतिनिधी करत आहेत.

# सेवा-सुरक्षा-समर्पण पंधरवड्यात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहराबद्दल तुम्हाला काय वाटते? शहरातील कोणते प्रकल्प तुम्हाला आवडतात? या प्रकल्पांमधून तुम्ही काय बोध घेतला? प्रकल्पांबद्दल तुम्हाला काय माहिती आहे? असे अनेक प्रश्न भोसरी परिसरातील शाळांमधील विद्यार्थ्यांसमोर ठेवले आणि तब्बल एक लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आणि आपली मते मांडली आहेत.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवसपासून ते महात्मा गांधी आणि लालबहाद्दूर शास्त्री यांच्या जयंतीपर्यंत देशभरात सेवा-सुरक्षा-समर्पण पंधरवडा साजरा केला जातो. समाजामध्ये सेवा कार्याचे महत्व वाढावे आणि राष्ट्राप्रती समर्पण भावना जागृत व्हावी. तसेच, नागरी सुरक्षाबाबत जनजागृती करावी. यासाठी भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून देशव्यापी उपक्रम राबवले जातात. भोसरी विधानसभा मतदार संघामध्ये आमदार महेश लांडगे यांनी हा उपक्रम सक्षमपणे राबवला. त्याला विद्यार्थी आणि शाळांनी मोठा प्रतिसाद दिला आहे.

सेवा सुरक्षा समर्पण पंधरवड्यामध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यात आले. भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकारातून शहरातील महापालिका आणि खासगी शाळांमध्ये निबंध, वक्तृत्व आणि चित्रकला स्पर्धांचे आयोजन केले होते.

यामध्ये विद्यार्थ्यांनी चक्क शहरात उभारल्या जाणाऱ्या संविधान भवनाबाबत निबंध आणि चित्रकलेतून आपले मत व्यक्त केले. या उपक्रमाच्या समन्वयक श्रद्धा पानमंद म्हणाल्या की, पिंपरी-चिंचवड शहराची भौतिक संरचना, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून साकारलेला 'वेस्ट टू एनर्जी' हा कचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्प, संविधान भवन व इंटरनॅशनल लायब्ररी समावेश असणार आहे.

## ३२ गावांची थकबाकी व दंडाच्या रकमेच्या...

या गावांमध्ये ग्रामपंचायतीच्या कराच्या दुप्पट असा कर आकारण्यासाठी शासनातर्फे पुनर्विलोकन सुरु आहे. हे पुनर्विलोकन होईपर्यंत ३२ गावांतील मिळकतकर वसुलीस स्थगिती देण्यात आली आहे.हे पुनर्विलोकन होईपर्यंत ३२ गावांतील मिळकतकर वसुलीस स्थगिती देण्यात आली आहे. समाविष्ट झालेल्या ३२ गावांमधील मिळकतकर आकारणीविरोधात आमदार भीमराव तापकीर आणि माजी आमदार विजय शिवतारे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार केली होती. तसेच शिवतारे यांनी मंगळवारी सकाळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. २३ जुलैला नऊ गावांना ग्रामपंचायतीच्या मालमत्ता कराच्या दुपटीपेक्षा जास्त कराची आकारणी करू नये, असा आदेश दिला होतो. हा आदेश २०२१ मध्ये समाविष्ट झालेल्या २३ गावांनाही लागू करावा, अशी मागणी केली. त्यानुसार मुख्यमंत्री शिंदे यांनी नगरविकास विभागाला कार्यवाहीचा आदेश दिला आहे.खडकवासला, पुरंदर, हडपसर या विधानसभा मतदारसंघात ही ३२ गावे आहेत. येथे सुमारे साडेचार ते पाच लाख मतदार पुणे महापालिकेच्या हद्दीत आहेत. त्यांना या निर्णयाचा फायदा होणार आहे.

## भाजप अध्यक्षाची निवड डिसेंबरअखेर

सदस्यत्व मोहीम १७ ऑक्टोबरपर्यंत चालणार आहे. यानंतर राज्यांमध्ये संघटनात्मक निवडणुका होतील. राज्यांमध्ये नवा अध्यक्ष निवडला जाईल. त्याचबरोबर ५० टक्के राज्यांतील निवडणुका संपल्यानंतर राष्ट्रीय अध्यक्षांच्या निवडीची घोषणा केली जाईल. लक्ष्मण हे निवडणूक अधिकारी असतील. राष्ट्रीय अध्यक्षांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर उमेदवारी अर्ज आणि मतदानाची तारीख जाहीर करण्यात येणार आहे. राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी एकच नाव आल्यास निवडणूक अधिकारी त्यांना पक्षाचा नवा राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून घोषित करतात. के. लक्ष्मण यांच्यासोबतच खासदार नरेश बन्सल, संबित पात्रा आणि राष्ट्रीय उपाध्यक्ष रेखा वर्मा यांना राष्ट्रीय सह-निवडणूक अधिकारी बनवण्यात आले आहे.जे. पी. नड्डा यांचा कार्यकाळ जूनमध्ये वाढवण्यात आला होता. नड्डा यांचा कार्यकाळ या वर्षी जानेवारीत संपला. लोकसभा निवडणुकीसाठी जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

## प्रशांत जोशी यांना पीएचडी प्रदान

ठिकाणी वास्तुशांत व विविध पोरौहित्य कार्यक्रम त्यांनी केले आहेत. वेदशास्त्र संपन्न दिलीप जोशी यांचे ते चिरंजीव आहेत.

## शासकीय कर्मचाऱ्यांची...

प्रश्नासंदर्भात चर्चा झाली. यावेळी काही महत्वाचे निर्णय देखील घेण्यात आले.

या बैठकीत केंद्रीय शासकीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्याबाबतही चर्चा झाली. या चर्चेनंतर अखेर शासकीय कर्मचाऱ्यांच्या डीएमध्ये ३ टक्क्यांनी वाढ करण्याच्या निर्णयाला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. त्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांना याचा लाभ होणार आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात (डीए) करण्यात आलेली वाढ ही १ जुलै २०२४ पासूनच लागू असणार आहे. म्हणजे थकबाकीसह हा महागाई भत्ता कर्माचाऱ्यांना देण्यात येणार आहे. तसेच याचा लाभ पेन्शन धारकांनाही मिळणार आहे.

# » Selected

## गाडीवर फटाका फोडल्याच्या कारणावरून तरुणास मारहाण

**वाकड :** गाडीवर फटाका फोडल्याच्या कारणावरून तरुणाला मारहाण केली. ही घटना नखाते वस्ती रहाटणी येथे घडली. शुभम मारुती नागरे (वय २२, रा. नखाते वस्ती, रहाटणी) यांनी याप्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार सिद्धार्थ त्रिभुवन (वय २४), साहिल त्रिभुवन (वय २२) आणि दोन अनोळखी इसम (सर्व रा. नखाते वस्ती, रहाटणी) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सिद्धार्थ याच्या गाडीवर फटाका फोडल्याचा राग आल्याने त्याने त्याच्या साथीदारांसह येऊन फिर्यादी शुभम यांना लाकडी बांबू आणि सिमेंटच्या गट्टूने मारहाण केली. कोयत्याचा धाक दाखवून शिवीगाळ केली. तसेच बघून घेण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. वाकड पोलीस तपास करीत आहेत.

## मलाबार गोल्ड अँड डायमंड्सचे शोरुम एंजेल्समध्ये झाले सुरू



**पुणे :** जगातील सर्वात मोठ्या दागिने निर्मात्या समूहांपैकी एक असलेल्या मलाबार गोल्ड अँड डायमंड्सचे अमेरिकेतील मुख्य शोरूम लॉस एंजेल्समध्ये सुरू झाले आहे. उत्तर अमेरिकेतील कंपनीच्या विस्तारातील हा मैलाचा दगड आहे. हे नवीन शोरूम मलाबार गोल्ड अँड डायमंड्स अमेरिकेतील सर्वात मोठे आणि पाचवे लोकेशन आहे.हा उद्घाटन समारंभ कॅलिफोर्नियाच्या काँग्रेसवुमन मिशेल स्टील यांच्या नेतृत्वाखाली झाला. यावेळी मलाबार ग्रुपचे अध्यक्ष एमपी अहमद, उपाध्यक्ष केपी अब्दुल सलाम, आंतरराष्ट्रीय कामकाज विभागाचे व्यवस्थापकीय संचालक शामलाल अहमद, उत्तर अमेरिका रिजनल हेड जोसेफ ईपन आणि व्यवस्थापनातील अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. हे शोरूम आर्टेशिया सिटी येथे ६,५०० चौरस फुटावर पसरलेले असून यामध्ये २० देशांतील ३०,००० दागिन्यांच्या डिझाईन आहेत. यात २५ एक्सक्लुझिव्ह ब्रँड्स विशेष आकर्षण ठरणार आहेत. तसेच ग्राहक आपल्या वैयक्तिक आवडीनुसार दागिने निवडू शकतात. उद्घाटनाच्या निमित्ताने हिरे आणि रत्नांच्या दागिन्यांच्या खरेदीवर ग्राहकांना हमखास सुवर्ण नाणे मिळणार असून ही ऑफर ३ नोव्हेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. यावेळी बोलताना मलाबार ग्रुपचे अध्यक्ष एमपी अहमद म्हणाले, "लॉस एंजेल्समधील आमचे मुख्य शोरूम हे दागिन्यांच्या खरेदीचा असामान्य अनुभव प्रदान करण्याप्रति आमचे समर्पण अधोरेखित करते. हे लोकेशन आमच्यासाठी विशेष महत्त्वाचे आहे कारण आमच्या विस्ताराच्या धोरणात उत्तर अमेरिकेला विशेष महत्त्वाचे स्थान आहे. या ऑक्टोबरमध्ये जगभरात २० नवे शोरूम उघडण्याची आमची योजना जाहीर करताना आम्हाला आनंद होत आहे. तसेच, जगातील आघाडीचे दागिने निर्माते होण्याच्या आमच्या ध्येयाकडे वाटचाल करताना आम्हाला मिळणाऱ्या आधाराबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत."मलाबार गोल्ड अँड डायमंड्सचे अमेरिकेतील सहावे शोरूम अटलांटा, जॉर्जिया येथे लवकरच सुरू होणार आहे. सॅन फ्रान्सिस्को, सिएटल, ऑस्टिन, टँपा, व्हर्जिनिया, डेट्रॉईट, ह्यूस्टन, शार्लोट, फिनिक्स, न्यूयॉर्क आणि सॅन डिएगो यांसारख्या शहरांना लक्ष्य करत कंपनीने विस्ताराची महत्वाकांक्षी योजना आखली आहे. हा ब्रँड कॅनडामध्ये ब्रिटीश कोलंबिया आणि अल्बर्टामध्ये आपली उपस्थिती वाढविणार आहे.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्ट मध्ये वर्णन केलेल्या मिळकती परिशिष्टात नमूद केलेल्या विद्यमान मालकांच्या मालकी वहिवाटीच्या असून, सदरील मिळकती आमचे अशिलांना कायम व खुष खरेदी देण्याबाबत आमचे अशिलांबरोबर त्यांनी बोलणी चालू आहे.

तरी सदरील मिळकतींमध्ये अन्य कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, बोजा, करार, लीन, मालकी, ताबा वा इतर अधिकार असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून दहा (१०) दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर सर्व अस्सल कागदपत्रांनिशी आमची खात्री करून द्यावी. सदरील मुदतीत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरील मिळकती पूर्णपणे निर्वेध व निजोखमी आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतींचा पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कुणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे ही जाहीर नोटीस.

**परिशिष्ट :** तुकडी पुणे, पोटतुकडी तालुका हवेली, जि. पुणे, मे. दुय्यम निबंधक साहेब, हवेली, पुणे, यांचे कार्यक्षेत्रातील तसेच जिल्हा परिषद पुणे, तालुका पंचायत समिती हवेली पैकी ग्रामपंचायत कल्याण यांचे हद्दीतील गाव मौजे, कल्याण येथील गट नं. ८२२ यांसी ७/१२ चे उताऱ्याप्रमाणे क्षेत्र ०५ हे. ८६ आर + पोटखराबा ०० हे. ४५ आर अशी मिळून एकूण क्षेत्र ०६ हे. ३१ आर क्षेत्राच्या मिळकतीपैकी खाली नमूद केलेल्या मिळकतींचा तपशिल खालीलप्रमाणे:-

| विद्यमान मालकांची नावे | मालकीचे क्षेत्र | मिळकतींच्या चतु:सिमा |
|---|---|---|
| श्री. इंद्रकुमार भिमराज छाजेड | ०० हे. ९० आर | पूर्वेस : गट नं. ८२४ ची मिळकत,<br>दक्षिणेस : गट नं. ८२३ ची मिळकत,<br>पश्चिमेस गट नं. ८२१ ची मिळकत,<br>उत्तरेस : गट नं. ८१७ ची मिळकत, |
| श्री. प्रणव नरेंद्र छाजेड | ०२ हे. २५ आर | |


गट नं. ९६६ मधून ३० फुटी रूंद रस्त्याच्या वापरासह व वहिवाटीच्या हक्कासह वर नमूद केलेल्या एकूण ०३ हेक्टर १५ आर क्षेत्राच्या मिळकती प्रस्तुतच्या जाहीर नोटीसीचा विषय असे.

स्थळ : पुणे
तारीख : १७/१०/२०२४
शिक्का

Adv. Harshal S. Patil
BSL., LL.B., LL.M.
Office Address: "Chambers 63" Office No- 702, 7th Floor, beside Family Court Pune, Opposite Shivajinagar District Metro Station Pune 411005
Mobile-8888898688/9923282334

## शरद पवार गटातूनच मोठा विरोध, लोकशाही धोक्यात आल्याची भावना

# हर्षवर्धन पाटील यांच्या अडचणी कायमच



■ नारायण ढावरे

**इंदापूर :** राजकारणात पक्ष, संघटनापेक्षा व्यक्ती आणि व्यक्तिमत्वाला सर्व सामान्य जनतेने महत्त्व दिले की, लोकशाही धोक्यात येते. इंदापूरच्या राजकारणात तेच घडत आहे. तालुक्यात दत्तामामा भरणे आणि हर्षवर्धन पाटील हे दोघे म्हणजेच पक्ष व संघटना व राजकीय सामाजिक समीकरण बनले आहे. मात्र, यंदा विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'उमेदवार बदला अन्यथा बंडखोरी करू' असा सज्जड दम दस्तुरखुद्द शरद पवार यांना त्यांच्याच पक्षाच्या नाराज गटाने दिल्याने, उमेदवारी बाबत ट्विस्ट वाढला आहे. निर्माण झालेल्या पेचप्रसंगामुळे पक्षीय पातळीवर हर्षवर्धन पाटील यांची उमेदवारी रेंगाळताना दिसत असल्याचे दिसून येते.

इंदापूर तालुका हा समाजवादी विचारसरणीचा पुरस्कार करणारा तालूका आहे.सन १९५२ पासून आजतागायत २०२४ पर्यंत उजव्या विचारसरणीच्या पक्ष संघटनाना यश आलेले नाही. २०१९ च्या निवडणुकीत हर्षवर्धन पाटील हे काँग्रेसमधून फुटून भाजपसारख्या उजव्या विचारसरणीच्या पक्षातून कमळ या चिन्हावर निवडणूक लढले. मात्र, केवळ १५०० ते २०००मताच्या फरकाने दत्तामामा भरणे विजय झाले. दत्तामामा त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार होते. बदलत्या काळात राजकीय पटलावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली. या फुटीच्या पार्श्वभूमीवर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उमेदवार म्हणून दत्तामामा भरणे यांची उमेदवारी निश्चित करण्यात आली असली, तरी शरद पवार यांचा गट आणि हर्षवर्धन पाटील यांची १ लाख मते मिळून उमेदवार निवडून येण्याची क्षमता हर्षवर्धन पाटील यांचेकडे असल्यानेच शरद पवारांनी इंदापूर येथे झालेल्या पक्ष प्रवेश सभेत हर्षवर्धन पाटील यांची उमेदवारी जाहीर करून राज्यातील पहिला निकाल घेतला. मात्र, नाराजी गटाने इशारा देताना जमवलेली गर्दी व उमेदवारी बदला अन्यथा बंडखोरी करु असा पवित्रा घेतल्याने जाहीर केलेल्या हर्षवर्धन पाटील यांच्या उमेदवारीची अद्याप निश्चिती करण्यात आलेली नाही. नाराजी गटाची नाराजी केवळ बोलून दूर होईल, अशी चिन्हे दिसत नाहीत. कारण तालुक्यातील पाणी, शेती, वीज, बेरोजगारी या मूलभूत प्रश्नांबरोबरच प्रशासन व अधिकारी यांची मनमानी पद्धतीने सुरू असलेला कारभार या कारणांमुळे तालुक्याचा "कारभारी बदला," अशी हाक देखील दिल्यानंतर जनतेने दिलेला प्रतिसाद हा चले जाव चा नारा वाटतोय.

सोनाई उद्योग समूहाचे प्रमुख दशरथ माने दादा, पीडीसी बँकेचे संचालक अप्पासाहेब जगदाळे, भरतशेठ शहा, प्रविण माने, उत्तम फडतरे, स्वामी समर्थचे चित्तरंजन पाटील, भाजपमधून बाहेर पडत शरद पवारांसोबत आलेले बाबासाहेब चवरे व इतर छोटे मोठे उद्योजक यांनी एकत्र येऊन भरणे आणि पाटील यांच्या तोडीस तोड गर्दी जमवून आपली ताकद दाखवून दिली आहे. तालुक्यामध्ये कर्मयोगी, निराभिमा साखर कारखाने, इंदापूर शिक्षण प्रसारक मंडळ, शिवाजी एज्युकेशन सोसायटी, शहाजीराव पाटील इंजिनिअरींग कॉलेज, इंदापूर बँक, दूधगंगा सहकारी, मोटार वाहतुक संघ हे व इतर संस्था, पंचायत समिती, नगरपालिका या हर्षवर्धन पाटील यांच्या वर्चस्वाखाली कार्यरत आहेत. दुसरीकडे दत्तामामा भरणे यांनी त्यांच्या दहा वर्षांच्या कालावधीत एकही सहकारी संस्था किंवा शैक्षणिक संस्था उभारली नाही, तसेच तिसरा नाराज गट हा तालुक्यातील मातब्बर असलेल्या जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ, सोनाई दूध, कटल फिड, तेल, गुळ, बजाज शोरुम, नारायणदास रामदास ट्रस्ट, कापड उद्योग, ग्लोबल एज्युकेशन संस्था व इतर सामाजिक, शैक्षणिक संस्था व्यक्ती यांचे पाठबळ असलेला प्रबळ गट आहे. त्यामुळे त्यांच्याकडे कोणालाही दुर्लक्ष करता येणार नाही.

तालुक्यातील पंचतारांकित एमआयडीसी मध्ये कंपनी व उद्योग धंदे यांची संख्या म्हणावी तशी नसल्याने रोजगार निर्मिती होत नाही. एमआयडीसी प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नावर, वालचंदनगर कंपनी कामगार आणि चवरे यांच्या बंद पाडलेल्या आणि लिलावात निघालेल्या इथेनॉल निर्मितीच्या हरणेश्वर साखर कारखाना याबाबत आजी माजी आमदार यांनी केवळ बोलाचा भात आणि बोलाची कढी असे केले. त्यामुळे घरादारावर वरवंटा फिरवला आहे. केवळ चवरे हे भाजपचे कार्यकर्ते आहेत म्हणून भरणे व पाटील यांनी हरणेश्वर कारखाना लिलावात काढला जावा, त्या सभासदांच्या शेती सातबारावर अर्थिक बोजे चढले, तरी हरणेश्वर कारखाना सुरू केला नाही. दुसरीकडे जंक्शन मिनी एमआयडीसी मंजूर झाली म्हणून फटाके फोडून सन्मान सोहळा घेताना भरणे यांना या प्रकल्पग्रस्त शेतकरी व हरणेश्वर कारखाना सभासदांच्या प्रपंचाचे काही सोयरसुतक नव्हतेच का? असा प्रश्न जनता उपस्थित करत आहे.

महायुती व महाआघाडी हे नावापुरतेच पक्ष आहेत. खरे पक्ष व संघटना ही भरणे व पाटील यांचीच राजकीय सद्दी ठरविणारी आहे. मात्र, येथील जनता आता तिसऱ्या आघाडीच्या प्रतिक्षेत आहे. उमेदीच्या व महत्वाकांक्षी नाराज गटाला संभाळणे व सामावून घेणे तसेच कार्यकर्त्यांना नियंत्रणात ठेवणे हे शरद पवार यांना शक्य होणे कठीण दिसत आहे. इंदापूर तालुक्यातील राजकीय पेचप्रसंग व परिस्थिती काहीअंशी स्फोटक अशीच आहे. इंदापूर तालुका हा समाजवादी विचारसरणीचा पुरस्कार करणारा आहे, हे नेत्यांना विसरून चालणार नाही.




### विरोधकांच्या घरावर जप्तीची कारवाई

● सुवर्णयुग सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून व इतर पतसंस्थांनी सर्वसामान्य सभासद व कर्जदार यांना वाटप केलेले कर्ज थकीत झाल्याने विरोधक शोधून त्या विरोधकांच्या कर्जदारांच्या घरावर जप्ती करण्याची कारवाई धडाक्यात सुरू केली आहे. त्यातच विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये आमदार दत्तात्रय भरणे यांच्या बद्दल नाराजी व्यक्त होत आहे.

---

## पुरंदर हवेलीची जागा भाजपला मिळावी; अशोक टेकवडे यांची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पुरंदर हवेली विधानसभेच्या जागेसाठी भाजपा वरिष्ठ पातळीवर प्रयत्न करत असून, युतीमध्ये ही जागा भाजपाला मिळाल्यास, या विधानसभेचा आमदार विजय होईल, असे माजी आमदार अशोक टेकवडे यांनी पत्रकार परिषदेमध्ये सांगितले.

सासवड येथील पक्ष कार्यालयात आयोजित पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी जालिंदर कामठे, निलेश जगताप, संतोष जगताप, गंगाराम जगदाळे, पंडीत मोडक यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

निलेश जगताप म्हणाले की, ही जागा भाजपला मिळावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र, युतीमध्ये ही जागा मित्र पक्षाला मिळाल्यास, आम्ही निवडणुकीत सर्व सहकार्य करून उमेदवाराला जास्तीत जास्त मतदान कसे होईल, याचा प्रयत्न करू. येत्या १९ तारखेला पुरंदर हवेली विधानसभा मतदारसंघातील पक्षाचा मेळावा आयोजित करण्यात आला असून, या साठी वरिष्ठ पातळीवर पदाधिकारी उपस्थित रहाणार आहेत. जिल्हाध्यक्ष वासुदेव काळे यांच्यासह केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ हे देखील



उपस्थित राहणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

या जागेसाठी इच्छुक भरपूर असून, वरिष्ठ पातळीवर जो निर्णय घेतला जाईल तो आम्हाला मान्य असेल, असे जालिंदर कामठे यांनी सांगितले. संतोष जगताप यांनी आभार मानले.

### हिरवाईचे लेणे

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**सातारा :** सातारा येथील डोंगरमाथे आता हिरवाईचे लेणे घेऊन पसरलेले दिसत आहेत. हे नयनरम्य दृश्य पाहण्यासाठी पर्यटकांची पावले सडा वाघापूरच्या कुशीतील रामघळकडे वळू लागल्याचे दिसून येते. (छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे)

## श्री खंडोबाचरणी नॅक पियर समितीचे सदस्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**जेजुरी :** महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या तीर्थक्षेत्र जेजुरीच्या श्री खंडोबा मंदिराला तसेच शरदचंद्र पवार कला महाविद्यालयास राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाण परिषदेच्या समितीने नुकतीच भेट दिली. यावेळी त्यांचे स्वागत आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानच्या जेजुरी येथीलअहिल्यादेवीच्या प्रांगणात महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर सनई व चौघडाच्या निनादात, फेटे बांधून आणि नवदुर्गेची विविध रूपे साकारलेल्या विद्यार्थिनींनी व पारंपारिक पोशाखातील वेशभूशेत विद्यार्थ्यांनी केले. जेजुरीगडावर देवसंस्थानच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. तेलंगणा राष्ट्रीय मूल्यांकन समिती अध्यक्ष डॉ व्हीबी धारकेश्वर, गुजरात समन्वयक सदस्य डॉ अश्विन पुरोहित, तामिळनाडू स्वागत समन्व्यक डॉ नलप्पण रमण यांनी श्रीखंडोबा देवाचे दर्शन घेत गडाची पाहणी केली. आचार्य अत्रे प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय कोलते, महाविद्यालय प्राचार्य डॉ धनाजी नागणे, डॉ बालाजी नाटकरे, संस्था सहसचिव बंडूकाका जगताप, संस्था ट्रस्टी माई कोलते, ॲड अण्णासाहेब खाडे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले, तर विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

## कोथळेत २१ लाखांच्या रस्त्याचे भूमिपूजन संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**जेजुरी :** पुणे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून कोथळे ते जगताप वस्ती या २१ लाख रुपयांच्या रस्त्याचे भूमिपूजन माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाराम जगदाळे यांच्या हस्ते झाले.

मागील अनेक वर्षांपासून कोथळे ते जगताप वस्ती रस्त्याचे अर्धवट काम झाले होते. कोथळेच्या सरपंच जयश्री प्रकाश भोईटे यांच्या प्रयत्नातून हा निधी उपलब्ध झाला. जिल्हा नियोजन सदस्य प्रकाश भोईटे, निवृत्त बांधकाम अभियंता पोपट जगताप, कोथळेच्या उपसरपंच अलका जगताप, ग्रामपंचायत सदस्य अनिल जगताप, समीर भंडलकर, रंभाई शिपिंग ट्रस्टचे

अध्यक्ष हनुमंत काळाने, मल्हार शिक्षण मंडळाचे संचालक ज्ञानेश्वर जगताप, तंटामुक्ती उपाध्यक्ष सतिश जगताप तसेच रावसिंग जगताप, सुरेश जगताप, विलास जगताप, मोहन जगताप, रोहिदास भोईटे, श्रीकांत जगताप, बबन जगताप, विशाल कुदळे

आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन शिवस्नेह फाउंडेशनचे अध्यक्ष संदिप जगताप यांनी केले, तर आभार सोमनाथ काकडे यांनी मानले.

## बारामती बाजार समितीमध्ये सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्राचा शुभारंभ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बारामती :** बारामती कृषि उत्पन्न बाजार समिती मध्ये १५ ऑक्टोबर २०२४ रोजी बारामती मुख्य आवारातील यांत्रिक चाळणी येथे हमीभाव सोयाबीन खरेदी केंद्राचा शुभारंभ सभापती सुनिल पवार यांचे हस्ते करण्यात आला. केंद्र शासनाचे किमान आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत नाफेड मार्फत हंगाम २०२४-२५ मध्ये मुग, उडीद, सोयाबीन खरेदीसाठी नाव नोंदणी सुरू असुन १५ तारखेपासुन सोयाबीन खरेदी सुरू करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील मूग, उडीद, सोयाबीन उत्पादक शेतक-यांनी ऑनलाईन नोंदणी केली नाही अशा शेतकऱ्यांनी मुदतीत नाव नोंदणी करावी असे आवाहन बारामती बाजार समितीने केले आहे. ज्यांनी नोंदणी केली आहे. अशांना मेसेज द्वारे शेतमाल घेऊन येणेची तारीख कळविणेत येते. त्याच दिवशी शेतक-यांनी खरेदी केंद्रावर आपला माल आणावा. पहिल्या दिवशी ६ शेतक-यांचे ४० क्विंटल सोयाबीन खरेदी करणेत आले. वाळलेला व स्वच्छ असलेला शेतमाल खरेदी करणेत येणार आहे.

यावेळी मार्केटींग फेडरेशन पुणे जिल्हा पणन अधिकारी श्री. पवारसाहेब, बाबालाल काकडे निरा कॅनॉल संघाचे चेअरमन सतिश भैय्या काकडे, सदस्य राहुल जगताप तसेच अधिकारी अमोल कदम, प्रशांत मदने आणि बाजार समितीचे सदस्य दत्तात्रय तावरे, विभाग प्रमुख सुर्यकांत मोरे उपस्थित होते.


### Selected



### सासवडला वाचन प्रेरणा दिवस उत्साहात

**सासवड :** माजी राष्ट्पती एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त १५ ऑक्टोबर हा वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सासवड शाखा व आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानच्या वतीने वाचन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यात पन्नासहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. भोर, हवेली, पुरंदर तालुक्यातील विद्यार्थी व शिक्षक या उपक्रमात सहभागी झाले. छोट्या गटातील प्रथम तीन तसेच मोठया गटातील प्रथम तीन विद्यार्थ्यांना बक्षिसे वितरीत करण्यात आली. सहभागी विद्यार्थ्याला पुस्तक व प्रमाणपत्र देण्यात आले. डॉ सुरेश कोडीतकर, मोहिनी लोणकर व मोहन साळवी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. बक्षीस वितरण कार्यक्रमात तीनही परीक्षकांनी मनोगत व्यक्त केले. संगीता रिकामे व अशोक दिक्षित या शिक्षकांनी व दुर्गा राऊत, ऋतुजा क्षीरसागर, प्रज्वल धायगुडे या विद्यार्थ्यांनी विचार मांडले. सासवड साहित्य परिषदेचे कार्यवाह सतीश पाटील यांनी उपक्रमाबद्दल माहिती देत वाचनाचे महत्व सांगितले. परिषदेचे अध्यक्ष ॲड दिलिप निरगुडे यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व सांगत या उपक्रमाला चांगला प्रतिसाद दिल्याबद्दल धन्यवाद व्यक्त केले. संदिप टिळेकर यांनी सुत्र संचालन केले तर वसंत ताकवले यांनी आभारप्रदर्शन केले. छोट्या गटात श्रावणी शितोळे, अंकिता तांबे व संस्कृती चिकणे, तर मोठ्या गटात साक्षी सणस, दुर्वा राऊत, प्रिया बाठे, श्रावणी खेडेकर व प्रज्वल धायगुडे यांनी बक्षिसे मिळवली. डॉ राजेश दळवी, कलाताई फडतरे, संतोष काकडे, बाळासाहेब मुळीक, केशव काकडे, हेमंत ताकवले, कुंडलिक मेमाणे या साहित्य परिषदेच्या सदस्यांसह मनोहर कामठे, सुनील जायकर, मनीषा कुंजीर, अर्चना यादव सुनील देशपांडे , अप्पा बरकडे,अक्षय पवार, विविध विद्यालयाचे विद्यार्थी शिक्षक मोठया संख्येने यावेळी उपस्थित होते.

### बूथ कार्यकर्ता मेळावा उत्साहात



**बारामती :** डोर्लेवाडी येथे काटेवाडी, कन्हेरी, गुणवडी, डोर्लेवाडी, मळद, निरावागज, तसेच बारामती तालुक्यातील सर्व गावातील बूथ कार्यकर्ता संवाद आणि प्रशिक्षण मेळावा या कार्यक्रमात युगेंद्र पवार यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. निवडणुकीत बूथ कार्यकर्ता हा महत्वाची भूमिका बजावत असतो. बूथ कमिटीच्या माध्यमातून जास्तीस जास्त नागरिकांना मतदानासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन त्यांनी केले. येत्या काळात योग्य नियोजन करून प्रत्येक बूथवरून जास्तीतजास्त मतदान शरदचंद्र पवार गटाच्या उमेदवारास मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू, असे आवाहन त्यांनी केले. माजी पुणे जिल्हा परिषद अध्यक्ष सतीश खोमणे, माजी नागराध्यक्ष सदाशिव सातव, युवक अध्यक्ष प्रशांत बोरकर यांच्यासह बूथ पदाधिकारी आणि कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.

---

### सलग दुसऱ्या वर्षी सन्मानित

**रोख रक्कम रुपये ५० हजार, स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.**



## बिजवडी प्राथमिक आरोग्य केंद्राला पुरस्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** महाराष्ट्र राज्य आयुक्त, आरोग्य सेवा आणि अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र तसेच महाराष्ट्र राज्य गुणवत्ता आश्वासन कक्ष आणि जिल्हा परिषद, पुणे यांच्या वतीने बिजवडी (ता. इंदापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास सलग दुसऱ्या वर्षी आरोग्य क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल कायाकल्प पुरस्काराने गौरविण्यात आल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ. सुश्रुत श्रेणिक शहा यांनी दिली.

माजी राज्यमंत्री तथा विद्यमान आमदार दत्तात्रय भरणे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, जिल्हा बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे, जिल्हा परिषदेचे माजी आरोग्य व बांधकाम सभापती प्रविण माने, माजी जिल्हा परिषद सदस्य अभिजित तांबिले, कर्मयोगी कारखान्याचे उपाध्यक्ष भरत शहा, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नूतन प्रदेश सरचिटणीस तथा प्रवक्ते विधीज्ञ राहुल मखरे यांनी सलग दुसऱ्यांदा हा मानाचा पुरस्कार प्राप्त केल्या बद्दल प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी डॉ. सुश्रुत शहा व सर्व सहकाऱ्यांच्या कामाचे कौतुक करून अभिनंदन केले.

तत्कालीन केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याणमंत्री जेपी नड्डा यांनी 'स्वच्छ भारत मिशन'चा विस्तार म्हणून 'कायाकल्प पुरस्कार योजना सुरू केली. रोख रक्कम रुपये ५० हजार, स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. देशातील सार्वजनिक आरोग्य सेवा सुविधांमध्ये स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि संसर्ग नियंत्रण पद्धती सुधारणे आणि उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सुविधांना प्रोत्साहन देणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे.

पुणे जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन देसाई, डॉ. वामन गेंगजे, डॉ. बालाजी लकडे, डॉ. सचिन एडके, डॉ. अभय तिडके, प्रमोद गायकवाड, रुपाली केजकर यांच्या मार्गर्शनाखाली प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आदर्श कामगिरीचा आलेख दिवसेंदिवस वाढत असल्याची भावना डॉ. सुश्रुत शहा यांनी यावेळी व्यक्त केली.

याप्रसंगी डॉ. समता सरवदे, प्रवीण क्षिरसागर, देवेंद्र उत्तेकर, बनसिद्ध कुंभार, बालाजी गडदे, सुलभा काळे, रिजवाना तांबोळी, प्रतिक लोंढे, अतुल तोंडे, संदीप रायपूरे, आनंद लांडगे, प्रवीण पोंदकुले, शिवाजी गोळे, प्रदिप गोलांडे, रेणुका जाधव व सर्व सहकाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे हा पुरस्कार मिळाल्याचे डॉ. सुश्रुत शहा यांनी सांगितले.

इंदापूर तालुक्यातील बिजवडी सोबतच निरवांगी, लासुर्णे, पळसदेव, निरनिमगाव, काटी येथील आरोग्य केंद्रांनाही या पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल तहसीलदार जीवन बनसोडे, गटविकास अधिकारी सचिन खुडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुरेखा पोळ, विस्तार अधिकारी संतोष बाबर, सचिन जाधव यांनी समाधान व्यक्त केले तसेच इतर आरोग्य केंद्रांनीही यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन केले. बिजवडी प्राथमिक आरोग्य केंद्रास देश पातळीवरील सर्वोच्च पुरस्कार मिळवून देण्यासाठी आम्ही सर्व कटिबद्ध असल्याचे डॉ. सुश्रुत शहा यांनी सांगितले.

#रा

मुख्य आरोपीसह टोळी जेरबंद ; १८ दुचाक्या हस्तगत

# हरलेल्या पैशांच्या भरपाईसाठी बुलेट चोरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चाकण : :** ऑनलाइन गेममध्ये हरलेल्या पैशांची भरपाई करण्यासाठी महागड्या बुलेट दुचाक्या चोरणाऱ्या चोरट्यासह त्याची संपूर्ण टोळी चाकण पोलिसांनी जेरबंद केली असून त्याच्याकडून तब्बल ११ बुलेट आणि इतर ७ दुचाकी जप्त करण्यात आली आहेत. यातील मुख्य आरोपी हा युट्युबवरील बुलेट चोरीचे व्हिडिओ पाहून चोरी करत असल्याचे पोलीस तपास निष्पन्न झाले आहे.


चाकण पोलिसांनी हस्तगत केलेल्या दुचाक्या व जेरबंद टोळी ( रत्नेश शेवकरी, महाळुंगे )

अभय सुरेश खर्डे (वय २३, रा. झोळे, ता. संगमनेर, जि. अहमदनगर, सध्या रा. गुंजाळवाडी रोड, संगमनेर, जि. अहमदनगर) असे अटक केलेल्या मुख्य आरोपीचे नाव आहे. तसेच चोरीच्या गाड्या विक्रीसाठी मदत करणारे रविंद्र निवृत्ती गव्हाणे (वय २३, रा. आंजनापूर, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर), शुभम बाळासाहेब काळे (वय २४, रा. कोळपेवाडी, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर), यश नंदकिशोर थुट्टे (वय २२, रा. चिखली, जि. बुलढाणा. सध्या रा. अशोकनगर, नाशिक), प्रेम भाईदास देवरे (वय २०, रा. अशोकनगर, नाशिक) यांनाही पोलिसांनी अटक केली आहे. आरोपींकडून चोरीच्या २६ लाख रुपयांच्या १८ दुचाकी हस्तगत केल्या आहेत.

मुख्य आरोपी अभय सुरेश खर्डे हा ऑनलाइन गेम खेळायचा. ऑनलाइन गेममध्ये अभय हा लाखो रुपये हरला होता. लाखो रुपये गेममध्ये हरल्याने तो बुलेट चोरीकडे वळला. युट्युबवरील बुलेट चोरीचे व्हिडिओ पाहून बुलेट चोरी करायला शिकला. अभय बुलेट चोरून मित्रांच्या मदतीने काही हजारात बुलेट विकत असे, मिळालेल्या पैशांमधून पुन्हा ऑनलाइन गेम खेळायचा. अखेर काही बुलेट चोरीची प्रकरण चाकण पोलिसात गेल्याने अभय याचे चोरीचे कारनामे उघडकीस आले आहेत.

या चोरट्याकडून २६ लाख रुपयांच्या ११ बुलेट आणि इतर ७ दुचाकी जप्त करण्यात आल्या असल्याची माहिती चाकणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद वाघ व सहा. पोलीस निरीक्षक प्रसन्न जराड यांनी दिली.

दरम्यान बुलेटला किंमत मिळत असल्याने यातील मुख्य आरोपी सहसा बुलेटची चोरी करीत होता. चाकण परिसरातून केवळ बुलेट दुचाक्या चोरी होत असल्याने बुलेट दुचाकी मालक चांगलेच धास्तावले होते.

# रस्त्याच्या प्रश्नासाठी प्रचारालाही बंदी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** आमच्या परिसरातील नागरिकांच्या सार्वजनिक समस्या दूर व्हाव्यात यासाठी ग्रामपंचायत सदस्य झालो, पण साधा आमच्या वस्तीकडे जाणारा रस्ताही करू शकलो नाही. अधिकाऱ्यांची आश्वासने भरपूर झाली. लोकप्रतिनिधींनी फक्त ऐकून घेतले पण कार्यवाही केली नाही. या सर्व प्रकाराला कंटाळून ग्रामपंचायत सदस्यतेचा राजीनामा देऊन आमच्या भागात सर्व पक्षाच्या प्रचारासाठी बंदी करून मतदान न करण्याची भूमिका कोऱ्हाळे बुद्रुक (ता. बारामती) येथील सदस्य राजेंद्र पवार यांनी घेतली आहे.




प्रचारासाठी प्रवेश बंदीचा मोठा फलक तयार करून लावला आहे. यावर रस्त्याची झालेली दुरवस्थेचे फोटो आणि या भागातील रहिवाशांसाठी जोपर्यंत रस्त्याची समस्या सुटत नाही, तोपर्यंत कोणीही प्रचारास येऊ नये, आम्ही मतदान करणार नाही, अशा आशयाचा बोर्ड लावण्यात आला आहे.

येथील दलित वस्ती मधिल रोहिदास नगरकडे जाणाऱ्या वहिवाटीच्या रस्त्यावर अडथळा निर्माण केला आहे. परिणामी सुमारे ३० कुटुंब असलेल्या वस्तीचा मार्ग बंद झाला आहे. पावसाळ्याच्या दिवसात या भागातील रहिवाशांच्या घराकडे वाहने जात नाहीत, चालत जाणेसुद्धा मुश्किल ठरते. एखादा व्यक्ती मयत झाल्यानंतर घरापासून अधिक अंतरावर अंतयात्रा काढावी लागते. आमच्यावर अन्याय सुरू आहे. यामुळे नगर भूमापन कार्यालयाकडे कागदपत्रांची मागणी करून पाहिले असता, सदर रस्ता सिटीसर्वे नोंद असल्याचे दिसून आले. कायदेशीररित्या तो खुला व्हावा, याबाबत ग्रामपंचायत स्तरावरून पंचायत समिती बारामती यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. अधिकाऱ्यांच्या याबाबत बैठकाही झाल्या. १७ फेब्रुवारी २०२२ रोजी झालेल्या बैठकीत रस्त्यावरील अतिक्रमण काढून खुला करण्याचे आश्वासन दिले गेले. परंतु ते पूर्ण झाले नाहीत.

माझ्या भागातील रहिवाशांची अडचण पाहता याबाबत वेळोवेळी प्रशासनाकडे दाद मागितली परंतु संबंधित अधिकाऱ्यांनी यावरून कोणताही तोडगा काढला नाही सार्वजनिक समस्यांकडे लक्ष द्यायला तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांकडे वेळ नाही यासाठी आमच्या परिसरातील सर्वांनी एकमुखी निर्णय घेऊन प्रचाराला बंदी केली आहे माझी नैतिक जबाबदारी म्हणून मी माझ्या ग्रामपंचायत पदाचा राजीनामा दिला आहे, असे राजेंद्र पवार यांनी सांगितले.

# पिंपरी पेंढार येथे दुसरा बिबट्या जेरबंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** जुन्नर तालुक्यातील पिंपरी पेंढार येथे सुशीला रमेश डेरे या महिलेला ठार करणाऱ्या बिबट्याला पकडण्यासाठी वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात आज दुसरा बिबट्या जेरबंद झाल्याची माहिती वनक्षेत्रपाल प्रदीप चव्हाण यांनी दिली. दरम्यान, पकडलेला बिबट्या नर असून, त्याला माणिक डोळे येथील निवारा केंद्रात हलवण्यात आले आहे. त्याचे वय सुमारे सहा वर्षे असल्याचे चव्हाण यांनी सांगितले.

प्रदीप चव्हाण म्हणाले की, १० तारखेला सकाळी पावणेसहा वाजण्याच्या सुमारास घराच्या बाहेर काम करत असलेल्या सुशीला रमेश डेरे या महिलेवर बिबट्याने झडप घालून त्यांना फरपटत नेऊन ठार केले होते. आपल्या पत्नीची बिबट्यापासून सुटका व्हावी म्हणून रमेश डेरे यांनी शर्तीचे प्रयत्न केले होते. बिबट्याच्या डोक्यात बांबू मारल्याने बिबट्या पळून गेला होता. मात्र, गळ्याला गंभीर झाल्याने महिलेचा जागीच मृत्यू झाला होता. या घटनेमुळे वन खात्याने पिंपरी पेंढार परिसरामध्ये ३० पिंजरे १० ट्रॅप कॅमेरे व ५० वन कर्मचाऱ्यांची टीम दिवस-रात्र तैनात ठेवली होती. उपवनसंरक्षक अमोल सातपुते व सहाय्यक उपवनसंरक्षक स्मिता राजहंस या घटनेवर लक्ष ठेवून होते.

घटना घडल्याच्या दोन दिवसांनी एक बिबट्या पकडण्यात वन विभागाला यश आले होते. दोन्हीपैकी नरभक्षक बिबट्या नेमका कोणता? हे तपासणीअंती स्पष्ट होईल.

# सेसच्या निर्णयाचे स्वागत!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात शेतीमाल खरेदी-विक्रीवर आकारला जाणारा कर (सेस) कमी करण्याचा निर्णय राज्य शासनाने सोमवारी घेतला होता. त्यानंतर १२ तासांत मंगळवारी हा निर्णय रद्द केला. सेस कपातीच्या निर्णयामुळे राज्यातील बाजार समित्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले असते. महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाने याबाबत पाठपुरावा करून शासनाच्या निदर्शनास वस्तुस्थिती आणून दिली. या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो, असे पुणे कृषी उपत्न्न बाजार समितीचे सभापती दिलीप काळभोर यांनी सांगितले.

बाजार आवारात शंभर रुपयांच्या खरेदीवर व्यापाऱ्यांना किमान ७६ पैसे आणि कमाल एक रुपया सेस जमा करावा लागतो. सेस कमी करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. किमान २५ पैसे आणि कमाल ५० पैसे सेस भरण्याचा अध्यादेश शासनाने काढला होता. या निर्णयाला महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाने विरोध दर्शविला होता. या अध्यादेशामुळे राज्यातील बाजार समितींचे अस्तित्व धोक्यात येईल. त्यामुळे संबंधित अध्यादेश मागे घेण्याची विनंती करण्यात आली होती, तसेच या निर्णयाविरोधात न्यायालयात दाद मागण्याचा इशारा राज्य बाजार समिती सहकारी संघाने दिला होता.

बाजार समिती सहकारी संघाचा विरोध विचारात घेऊन शासनाने सेस कपातीचा अध्यादेश मागे घेण्याचा निर्णय घेतला. राज्य शासनाने सेस कपातीचा निर्णय घेतल्यानंतर व्यापारी वर्गाने आनंद व्यक्त केला होता. त्यानंतर मंगळवारी अध्यादेश मागे घेण्यात आल्याने व्यापाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. सेस कपात करण्यासाठी दी पूना मर्चंट्स चेंबरसह महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर (मुंबई), फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (मुंबई), चेंबर ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्रीज अँड ट्रेड, दि ग्रेन, राईस अँड ऑईल सीड्स मर्चंट्स असोसिएशनकडून महाराष्ट्र राज्य कृती समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने सेस कमी करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला होता.

शिरुरच्या सहाय्यक निबंधकांनी बजावली सुनावणीसाठी नोटीस

# पतसंस्थेचे दोन संचालक अपात्र करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिरूर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था जिल्ह्यात सर्वात जास्त उलाढाल असणारी शिक्षक पतसंस्था असताना अलीकडील काळात संस्थेचे काही संचालक बेजबाबदारपणे वागत असल्याने, बेजबाबदार वागणाऱ्या तसेच कर्ज थकबाकी असणाऱ्या, गैरहजर राहणाऱ्या दोन संचालकांना अपात्र करण्याची मागणी पतसंस्थेचे सभासद शंकर शिंदे यांनी शिरुरच्या सहाय्यक निबंधकांकडे केली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, शिरूर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था जिल्ह्यात सर्वात जास्त उलाढाल असणारी शिक्षक पतसंस्था म्हणून ओळखली जाते. सदर पतसंस्थेचे काही संचालक कर्ज थकबाकीदार असून, सभेचे नोटीस मिळून देखील तीन पेक्षा जास्त वेळ गैरहजर राहत असल्याचा आरोप करत बबन संपत म्हासळकर व नंदकिशोर निवृत्ती पडवळ या दोन संचालकांना अपात्र करण्याची मागणी शंकर मल्हारी शिंदे यांनी शिरुर तालुका सहाय्यक निबंधक अरुण साकोरे यांच्याकडे केली होती. या मागणीमध्ये संचालक स्वतः थकबाकीदार असून मासिक सभांनाही अनुपस्थित असताना, त्यांच्यावर कोणतीही कारवाई न करता सर्वसामान्य सभासदांना कर्ज वसुलीसाठी नोटिसा पाठवण्यात आल्या असल्याचे वार्षिक अहवालावरून समोर आल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. सदर प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी देखील शंकर शिंदे यांनी केली आहे. सदर बाबीची दखल घेत सहाय्यक निबंधक यांनी संबंधित दोन संचालकांचे सदस्यत्व रद्द करण्याबाबत सुनावणीची नोटिस बजावली असल्याने आता सहाय्यक निबंधक काय निर्णय देतात याकडे संपूर्ण तालुक्यातील शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

# दिपाली चकोर यांचे निधन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**शिक्रापूर :** कोरेगाव भीमा (ता. शिरुर) येथील दिपाली खंडू चकोर (४५) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पती, एक मुलगा, एक मुलगी, सासू असा परिवार आहे. कोरेगाव भीमाचे सामाजिक कार्यकर्ते व पोलीस मित्र खंडू चकोर यांच्या त्या पत्नी होत.

# सणसर परिसरात सप्टेंबर महिन्याचे रेशनचे धान्यच नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भावानीनगर :** सणसर (ता. इंदापूर) येथील अनेक रेशन कार्डधारक सप्टेंबर महिन्यातील रेशनच्या धान्यापासून वंचित राहिलेले असून, या ग्रामस्थांमध्ये सध्या संतापाची भावना निर्माण झालेली आहे.

राज्य सरकार जीवाचा आटापिटा करून विधानसभेच्या निवडणुकीला सामोरे जात आहे. अशा परिस्थितीत विधानसभेच्या निवडणुकीच्या तोंडावर इंदापूर तालुक्यातील सणसर परिसरातील सुमारे ४० टक्के ग्रामस्थांना सप्टेंबर महिन्यामध्ये रेशनवरील धान्यच मिळालेले नाही. सप्टेंबर महिन्यामध्ये ३० सप्टेंबरला रेशनचे धान्य रेशन दुकानांमध्ये आले. दुसऱ्या दिवशी ऑक्टोबर महिना सुरू झाल्यामुळे ई पॉज मशीनमध्ये सप्टेंबर महिना बंद होऊन ऑक्टोबर महिना सुरू झाला. त्यामुळे रेशन दुकानदारांना त्या महिन्याचे धान्य ग्रामस्थांना वितरण करता आले नाही. ते धान्य वितरण करण्याचा रेशन धान्य दुकानदारांनी ऑक्टोबरमध्ये प्रयत्न केला असता, ई पॉस मशीन बंद झाल्या.

ऑक्टोबर महिना सुरू झाल्यामुळे सप्टेंबर महिना मशीनमध्ये येत नाही, त्यामुळे ऑनलाइन धान्य वितरण करण्यामध्ये अडथळा निर्माण झाला आहे. सप्टेंबर महिन्यातील रेशनचे धान्य मिळवण्यासाठी अनेक रेशनकार्ड धारक ग्रामस्थ रेशन दुकानदारांकडे हेलपाटे मारत आहेत. मात्र, ऑनलाईन धान्य वाटप करता येत नसल्यामुळे सप्टेंबर महिन्यातील धान्याचे वितरण थांबलेले आहे.

> सप्टेंबर महिन्याचे धान्य उशिरा आल्यामुळे ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने वाटप करण्याची परवानगी मिळावी, अशी मागणी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे केली आहे. याबाबत दोन-तीन दिवसांमध्ये निर्णय होईल.
>
> -सोपान गड्डमवार, नायब तहसीलदार इंदापूर

शासनाकडून महिना अखेरला धान्य आल्यामुळे अनेक ग्राहक सप्टेंबर महिन्यातील रेशनच्या धान्यापासून वंचित राहिलेले आहेत. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची भावना आहे. सप्टेंबर महिन्याचे धान्य ऑफलाइन पद्धतीने रेशनधान्य दुकानदारांना वाटप करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांमधून केली जात आहे.

अनेक गुणवंत विद्यार्थ्यांना पीएचडी, मेडल, प्रदान करण्यात येणार

# एमआयटी चा ६ वा दीक्षांत समारंभ १९ ऑक्टोबर रोजी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचा ६ वा दीक्षांत समारंभ शनिवारी (दि. १९) दुपारी ४ वा विश्व सभामंडप, वर्ल्ड पीस डोम, विश्वराजबाग, लोणीकाळभोर, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. या वर्षी ५,३६९ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येणार आहेत. तसेच विज्ञान क्षेत्रात आयुष्यभर केलेल्या अतुलनीय कार्याबद्दल भारत सरकारचे प्रधान वैज्ञानिक सल्लागार पद्मश्री डॉ. कृष्णस्वामी विजय राघवन यांना "एमआयटी डब्ल्यूपीयू विज्ञान महर्षी सन्मान" देऊन गौरविण्यात येणार आहे.

MIT-ADT UNIVERSITY PUNE, INDIA A leap towards World Class Education

या समारंभासाठी केंद्रीय सांस्कृतिक आणि पर्यटनमंत्री गजेंद्रसिंह शेखावत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील. तसेच माईर्सचे संस्थापक विश्वस्त प्रा. पी. बी. जोशी, एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, माईर्सच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश तु कराड व एमआयटी डब्ल्युपीयूचे कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस उपस्थित राहणार आहेत.

या दीक्षांत समारंभात अभिजीत पवार याला 'फाउंडर प्रेसिडेंट मेडल' व अनुश्री कुलकर्णी हिला 'एक्झिक्युटिव्ह प्रेसिडेंट मेडल' ने गौरविण्यात येणार आहे. तसेच १२२ विद्यार्थ्यांना सुवर्ण पदक, ८५ रौप्य व ८५ कास्य पदक असे एकूण २९५ विद्यार्थ्यांना मेडल बहाल करण्यात येणार आहे. तसेच २६ विद्यार्थ्यांना पी.एचडी देण्यात येणार आहे. यामध्ये ४३५ विद्यार्थी मेरीट लिस्ट मधील आहेत.


अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, कम्प्यूटर सायन्स ॲण्ड इंजीनियरिंग, रामचरण स्कूल ऑफ लिडरशीप बिझनेस, ईकॉनॉमिक्स ॲण्ड कॉमर्स, स्कूल ऑफ गर्व्हनमेंट, हेल्थ सायन्य अँड टेक्नॉलॉजी, सायन्स अँड एनवोर्मेन्टल स्टडीज, डिझाइन, लिबरल ऑर्टस,लॉ आणि कॉन्शसनेस या व्यतिरिक्त अन्य शाखेतील विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येणार आहेत, अशी माहिती एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कुलसचिव प्रा. गणेश पोकळे आणि परिक्षा नियंत्रक डॉ. राहुल जोशी यांनी दिली.

#रा

## Selected

# आर्यन पुंडेची भालाफेकसाठी निवड

**शिक्रापूर :** कान्हूर मेसाई (ता. शिरुर) येथील विद्याधाम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील आर्यन पुंडे या खेळाडूची भालाफेल स्पर्धेसाठी पुणे विभाग स्तरावर निवड झाली असल्याची माहिती प्राचार्य विनोद शिंदे यांनी दिली आहे. कान्हूर मेसाई येथील विद्याधाम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील आर्यन पुंडे याने राजे शिवछत्रपती क्रीडानगरी बालेवाडी पुणे येथे झालेल्या जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत भालाफेक या क्रीडा प्रकारात सतरा वर्षे वयोगटात सहभाग घेतलेला असताना, त्याने बावन्न मीटर भालाफेक करून पुणे जिल्ह्यात द्वितीय क्रमांक मिळवला. त्यामुळे त्याची पुणे विभाग स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे. प्रतिकूल परिस्थिती असताना जिद्द व मेहनतीच्या जोरावर आर्यनने हे यश मिळविले आहे. प्रकाश चव्हाण व चंद्रकांत धुमाळ यांनी त्याला मार्गदर्शन केले, तर आर्यनच्या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा अंजली घोलप, सचिव सदाशिव पुंडे, प्राचार्य विनोद शिंदे, पर्यवेक्षक मनोज धुमाळ, सरपंच राजश्री रुपनेर, उपसरपंच योगेश पुंडे, शिरूर तालुका क्रीडा संघटनेचे अध्यक्ष शरद दुर्गे यांसह आदींनी आर्यनसह मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.





# शिक्रापूरच्या कोयाळी पुनर्वसनची शाळा जिल्ह्यात भारी

**शिक्रापूर :** महाराष्ट्र शासनाने शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात पुणे विभाग स्तरावर शिक्रापूरच्या कोयाळी पुनर्वसन जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने तृतीय क्रमांक मिळवला असून, शिक्षणमंत्री दिपक केसरकर यांच्या हस्ते ११ लाखांचे बक्षीस देऊन गौरविण्यात आले असल्याची माहिती शाळेचे मुख्याध्यापक संतोष विधाटे यांनी दिली आहे. शिक्रापूर येथील कोयाळी पुनर्वसन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षेत नियमित यश संपादन करणारी शाळा असा नावलौकिक मिळवलेली शाळा असून, या वर्षी शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेचे ७७ विद्यार्थी पात्र ठरल्याने मोठ्या प्रमाणात शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी असणारी जिल्ह्यातील ही एकमेव शाळा आहे. सदर शाळेने गुणवत्ता राखत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत बाजी मारली. शाळेची भौतिक सुविधा, क्रीडा सुविधा, रंगरंगोटी, परसबाग, विविध स्पर्धा यांसह याब्बळ ३८ मुद्दे सदर मुल्यांकन साठी ठेवण्यात आलेले होते. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात पुणे विभाग स्तरावर तिसरा क्रमांक मिळवला.



# खेडमध्ये साकारणार ज्ञानराई

**म्हाळुंगे:** खेड तालुक्याचे स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे यांचे खेड तालुक्याचे शाश्वत व पर्यटन विकासाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी चाकण-आळंदी रोडला असलेल्या वन विभागाच्या जमिनीवर ऑक्सिजन पार्कची निमिर्ती करण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितिन गोरे यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे प्रस्ताव देऊन पाठपुरावा घेतला होता. याबाबत मुख्यमंत्री व वनमंत्री यांनी संबंधित विभागाला तात्काळ प्रस्ताव सादर करण्याचे आदेशही दिले होते. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांच्याकडेही मागणी करून वनविभाग व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची संयुक्त बैठक घेऊन हा प्रकल्प दोन्हीही विभागाकडून एकत्रित करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करुन निधी बाबत व अन्य सर्व बाबींसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पुढाकार घेतला होता. दोन्ही विभागांमध्ये सकारात्मक बैठका होऊन याबाबतच्या प्रकल्प अहवालास महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांच्याकडून अंतिम मंजुरी मिळाली असून, ज्ञानराई वनउद्यान या नावाने सदर प्रकल्प होणार आहे.

# कार्यकर्त्यांना उमेदवारी मिळणार की नाही?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आपल्या गटाच्या उमेदवारांला तिकीट मिळावे. यासाठी नेत्यांचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र, त्यामुळे जुन्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजी पसरली आहे. एनसीपी शरदचंद्र पवार पक्षाच्या होम पिचवर म्हणजेच पुणे जिल्ह्यात उमेदवारी मिळवण्यासाठी जोरदार स्पर्धा सुरू झाली आहे. स्थानिक नेतृत्व, निष्ठावंत आणि आयाराम यांच्यात प्रचंड चुरस पाहायला मिळतेय.

बालेकिल्ला असलेल्या पुणे जिल्ह्यातल्या २२ जागांपैकी १४ जागांवर शरद पवारांच्या राष्ट्रवादीने दावा ठोकलाय. त्या जागांसाठी इच्छुक उमेदवारांची संख्याही मोठी आहे. फुटीच्या



काळात शरद पवारांसोबत राहिलेल्या कार्यकर्त्यांना उमेदवारी मिळणार? की नव्याने पक्षात येणाऱ्यांचा विचार होणार? यावरून सूप्त संघर्ष निर्माण झाला आहे. रोहित पवारांनी बाहेरून येणाऱ्या उमेदवारांसाठी जास्त आग्रह धरला आहे. मात्र, स्थानिक नेत्यांनी याला विरोध केला आहे. जागावाटप पूर्ण झाले नसल्याचे सांगत शरद पवार त्यांची बोळवण करत आहेत.

पुणे जिल्ह्यात शरद पवारांच्या पक्षाने मोर्चेबांधणी केली आहे. जुन्नर, खेड, भोसरी, चिंचवड आणि हडपसर विधानसभा मतदारसंघासाठी शरद पवारांचा पक्ष आग्रही आहे. पिंपरी, वडगाव शेरी, मावळ, आंबेगाव, पर्वती, खडकवासला मतदारसंघाचा तिढा जवळपास सुटला आहे. जुन्नरमधून अतुल बेनके आणि भोसरीतून अजित गव्हाणेंसाठी रोहित पवार आग्रही आहेत. चिंचवडमध्ये उमेदवारीसाठी जयंत पाटील यांनी नाना काटे यांच्या नावाचा आग्रह धरला आहे, तर रोहित पवार राहुल कलाटे यांच्यासाठी आग्रही आहेत. त्यामुळे शरद पवारांच्या भूमिकेकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. नेत्यांमधील सुप्त संघर्षाचा निकाल शरद पवार नक्कीच लावतील. पवारांनी निवडणुकीचा सुकाणू त्यांच्या हाती घेतला असल्याचे मानले जाते.

## मुख्यमंत्री शिंदे यांचा पुनरुच्चार; ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू देणार नाही

# मराठा समाजाला मी आरक्षण देणार!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मी जे बोलतो ते करतो. मराठा समाजाला मी स्वत:, आम्ही आरक्षण देणार आहे. मराठ्यांना ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता आरक्षण दिले जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

ते गुरुवारी महायुतीच्या संयुक्त पत्रकार परिषदेत बोलत होते. राज्यातील विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर आज महायुतीने पत्रकार परिषद घेतली. या वेळी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी महायुती सरकारने केलेल्या कामांचा लेखाजोखा आज पत्रकार परिषदेत मांडला.

या वेळी शिंदे यांना मनोज जरांगे यांच्या आंदोलनाबाबत प्रश्न विचारण्यात आला. आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीसमोर जरांगे यांच्या रुपाने मराठा समाजाचे मोठे आव्हान असेल. त्याचा सामना कसा करणार, असे त्यांना विचारण्यात आले. त्यावर शिंदे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, 'हे बघा आम्ही जे बोलतो ते करतो. मी स्वत: मराठा समाजाला आरक्षण देणार, तेदेखील ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता. मी दसरा मेळाव्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला वंदन करून मराठा आरक्षण देण्याची शपथ घेतली. त्यानंतर तात्काळ विधानसभेचे अधिवेशन बोलवून मराठा समाजाला आरक्षण देण्यात आले. यापूर्वी देवेंद्र फडणवीस यांनीही मराठा समाजाला आरक्षण दिले होते, ते आरक्षण कोणी घालवले, ते कुणाला न्यायालयात टिकवता आले नाही. आतादेखील आम्ही आरक्षण दिले आहे, ते रद्द करण्यासाठीही आटापिटा सुरू आहे, असे सांगत शिंदे यांनी विरोधकांना टोला लगावला.

### 'लाडक्या बहिणी'ला हात लावाल, तर..!

● लाडकी बहीण योजनला मोठा प्रतिसाद आहे. सर्व लाडक्या बहिणी महायुती सरकारच्या पाठिशी आहेत. ही योजना 'गेम चेंजर' झाली आहे; मात्र विरोधक ही योजना बंद करण्यासाठी न्यायालयात जात आहेत. महाविकास आघाडी आमच्या सर्व योजना बंद करण्याची भाषा करीत आहे; परंतु लाडकी बहीण योजनेला हात लावला तर याद राखा, त्यांचा करेक्ट कार्यक्रम होणार आहे. आमच्या लाडक्या बहिणी **त्यांचा करेक्ट कार्यक्रम करणार आहे, असे शिंदे म्हणाले.**



मराठवाड्यात कधी कुणबी प्रमाणपत्र मिळत नव्हते. आम्ही न्या. संदीप शिंदे समिती स्थापन केली. इतकी वर्षे ज्यांच्या हातात संधी होती, सत्ता होती, त्यांनी कधी मराठा समाजाला आरक्षण दिले नाही. फक्त मतांसाठी मराठा समाजाचा वापर केला. जरांगे पाटील हे मराठा समाजाला न्याय देण्यासाठी रस्त्यावर उतरले; पण त्यांनी हा विचार केला पाहिजे, की महायुतीने काय काय दिले,सारथी दिले. अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळ दिले. ओबीसी समाजाप्रमाणे मराठ्यांना सवलती देण्यात आल्या. हे सगळे कोणी केले? मराठा समाजाला कोणी वंचित ठेवले आणि कोणी दिले, याचा विचार जरांगे यांनी करायला पाहिजे, असा सल्ला त्यांनी दिला. या वेळी शिंदे यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला, त्याचबरोबर वारंवार विरोधक टीका करतात, त्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेला हात लावाल, तर विरोधकांचा 'करेक्ट' कार्यक्रम होईल, असा इशारा त्यांनी दिला. विरोधक म्हणतात, आम्ही सत्तेत आलो, तर पोलखोल करणार, महायुतीने आणलेल्या सर्व योजना बंद करणार, पोलखोल करणार, जेलमध्ये टाकणार, तुमची पोलखोल यापूर्वीच झाली आहे, अशा शब्दांत त्यांनी महाविकास आघाडीला टोला लगावला आहे. या योजना बंद करणाऱ्यांना जनता साथ देणार नाही. हे खुलेआम बोलायला लागले, त्यांच्यात जेलसी निर्माण झाली आहे. त्यांच्या अशा बोलण्याने लोक त्यांच्या विरोधात जातील.

## राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स

## महायुतीचे रिपोर्ट कार्ड नव्हे, डिपोर्ट कार्ड!

### आदित्य ठाकरे यांची बोचरी टीका

**मुंबई :** शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी धारावी पुनर्विकास प्रकल्पावरून शिंदे सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. महायुतीचे 'रिपोर्ट कार्ड' प्रकाशित झाले. खरेतर याचे नाव 'डिपोर्ट कार्ड' असायला हवे. महाविकास आघाडीचे सरकार आल्यावर नोकऱ्या देणे हे आमचे पहिलं प्राधान्य आहे. कारण राज्यातील नोकऱ्यादेखील डिपोर्ट झाल्या आहेत. काल आचारसंहिता लागायच्या आत एक मोठा भूखंड अदानी समूहाला देण्यात आलाय. जनतेला काही ना काही देतात. १५ लाख सांगून १५०० रुपये दिले. आता १५ रुपयांवर येतील, असा टोला त्यांनी लगावला.



धारावीत ३०० एकर पुनर्विकासाचे काम अदानी यांना दिले. मुंबईतील तुमची आमची जमीन अदानी यांना फुकटात दिली. कुर्ला, मढ, देवनार येथील जमीन अदानींना दिली. मुंबईतील एकूण १०८० एकर जमीन फुकटात अदानींच्या घशात घातली, असे आरोप आदित्य यांनी केले. अरबी समुद्राचे नावदेखील अदानी समुद्र असे करून टाकतील, अशी टीका करून ते म्हणाले, की देवनार भूखंडात डम्पिंग ग्राऊंड, एनर्जी प्लांट आहेत. हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. धारावीतले दीड लाख परिवार अपात्र होणार. त्यांना तुम्ही जागा देणार नाहीत. आमचे सरकार आल्यानंतर अदानी समूहाला जे अतिरिक्त दिले ते परत घेऊ. तुम्हाला काम जमत नसेल तर ते रद्द करा. महाराष्ट्र अदानी समूहाच्या घशात घालायला लागलो तर आपल्याला इथे राहायला जागा मिळणार नाही, असे ते म्हणाले.

७ लाख चौरस फुटाचे काम केले, तर अदानी समूह १ लाख कोटी कमावेल. मुंबई विकून चालणार नाही. आमचे सरकार आल्यानंतर अदानी समूहाला अधिकच दिलेले काम रद्द करणार, असे ठाकरे म्हणाले. ही देशाची प्रगती आहे की अदानी समूहाची प्रगती आहे? हे आपण पाहिले पाहिजे, असे ते म्हणाले.

## राज्यपाल नियुक्त सदस्यांमुळे महायुतीची डोकेदुखी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बंडखोरीची भूमिका घेणाऱ्या आमदारांना रोखण्यासाठी महायुतीमधील तीन घटक पक्षांनी राज्यपाल नियुक्त सदस्यांच्या १२ पैकी ५ जागा रिक्त ठेवल्या आहेत. या रिक्त ठेवलेल्या जागेसाठी अनेकजण इच्छुक असल्याने महायुतीसमोरील डोकेदुखी वाढली आहे.

गेल्या पाच वर्षांपासून अधिक काळात राज्यातील राज्यपाल नियुक्त १२ जागा रिक्त होत्या. सुरुवातीला या रिक्त जागा भरण्यासाठी महाविकास आघाडी सरकारने तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे यादी पाठवली होती; मात्र ती यादी मंजूर न झाल्याने महायुती सरकारने ती यादी परत घेतली होती. त्यानंतर हे प्रकरण न्यायालयात गेल्याने त्यावर बऱ्याच दिवसापासून निर्णय होत नव्हता. काही दिवसापूर्वी महायुती सरकारने पुन्हा एकदा या रिक्त असलेल्या १२ जागा भरण्यासाठी नव्याने यादी तयार ठेवली होती. या रिक्त असलेल्या १२ जागा भरण्यासाठी भाजप, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात फॉर्म्युला ठरला होता; मात्र ऐनवेळी पुन्हा एकदा या प्रकरणी काही जणांनी न्यायालयात धाव घेतल्याने सुनावणी झाली व न्यायालयाने निकाल राखीव ठेवला होता. ऐन निवडणूक घोषणेच्या काही तासापूर्वी महायुती सरकारने पुन्हा एकदा ही यादी राज्यपालांना पाठवली. त्यांनी या प्रकरणी तातडीने कारवाई करीत १२ पैकी ७ जणांना मंगळवारी सकाळी शपथ घेण्यासाठी बोलवले. या सात जणांच्या नावात आश्वासन दिलेल्या भाजप, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या आश्वासन दिलेल्या अनेक जणांची नावे नसल्याने नाराजी पसरली आहे. पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते दीपक मानकर यांच्यासह सहाशे कार्यकर्त्यांनी राजीनामा दिला आहे. त्यामुळे वातावरण चांगलेच तापले आहे. त्यासोबतच महायुतीमधील घटक पक्ष असलेल्या रासप, रिपाइं या पक्षातील नेत्यांचा समावेश करण्यात न आल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे.

महायुती सरकारने अडीच वर्षाच्या काळात राज्य मंत्रिमंडळातील अनेक पदे रिक्त ठेवून वेळोवेळी ती भरण्याचे आश्वासन देत तीन पक्षांतील नाराज मंडळींची मनधरणी केली होती. दुसरीकडे आमदारकीसाठी इच्छुक असलेल्या नेत्यांनाही राज्यपाल नियुक्त आमदारकीचे आश्वासन दिले होते. आता येत्या काळात विधानसभेला बंडखोरी टाळण्यासाठी या तीन पक्षाकडून रिक्त असलेल्या पाच जागांवर वर्णी लावण्याचे आश्वासन दिले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे आमदारकीसाठी इच्छुक असलेल्या अनेक जणांचा अपेक्षाभंग होणार आहे.

## राष्ट्रीय खोखोपटूवर प्रशिक्षकाचा बलात्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या १३ वर्षीय मुलीवर शिक्षकाने बलात्कार केल्याची धक्कादायक घटना छत्रपती संभाजीनगरमध्ये घडली आहे. आरोपीने या मुलीला रेल्वे स्टेशन परिसरातील हॉटेलच्या रूममध्ये नेऊन तिच्यावर बलात्कार केला. ट्रेनिंगसाठी मुंबईला जायचे असल्याचे सांगून आरोपीने या मुलीला रेल्वे स्टेशनवर बोलून घेतले आणि हॉटेलमध्ये नेऊन तिच्यावर बलात्कार केला. याप्रकरणी आरोपी शिवाजी जगन्नाथ गोरडेविरोधात 'पोक्सो' कायद्यांतर्गत पैठण शहरातील वेदांतनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

## अमरावतीत जाळपोळ; ३६ जणांना अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अमरावती :** जुन्या शहरातील हरिहरपेठ परिसरात वाहनाचा धक्का लागल्याच्या कारणावरून दोन गटांत दगडफेकीनंतर दुचाकीसह एका ऑटोची जाळपोळ करण्यात आली. या गुन्ह्यांतील एकूण ३६ आरोपींना जुने शहर पोलिसांनी अटक केली आहे. यातील तीन आरोपींना न्यायालयीन कोठडी, तर ३३ आरोपींना न्यायालयाने जामीन मंजूर केल्याची माहिती आहे. सध्या जुन्या शहरातील परिस्थिती पूर्णतः नियंत्रणात आहे. पोलिसांची प्रत्येक घडामोडीवर नजर आहे.

## » Selected

## परशुराम महामंडळाच्या अध्यक्षपदी दामले



**कल्याण :** राज्य सरकारने काही दिवसांपूर्वी जाहिर केलेल्या ब्राह्मण समाजासाठीच्या परशुराम आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली. या महामंडळाच्या अध्यक्षपदी बदलापूरच्या आशिष दामले यांनी निवड करण्यात आली आहे. दामले हे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे पदाधिकारी आहेत. त्यांच्या या नियुक्तीमुळे ठाणे जिल्ह्यात पक्षाला बळ देण्याचा प्रयत्न असल्याची चर्चा रंगली आहे.

## विधानसभेसाठी इच्छुक उमेदवारांशी जरांगे करणार चर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**जालना :** मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे म्हणून आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील आचारसंहिता लागू झाल्याने आपली भूमिका जाहीर करणार आहेत. विधानसभेला उमेदवार उभे करायचे की पाडापाडी करायची, याचा निर्णय मजरांगे पाटील रविवारी (ता. २०) घेणार आहेत. जरांगे पाटील हे निर्णय जरी रविवारी घेणार असले, तरी त्यांनी आज (गुरुवारी) इच्छुक उमेदवारांना आंतरवाली सराटीमध्ये बोलावले आहे. ज्यांनी अर्ज केले होते, जे इच्छुक आहेत त्यांच्याशी मला उद्या महत्त्वाच्या गोष्टीवर चर्चा करायची आहे, असे ते म्हणाले.

गुरुवारी विधानसभेसाठी इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते सायंकाळी चार या वेळेत उपस्थित राहावे, असे जरांगे पाटील म्हणाले. ज्यांना शक्य आहे त्यांनी उद्या यावे. आपली उमेदवारी फिक्स झाली, असे कोणी समजू नये. आपण मिळून निर्णय घेऊ, असे ते म्हणाले. इच्छुक उमेदवारांनी आपली कागदपत्र तयार ठेवायची आहेत. कारण उभे राहायचे ठरले, तर कागदपत्र तयार पाहिजेत. कारण उमेदवारी अर्ज भरण्यासाठी कमी वेळ हातात आहे, असे जरांगे पाटील म्हणाले.

मला समाजाला खर्चात पाडायचे नाही. रविवारी (ता.२०) उमेदवार उभे करायचे की पाडायचे याचा निर्णय घेऊ. त्यामुळे रविवारी समाज बांधवांनी यावे. आपण नारायण गडावर आपली शक्ति दाखवली आहे. त्यामुळे या बैठकीला ज्यांना शक्य आहे, त्यांनी यावे विनाकारण खर्चात पडू नये. बैठकीचे ठिकाण लवकरच कळवले जाईल, असे ते म्हणाले.

## संभाजीनगरच्या ११९ शाळांच्या मुख्याध्यापकांवर फौजदारी गुन्हे दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर शहरातून एक मोठी बातमी समोर आली आहे. शहरातील तब्बल ११९ शाळांच्या मुख्याध्यापकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येण्याची माहिती पुढे आली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या शाळांकडून कर्मचाऱ्यांची माहिती प्रशासनाला देण्यात आली नसल्याने ही कारवाई केली जात आहे. छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या कडून हा कारवाईचा बडगा उभारण्यात आला असून या कारवाईमुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांकडून कारवाईचा बडगा

● मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगरच्या जिल्हा प्रशासनाच्या वतीने निवडणुकीच्या कामासाठी सर्व सरकारी कार्यालये, शासकीय आणि खासगी अनुदानित शाळांकडून त्यांच्या कर्मचाऱ्यांची माहिती मागवण्यात आली होती. ज्यात जिल्ह्यातील ११९ शाळांनी आपल्या शिक्षकांच्या याद्या आणि त्यांची माहिती सादर केली नाही. त्यामुळे आता या शाळांच्या मुख्याध्यापकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिली आहे. त्यामुळे या कारवाईने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली असून प्रत्यक्षात नेमकी कधी कारवाई केली जाते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## लंके विरोधकांची एकी

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**मुंबई :** खा.निलेश लंके यांचे एकेकाळचे सहकारी असलेल्यांनी आता विरोधी सूर आळवला असून त्यांनी राणी लंके यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांची भेट घेऊन पक्ष प्रवेश केला. त्यात सुजीत झावरे, माधवराव लामखडे, विजय औटी, काशिनाथ दाते आदी दिग्गजांचा समावेश आहे.

## विद्यार्थी शाळेत जाणार आता एसी बसमधून

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

"राज्यातील विद्यार्थ्यांना एसी इ-बस मधून प्रवासाची सुविधा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रस्तावाला राज्य सरकारची मंजुरी आवश्यक आहे. मंजुरीनंतर ही सुविधा प्रत्यक्षात सुरू होईल. नविन शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांना ही सुविधा मिळेल."
— **शिवाजी जगताप,** महाव्यवस्थापक (वाहतूक), एसटी महामंडळ

**मुंबई :** येत्या शैक्षणित वर्षापासून (वर्ष २०२५) विद्यार्थ्यांना एसटीच्या एसी इ-बसमधून प्रवास करता येणार आहे. विद्यार्थ्यांना एसी इ-बसमधून प्रवास करण्याच्या प्रस्तावाला संचालक मंडळाने मंजुरी दिली असून हा प्रस्ताव आता राज्य सरकारच्या परवानगीसाठी पाठविण्यात आला आहे.

सध्या राज्यातील विद्यार्थ्यांना एसटीच्या साध्या बसने प्रवास करण्याची परवानगी आहे. महामंडळ इंधनावरील खर्च कमी करण्यासह पर्यावरण पुरक वाहतूकीसाठी ५ हजार १५० एसी इ-बस भाडेतत्वावर घेणार आहे. त्यापैकी १३८ मिडी बस सध्या ताफ्यात आल्या असून त्या राज्यातील ७ विभागातील विविध मार्गावर धावत आहेत. या महिन्याच्या शेवटी आणखी १०० बस महामंडळाच्या ताफ्यात



दाखल होणार आहेत. ९ मीटर लांबीच्या ३२ आसनी २ हजार ३५० मिडी बस येत्या दोन वर्षात महामंडळाकडे येणार आहेत. या मिडी बस शक्यतो ग्रामीण भागात चालविण्यात येणार आहे. त्यामुळे या एसी-इ बसमधून विद्यार्थ्यांना प्रवास करण्याची मुभा देणारा प्रस्ताव महामंडळाने तयार केला होता.

राज्याच्या कानाकोपऱ्यातून सुमारे ९ ते १० लाख विद्यार्थी, विद्यार्थीनी दररोज शाळा-महाविद्यालयांमध्ये ये- जा करण्यासाठी एसटीने प्रवास करतात. विद्यार्थ्यांना राज्य सरकारतर्फे ६६.६६ टक्के तर विद्यार्थीनींना अहिल्याबाई होळकर योजनेंतर्गत पुर्ण १०० टक्के प्रवास सवलत दिली जाते. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना एकाच पासवर साध्या आणि एसी इ-बस मधून प्रवासी करता येणार आहे.

## राज्यात जवळजवळ ११० जागा लढण्याची शक्यता

# मविआमध्ये काँग्रेसच्या वाट्याला ८४ जागा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी राजधानी दिल्लीत काँग्रेसच्या छाननी समितीची बैठक पार पडली. महाविकास आघाडीमध्ये २८८ जागांपैकी २२२ जागांचा तिढा सुटला असून ६६ जागांचा फैसला बाकी आहे. यापैकी ८४ जागा काँग्रेसच्या वाट्याला आल्याची माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली. मिळालेल्या माहितीनुसार उर्वरित जागांमधूनही जवळपास २५ जागा काँग्रेसला येण्याची शक्यता आहे, त्यामुळे काँग्रेस राज्यात जवळजवळ ११० जागा लढण्याची शक्यता आहे. दरम्यान, मुंबईत शिवसेना ठाकरे गट मोठ्या भावाच्या भूमिकेत असल्याचे समजते. काँग्रेसकडे १७०० जणांनी अर्ज केले आहेत. एका मतदारसंघात दोन उमेदवार अशी यादी तयार झाली आहे. बहुतांश विद्यमान काही माजी आमदार आणि नव्या चेहऱ्यांचा यादीत समावेश आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली. काँग्रेस नेते भाई जगताप यांनी दिलेल्या माहितीनुसार मुंबईमध्ये जवळपास जागा वाटपाची चर्चा पूर्ण झाली आहे. महाविकास आघाडीमधील मुंबईमधील ९० टक्के जागांची चर्चा पूर्ण झाली आहे. तीन जागांचा तिढा हा लवकरच सोडवला जाणार आहे. मुंबईमध्ये महाविकास आघाडीमध्ये शिवसेना ठाकरे गटच मोठा पक्ष राहणार आहे. मुंबईत शिवसेना ठाकरे गटाला सर्वाधिक जागा देण्यात आल्या आहेत. मुंबईमधील जागावाटपाच्या बैठकीमध्ये ३६ पैकी ३३ जागांवर महाविकास आघाडीतील नेत्यांचे एकमत झालं आहे. येत्या एक ते दोन दिवसात जागावाटप आणि काँग्रेसची पहिली उमेदवारांची जाहीर येण्याची शक्यता आहे.

### महाराष्ट्रातील नेतेमंडळी दिल्लीत दाखल

● छाननी समितीच्या बैठकीसाठी महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, सतेज पाटील, नाना गावंडे ही नेते मंडळी दिल्लीत दाखल झाली. दरम्यान, नाना पटोले म्हणाले की, २० तारखेला केंद्रीय निवडणूक समितीची बैठक आहे. या बैठकीनंतर पहिली यादी येणे अपेक्षित आहे. महाविकास आघाडीमध्ये कोण मोठा भाऊ कोण लहान भाऊ याचा आम्ही विचार करत नाही, मेरीटवर आम्ही पुढे जात आहोत.





#रा

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या उपस्थितीत आज होणार शपथविधी

# नायाब सैनी होणार हरियाणाचे मुख्यमंत्री

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चंदीगड :** हरियाणात तिसऱ्यांदा भाजपचे सरकार स्थापन होणार आहे. मुख्यमंत्र्यांपासून ते मंत्रिमंडळापर्यंतचे चेहरे अद्याप ठरलेले नाहीत. मात्र याआधीच वृत्तपत्रांमध्ये हरियाणा सरकारची जाहिरात चर्चेत आली आहे. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत नायब सैनी यांचे छायाचित्र असून त्यांना मुख्यमंत्रिपदाच्या शपथविधीसाठी आमंत्रित करण्यात आले आहे. यासोबतच वेळ, तारीख आणि ठिकाणही नमूद करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला पंतप्रधान नरेंद्र



मोदीही उपस्थित राहणार आहेत.

बुधवारी पंचकुलामध्ये भाजप विधीमंडळ पक्षाची बैठक पार पडली. या बैठकीसाठी पक्षाने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. दोन्ही केंद्रीय



हरियाणा भाजप विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह.

नेत्यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली असून त्यानंतर नव्या मुख्यमंत्र्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. नायब सैनी हरियाणाचे मुख्यमंत्री राहतील. .बैठकीत माजी गृहमंत्री अनिल विज आणि आमदार कृष्णा बेदी यांनी सैनी यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला. त्यावर सर्व आमदारांचे एकमत झाले. या बैठकीला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव हे निरीक्षक म्हणून उपस्थित होते.

भाजप विधिमंडळ पक्ष आता राजभवनात जाऊन सरकार स्थापनेचा दावा करणार आहे. आज १७ ऑक्टोबर (गुरुवारी) सकाळी ११ वाजता शपथविधी होणार आहे. पंचकुलातील शालिमार मैदानावर शपथविधीसाठी मोठे व्यासपीठ तयार करण्यात आले आहे. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप आणि 'एनडीए' मित्रपक्षशासित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसह ३७ नेते उपस्थित राहणार आहेत. बैठकीनंतर शाह म्हणाले, की विज आणि बेदी यांनी सैनी यांना विधिमंडळ पक्षाचे नेते बनवण्याचा प्रस्ताव ठेवला. सर्व आमदारांच्या सहमतीनंतर सैनी यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आली आहे.

हरियाणात नेतृत्वाबाबत काँग्रेससह भाजपमध्ये दुफळी आहे. हरियाणा भाजपमध्ये दोन मुख्य गट आहेत. एक केडरचा आणि दुसरा बाहेरून येणाऱ्या नेत्यांचा. बाहेरून आलेल्या नेत्यांमध्ये राव इंद्रजीत, श्रुती चौधरी आणि कुलदीप बिश्नोई या नेत्यांची नावे आहेत. मंडळ पक्षाची बैठक मध्यंतरी सोडली होती.

या निवडणुकीत सैनी हे भाजपचा चेहरा असतील, अशी घोषणा खुद्द शाह यांनीच केली होती;

## » Selected

### 'फ्लाईंग फेस्टिव्हल'ला सिमल्यात सुरुवात

**सिमला :** हिमाचल प्रदेशातील सिमल्याला लागून असलेल्या जंगा येथे बुधवारपासून 'फ्लाइंग फेस्टिव्हल' सुरू झाला आहे. राज्यपाल शिवप्रताप शुक्ला यांच्या हस्ते या चार दिवसीय स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. दोन दिवसांनंतर कुस्तीपटू द ग्रेट खली प्रमुख पाहुणे म्हणून 'फ्लाइंग फेस्टिव्हल'मध्ये सहभागी होणार आहे. पॅरा ग्लायडिंग चॅम्पियनशिपमध्ये भारताव्यतिरिक्त विविध राज्यातील सुमारे ५० स्पर्धक सहभागी होत आहेत. यामध्ये पश्चिम बंगालच्या एका महिला पॅरा ग्लायडरचाही समावेश असेल. 'फ्लाइंग फेस्टिव्हल'मध्ये 'स्पॉट लँडिंग पॅरा ग्लायडिंग चॅम्पियनशिप'चे आयोजन करण्यात आले आहे. पायलट एकल आणि सांघिक श्रेणींमध्ये स्पर्धा करत आहेत.

### प्रशांत किशोर यांच्या पक्षाचे उमेदवार जाहीर

**पाटणा :** बिहारमध्ये नव्याने स्थापन झालेल्या 'जन सूरज' या



राजकीय पक्षाने राज्यातील चार जागांवर होणाऱ्या विधानसभा पोटनिवडणुकीसाठी बुधवारी आपले उमेदवार जाहीर केले. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मनोज भारती यांनी तरारी विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली आहे. तरारी विधानसभा मतदारसंघातून लेफ्टनंट जनरल एसके सिंह उमेदवार असतील. उर्वरित तीन जागांसाठीचे उमेदवार अद्याप जाहीर झालेले नाहीतत. या पोटनिवडणुकीत उमेदवारांची घोषणा करणारा 'जन सूरज' हा पहिलाच पक्ष ठरला आहे,

### बलात्कार प्रकरणातील भाजपच्या आमदाराला जामीन मंजूर

**बेंगळुरू :** बलात्कार प्रकरणात अटक करण्यात आलेले भाजप आमदार मुनीरत्न यांना बेंगळुरूच्या विशेष लोकप्रतिनिधी न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. मंगळवारी राखून ठेवलेला निकाल आज देताना न्यायमूर्ती संतोष गजानन भट यांनी मुनीरत्न यांना सशर्त जामीन मंजूर केला. पोलिस तपासात सहकार्य करणे, साक्षीदार नष्ट न करणे, पुराव्यावर परिणाम न करणे आदी अटी त्यांना घालण्यात आल्या असून, दोन जामीनदार मागितले आहेत. रामनगर जिल्ह्यातील काग्गलीपूर पोलिस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीच्या आधारे 'एसआयटी' अधिकाऱ्यांनी मुनीरत्न यांना अटक केली होती. मुनीरत्न यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करून आपल्यावर बलात्कार केल्याची तक्रार पीडित महिलेने केली होती. राज्य सरकारने हे प्रकरण 'एसआयटी'कडे सोपवले होते.

## दोघांना अंधत्व

# बिहारमध्ये विषारी दारूचे चार बळी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पाटणा :** बिहारमध्ये दारूबंदी असतानाही छपरा येथे दारू पिऊन एका तरुणाचा मृत्यू झाला आहे, तर दोन जणांची दृष्टी गेली आहे. दुसरीकडे, सिवानमध्येही तीन जणांचा मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पहिली घटना छपराच्या मशरक पोलिस ठाण्याच्या हद्दीतील आहे. तिथे दारू पिऊन एका तरुणाचा मृत्यू झाला. इस्लामुद्दीन असे मृताचे नाव आहे. दोन जणांची दृष्टी गेली असून शमशाद आणि मुमताज अन्सारी अशी त्यांची नावे आहेत. सारणचे जिल्हा जनसंपर्क अधिकारी रवींद्र कुमार यांनी सांगितले, की इब्राहिमपूर गावात विषारी दारू प्यायल्याने एकाचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे, तर दोन जण गंभीर आजारी आहेत. आजारी लोकांना उपचारासाठी सदर हॉस्पिटल छपरा येथे आणण्यात आले असून, तेथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. कुमार म्हणाले, की घटनेची माहिती मिळताच मशरक उपविभागीय पोलिस अधिकारी अमरनाथ यांच्यासह पोलिस दल या गावात पोहोचले आणि प्रकरणाचा तपास करत आहेत.

दुसरीकडे, सिवान जिल्ह्यातही तीन जणांचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. हे प्रकरण भगवानपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मागदी आणि २२ कठा गावातील असल्याचे सांगण्यात आले.

# पाकच्या भूमीत जयशंकर यांनी घेतला समाचार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इस्लामाबाद :** सीमापार दहशतवादी कारवाया आणि फुटीरतावादामुळे दोन्ही देशांदरम्यान द्विपक्षीय व्यापार आणि संबंध सुधारण्यात अडथळा ठरत आहे, असा खरपूस समाचार भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी पाकिस्तानचा घेतला. इस्लामाबाद येथे आयोजित 'शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन' (एससीओ) शिखर परिषदेत ते बोलत होते. दशकभरानंतर भारतीय परराष्ट्रमंत्र्यांचा हा पहिलाच पाकिस्तान दौरा होता. या वेळी जयशंकर यांनी पाकिस्तान आणि चीनचे नाव न घेता त्यांच्यावर निशाणा साधला.



दरम्यान, जयशंकर यांचे भाषण सुरू असतानाच पाकिस्तानच्या दूरचित्रवाणीने शिखर परिषदेचे थेट प्रक्षेपण बंद केले. ते पुढे म्हणाले, की विकास आणि वाढीसाठी शांतता आणि स्थिरता आवश्यक आहे. सध्याच्या काळात दहशतवाद आणि अतिरेक्यांशी मुकाबला करणे अधिक महत्त्वाचे आहे. 'एससीओ'मधील सहकार्य, परस्पर आदर आणि सार्वभौम समानतेवर आधारित असले पाहिजे. प्रादेशिक अखंडता आणि सार्वभौमत्व ओळखले पाहिजे. ती खऱ्या भागीदारीवर बांधली गेली पाहिजे आणि एकतर्फी अजेंडांवर नाही, असेही त्यांनी सुनावले.

परस्पर विश्वास, मैत्री आणि चांगले शेजारी संबंध दृढ करणे हा 'एससीओ'चा मुख्य उद्देश आहे. विविध क्षेत्रात विशेषतः प्रादेशिक स्तरावर सहकार्य वाढवणे. समतोल विकासाला चालना देणे आणि संघर्ष टाळण्यासाठी सकारात्मक शक्ती निर्माण करणे हे त्याचे ध्येय आहे. प्रामाणिकपणे संवाद साधणे आपल्यासाठी महत्त्वाचे आहे. जर विश्वासाचा अभाव असेल, सहकार्य पुरेसे नसेल किंवा मैत्री कमकुवत असेल किंवा चांगले शेजारी संबंध कुठेतरी लोप पावले असतील, तर आपण स्पष्टपणे आत्मपरीक्षण करून या समस्यांवर उपाय शोधण्याची गरज आहे, असा सल्ला जयशंकर यांनी पाकिस्तानला दिला.

# लसणाचे भाव वाढल्याने फोडणी तडकली!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** टोमॅटो, कांदा आणि कोथिंबिरीनंतर आता लसणाच्या दराचा परिणाम खिशावर होणार आहे. किरकोळ बाजारात लसणाचा दर किलोमागे ४०० रुपयांवर पोहोचल्याची स्थिती आहे, तर ऑनलाइन लसणाच्या दराने ५०० रुपये किलोचा टप्पा ओलांडला आहे.



अतिवृष्टीमुळे देशातील अनेक राज्यांमध्ये लसणाच्या पिकाचे नुकसान झाले आहे. लसणाच्या आवकसाठी भारत सध्या अफगाणिस्तानवर अवलंबून असल्याची स्थिती आहे. आशियातील सर्वात मोठ्या बाजारपेठेत राजस्थान, मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश आणि उत्तर प्रदेशमधून लसणाची आवक होते; परंतु या वर्षी पावसाने अनेक वर्षांचे विक्रम मोडीत काढले. त्याचा अंदाज शेतकऱ्यांनाही घेता आला नाही आणि त्यांचे उभे लसणाचे पीक उद्ध्वस्त झाले. अफगाण लसणाची रोज आवक होत आहे. हिमाचलमधील काही शेतकऱ्यांनी आपला लसूण 'कोल्ड स्टोरेज'मध्ये ठेवला होता. तो आता बाजारात विक्रीसाठी आणला जात आहे. त्याचबरोबर अफगाणिस्तानातून दररोज १०-२० कंटेनर बाजारात पोहोचत आहेत; पण त्यांना मालाची किंमत किती आहे यापेक्षा जास्त 'कस्टम ड्युटी' भरावी लागते. याचे कारण म्हणजे चीनी लसूण (ज्यावर भारतात बंदी आहे) जो बंगाल, उत्तर प्रदेश आणि नेपाळला लागून असलेल्या भागातून चुकीच्या पद्धतीने बाजारात आणला जात होता.

आझादपूर मंडीच्या 'भाजीपाला असोसिएशन'चे सरचिटणीस अनिल मल्होत्रा यांनी सांगितले, की चीनी लसणाबाबत तक्रारी आल्यावर सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी अफगाणिस्तानातून येणाऱ्या लसणावरही कडक कारवाई केली. जे अमृतसरमार्गे पाकिस्तानातून आझादपूर बाजारपेठेत विक्रीसाठी आणले जाते. यामुळे ते जेवढे लसूण भारतात विक्रीसाठी आणतात, त्यापेक्षा जास्त हमीभाव त्यांना द्यावा लागतो; मात्र कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर त्यांचे पैसे त्यांना परत केले जातात; परंतु देय देण्यापूर्वी, त्यांचा लसूण अनेक वेळा सडतो आणि खराब होतो.

## नागरिकांची सुटका

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**चेन्नई :** दक्षिणेकडील चारही राज्यांना मुसळधार पावसाने झोडपून काढले आहे. रस्त्यांना नद्या, नाल्यांचे स्वरुप आल्याने रस्त्यावर बोटी चालवून नागरिकांची सुटका करण्यात आली.

# भाजपच्या मदतीनेच ओमर सत्तेत : राशीद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीर मुख्यमंत्रिपदी आज 'नॅशनल कॉन्फरन्स'चे उपाध्यक्ष ओमर अब्दुला यांनी शपथ घेतली. या शपथविधी सोहळ्यानंतर अवामी इत्तेहाद पार्टीचे अध्यक्ष आणि खासदार शेख अब्दुल रशीद उर्फ इंजिनियर रशीद यांनी 'नॅशनल कॉन्फरन्स'चे अध्यक्ष फारुख अब्दुल्ला आणि त्यांचे पुत्र ओमर अब्दुल्ला यांच्यावर हल्लाबोल केला.

राशिद म्हणाले, की ओमर यांना आमच्या शुभेच्छा आहेत. आता आम्हाला आशा आहे, की त्यांनी त्यांची आश्वासने पूर्ण करावीत. आम्ही केंद्रालाही विनंती करतो. सरकार त्यांना



सहकार्य करेल. ओमर कायम जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा मिळवण्याचे, कलम ३७० आणि ३५ अ याबाबत बोलत असतात;पण ते ३७० कलमापासून पळून जात आहेत. जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जम्मू-काश्मीरला विशेषाधिकार देणारे कलम ३७० रद्द केले, तेव्हा तीन दिवस आधी त्यांनी फारुख अब्दुल्ला यांची भेट घेतली होती. या बैठकीनंतर फारुख म्हणाले, की काहीही रद्द केले जाणार नाही. यानंतर फारुख अब्दुल्ला आणि ओमर अब्दुल्ला यांना गेस्ट हाऊसमध्ये ठेवण्यात आले होते. पंतप्रधान मोदी यांनी सर्वांशी चर्चा करून कलम ३७० हटवले, हे एक मॅच फिक्सिंग होते, यात शंका नाही. भाजपच्या मदतीनेच जम्मू-काश्मीरमध्ये 'नॅशनल कॉन्फरन्स' सत्तेत आले आहे, असा गंभीर आरोप त्यांनी या वेळी केला.

# बॉम्बच्या अफवेने विमानाचे लँडिंग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अहमदाबाद :** मुंबईहून दिल्लीला जाणारे इंडिगोचे विमान बॉम्बची धमकी मिळाल्याने अहमदाबादच्या दिशेने वळवण्यात आले. एका अधिकाऱ्याने बुधवारी सांगितले, की विमानात बॉम्बची धमकी ही अफवा होती. त्यानंतर मंगळवारी रात्री विमान मुंबई विमानतळावर पोहोचले. विमानात सुमारे २०० प्रवासी आणि क्रू मेंबर्स होते. अधिकाऱ्याने सांगितले, की एका अज्ञात व्यक्तीने विमानात बॉम्ब असल्याचा दावा ट्वीटद्वारे केला होता.

मुंबई 'एटीसी'ने सतर्क केल्यानंतर वैमानिकाने अहमदाबाद विमानतळावर इमर्जन्सी लँडिंग करण्याचा निर्णय घेतला. वास्तविक, दिल्लीला जाण्यासाठी अहमदाबाद हे जवळचे विमानतळ होते. मध्यरात्री येथे लँडिंग केल्यानंतर, सुमारे २०० प्रवासी आणि कर्मचारी असलेल्या विमानाची सुरक्षा दलांनी रात्रभर झडती घेतली, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. या वेळी त्यात काहीही आढळून आले नाही.

## राष्ट्रपती मुर्मू यांना अल्जेरियात

# राज्यशास्त्रातील मानद डॉक्टरेट पदवी प्रदान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अल्जेरिया :** भारत आणि अल्जेरियादरम्यान आर्थिक सहकार्य वाढवण्याचे आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केले आहे. अल्जेरियाचा वेगाने होत असलेला विकास आणि विस्तारत असलेल्या अर्थकारणामुळे विविध क्षेत्रांमध्ये नवनवीन संधी उपलब्ध होत आहेत, असेही त्यांनी म्हटले आहे.

भारत आणि अल्जेरियादरम्यान वार्षिक १.७ अब्ज डॉलरची व्यापारी उलाढाल होते मात्र व्यापाऱ्याच्या अनेक संधींचा अजून वापर केला जाऊ शकलेला नाही, असेही त्यांनी नमूद



केले. भारत-अल्जेरिया आर्थिक मंचाला सोमवारी त्या संबोधित करत होत्या. मुर्मू यांना आज अल्जियर्समधील सिदी अब्देल्लाह सायन्स अँड टेक्नॉलॉजी पोल युनिव्हर्सिटीने राज्यशास्त्रातील मानद डॉक्टरेट पदवी प्रदान केली. अल्जेरियाचे उच्च शिक्षण आणि वैज्ञानिक संशोधन मंत्री कमल बद्दरी यांनी मुर्मू यांना डॉक्टरेट प्रदान केली.

अल्जेरियातील दौऱ्याच्या आपल्या अखेरच्या दिवशी राष्ट्रपती मुर्मू विविध कार्यक्रमांना उपस्थित राहिल्या. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज सी वॉटर डिसेलिनेशन प्रोजेक्ट साइट आणि रोमन साम्राज्याच्या अवशेषांना भेट दिली. राष्ट्रपती टिपाजाच्या विलायाकडे रवाना झाल्या आणि समाधीला भेट दिली. त्यांनी हम्मा गार्डनला भेट दिली आणि तेथे एक रोपटे देखील लावले. तीन देशांच्या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू मॉरिटानियाला रवाना होणार आहेत. आपल्या दौऱ्याच्या अंतिम टप्प्यात राष्ट्रपती १६ ते १९ ऑक्टोबर दरम्यान मलावीला भेट देतील.

## सर्वोच्च न्यायलयाकडून तीव्र नाराजी व्यक्त

# पंजाब, हरियाणात शेतीतील काड जाळण्याच्या घटना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंजाब आणि हरियाणामध्ये शेतीतील काड (पिकांचे अवशेष) जाळण्याच्या घटना घडू लागल्या आहेत. हे थांबवता न आल्याने सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी तीव्र नाराजी व्यक्त केली. सर्वोच्च न्यायालयाने दोन्ही राज्यांच्या सरकारांना आधीच्या आदेशाचे पालन न केल्याबद्दल फटकारले आणि आदेशाचे पालन न केल्यास त्यांच्या मुख्य सचिवांवर अवमानाचे खटले दाखल करू, असा इशारा दिला.

सर्वोच्च न्यायालयाने विचारले, की राज्य सरकार परताळ जाळल्याबद्दल त्यांच्यावर खटला चालवण्यास आणि



नाममात्र दंड आकारून त्यांना सोडून देण्यास का टाळत आहे? भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्त्रो) हरियाणा सरकारला आग लावलेली जागा सांगत आहे आणि तुम्ही म्हणता की तुम्हाला काहीही सापडले नाही, अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने हरियाणा सरकारची कानउघाडणी केली. दोन्ही राज्यांच्या मुख्य सचिवांना २३ ऑक्टोबर रोजी न्यायालयात हजर राहण्यास सांगितले.

न्यायमूर्ती अभय ओक, अहसानुद्दीन अमानुल्ला आणि ऑगस्टिन जॉर्ज मसिह यांच्या खंडपीठाने हरियाणा सरकारी अधिकाऱ्यांवर उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात अपयशी ठरल्याबद्दल 'कमिशन फॉर एअर क्वालिटी मॅनेजमेंट' (सीक्यूएम) ला दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश दिले. सर्वोच्च न्यायालयाने सीएक्यूएमची तुलना दात नसलेल्या वाघाशी केली. शेतकऱ्यांना ट्रॅक्टर देण्यासाठी पंजाब सरकारने केंद्राकडून निधी मिळविण्यासाठी कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत, असे न्यायालयाने म्हटले आहे. शेजारच्या राज्यांमध्ये पिकांचे अवशेष जाळल्यामुळे दिल्लीतील वायू प्रदूषण रोखण्यात अयशस्वी ठरल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीही 'सीएक्यूएम'ला फटकारले होते आणि त्याच्या दृष्टिकोनात अधिक सक्रिय होण्याची आवश्यकता असल्याचे म्हटले होते.

#रा

# SPORTS



"ऑस्ट्रेलिया मालिकेसाठी मोहम्मद शमीला संघात सामील करणे कठीण आहे. तो पुनरागमन करत असताना त्याच्या गुडघ्याला सूज आली होती. त्यामुळे तो थोडा मागे पडला आणि त्याला पुन्हा सुरुवात करावी लागली. शमी पूर्णतः दुखापतीतून सावरल्याशिवाय आम्ही त्याला आस्ट्रेलियाविरूद्धच्या मालिकेत खेळवू शकत नाही."

"बुमराह हा संघातील अनुभवी खेळाडूंपैकी एक आहे. तो कधीही कर्णधार राहिलेला नाही, परंतु मी त्याच्याशी जी काही चर्चा करतो, त्यानुसार तो बॉलिंग युनिटचे नेतृत्व करतो. सामन्यादरम्यानही तो नेहमी चर्चा करतो. तो आमच्यासोबत आहे, ही चांगली गोष्ट आहे."

— रोहित शर्मा

### पाचवी राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धा : ऋग्वेद दांडेकर याला उपविजेतेपद

# शौरेन सोमण याला दुहेरी मुकुट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्याच्या शौरेन सोमण याने १५ व १७ वर्षाखालील मुलांच्या गटात विजेतेपद पटकाविले आणि पाचव्या राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत दुहेरी मुकुट पटकाविला. मुलांच्या अकरा वर्षाखालील गटात पुण्याचा ऋग्वेद दांडेकर याला उपविजेतेपद मिळाले.

नवकृष्णा व्हॅली स्कूल, कुपवाड एमआयडीसी, सांगली येथे सूरज फाउंडेशन सांगली यांच्यातर्फे आणि महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस संघटनेच्या मान्यतेने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

मुलांच्या पंधरा वर्षाखालील गटात सोमण या पाचव्या मानांकित खेळाडूने ठाण्याचा सहावा मानांकित खेळाडू प्रतिक तुलसानी याचे आव्हान ९-११,११-६,११-५,११-८ असे मोडून काढले. पहिली गेम गमावल्यानंतर त्याने टॉप स्पिन फटक्यांचा बहारदार



खेळ करीत हा सामना जिंकला. पाठोपाठ त्याने सतरा वर्षाखालील मुलांच्या गटात पुण्याचाच खेळाडू ईशान खांडेकर याला पराभूत केले. नवव्या मानांकित सोमण याने द्वितीय मानांकित खांडेकर याला १४-१२,११-५,११-९ असे पराभूत करताना अष्टपैलू खेळाचा प्रत्यय घडविला. सोमण हा



पुण्याच्या एम्स अकादमीत नीरज होनप यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो. त्याने आजपर्यंत जिल्हा आणि राज्यस्तरावर अनेक स्पर्धा जिंकल्या आहेत.

मुलांच्या अकरा वर्षाखालील गटात पुण्याचा खेळाडू ऋग्वेद दांडेकर याला मात्र उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले मुंबई महानगर जिल्हा संघाचा खेळाडू यश कोल्हे याने त्याला ७-११,११-६,११-५, ११-८ असे पराभूत केले. मुलांच्या तेरा वर्षाखालील गटात सातवा मानांकित प्रतिक तुलसानी या ठाण्याच्या खेळाडूने अग्रमानांकित आरव होरा याच्यावर ११-८,११-५,११-४ असा सनसनाटी विजय नोंदवित अजिंक्यपद मिळविले.

मुलींच्या अकरा वर्षाखालील गटात ठाण्याची द्वितीय मानांकित खेळाडू जिनया वधान हिने नाशिकची अग्रमानांकित खेळाडू केशिका पूरकर हिच्यावर १३-११,११-४,११-६ अशी अनपेक्षित मात करीत विजेतेपदावर नाव कोरले तर १३ वर्षाखालील गटात मुंबईच्या टी एस टी संघाची अग्रमानांकित खेळाडू मायरा सांगळेकर विजेती ठरली. तिने अंतिम सामन्यात आपली सहकारी पलक झंवर हिच्यावर ११-१३,११-२,११-३,११-९ असा विजय मिळविला. मुलींच्या पंधरा वर्षाखालील गटात ठाण्याची तृतीय मानांकित खेळाडू सान्वी पुराणिक हिने अंतिम सामन्यात आपली सहकारी स्वरा जांगडे हिच्यावर ४-११,११-६,११-९,११-५ असा विजय मिळविला. मुलींच्या सतरा वर्षाखालील गटात ठाण्याच्या रितिका माथूर या अग्रमानांकित खेळाडूने आपली सहकारी अन्वी थोरात या तृतीय मानांकित खेळाडूचा ९-११,६-११,११-८,११-६,११-८ असा पराभव करीत विजेतेपद मिळविले.

## तायक्वांदो स्पर्धेत ध्रुव ग्लोबल स्कूलच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी



### २ सुवर्णपदक व ३ रौप्य पदक

**पुणे :** जिल्हा परिषद, मुळशी तालुकास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत पुण्यातील ध्रुव ग्लोबल स्कूलच्या खेळाडुंनी चमकदार कामगिरी केली. क्युरोगी या प्रकारात खेळाडूंनी प्रतिभेचे दर्शन घडवत २ सुवर्णपदक व ३ रौप्य पदकांची कमाई केली. तायक्वांदो स्पर्धेत सहभागी खेळाडूंनी केवळ तांत्रिक क्षमताच नाही, तर खेळाप्रती त्यांची अतूट बांधिलकीही दाखवली. त्यामुळे ही स्पर्धा पाहण्यासाठी संपूर्ण पुणे जिल्ह्यातून प्रेक्षकांनी हजेरी लावी. ३५ किलो वजनाखालील मुलींमध्ये सानवी गिरी(सुवर्णपदक), ३८ किलो वजनाखालील मुलींमध्ये आरना यादव (सुवर्णपदक) आणि ३८ किलो वजनावरील मुलींमध्ये निधी कुटे (रौप्य पदक) मिळाले आहे. तसेच ४१ किलो वजनाखालील मुलांमध्ये आरव कुमार आणि ३२ किलो वजनाखालील मुलांमध्ये वीर शर्मा (रौप्य पदक) मिळाले. ध्रुव ग्लोबल स्कूलच्या खेळाडूंच्या यशाबद्दल स्कूचे संचालक यश मालपाणी व प्रिन्सीपल संगीता राऊतजी यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले. प्रशिक्षक कोमल पाठारे घारे (शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त)यांच्या मार्गदर्शनाखाली या खेळाडूंनी प्रशिक्षण घेतले असून, या कामगिरीतून त्यांचे कठोर परिश्रम आणि चिकाटी दिसून येते.

## मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी रेड संघाची विजयी सलामी

**पुणे :** मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी वाकड यांच्या वतीने आयोजित मॅव्हेरिक्स आंतर क्लब क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत पार्थ गवारी नाबाद ३६ धावा व विहान वानखेडे(२-२०), प्रसाद जगताप(२-२३), पांशुल साठे(२-२३) यांनी केलेल्या सुरेख



गोलंदाजीच्या जोरावर मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी रेड संघाने मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी ब्लू संघाचा १६ धावांनी पराभव करत विजयी सलामी दिली. ३० वायसीए स्पार्क क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत प्रथम फलंदाजी करताना मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी रेड संघाने २० षटकात ४ बाद १४२ धावा केल्या. यात पार्थ गवारी नाबाद ३६, आयुश जमदाडे नाबाद २५, विहान वानखेडे १७, ईशान चकोर ११ यांनी धावा काढून संघाच्या डावाला आकार दिला. याच्या उत्तरात मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी ब्लू संघ १७.३ षटकात सर्वबाद १२६ धावाच करू शकला. यात ईशान भुजबळ ३४, अर्णव कट्टी २३, आरीब मलिक १४ यांनी दिलेली लढत अपुरी ठरली. मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी रेड संघाकडून विहान वानखेडे(२-२०), प्रसाद जगताप (२-२३), पांशुल साठे(२-२३)यांनी सुरेख गोलंदाजी केली. स्पर्धेत मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी रेड, मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी ब्लू आणि मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी ग्रीन संघांनी सहभाग नोंदवला असून हि स्पर्धा राऊंड रॉबिन साखळी पद्धतीने खेळविण्यात येणार आहे. यातील दोन अव्वल संघ अंतिम फेरीसाठी पात्र ठरणार आहेत. स्पर्धेतील विजेत्या संघाला करंडक व आकर्षक अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत. याशिवाय सर्वोत्कृष्ट फलंदाज याला क्रिकेट बॅट, सर्वोत्कृष्ट गोलंदाजाला क्रिकेट शूज आणि मालिकावीर खेळाडूला क्रिकेट किट बॅग प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती स्पर्धा संचालक राज कमल यांनी दिली.

## बांगलादेश क्रिकेट बोर्डाने हथुरुसिंघे यांना केले निलंबित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बांगलादेशाचे मुख्य प्रशिक्षक चंडिका हथुरुसिंघे यांना बांगलादेश क्रिकेट बोर्डाने (बीसीबी) शिस्तभंगाच्या कारणावरून निलंबित केले आहे. त्यांना ४८ तासांसाठी निलंबित करण्यात आले असून या कालावधीनंतर त्यांना तात्काळ बडतर्फ करण्यात येणार आहे. बोर्डाने त्यांना कारणे दाखवा नोटीसही बजावली आहे. बोर्डाने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ पर्यंत अंतरिम प्रशिक्षक म्हणून फिल सिमन्स यांची नियुक्ती केली आहे.

बांगलादेश बोर्डाचा हा निर्णय अशा वेळी आला आहे जेव्हा टीमला भारत दौऱ्यावर टी-२० आणि कसोटी मालिका दोन्ही गमवाव्या लागल्या होत्या. मायदेशात दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत पाकिस्तानचा पराभव करून बांगलादेश भारत दौऱ्यावर आला होता. भारतात, बांगलादेशला प्रथम कसोटी मालिकेत २-० आणि नंतर टी-२० मालिकेत ३-० ने पराभवाचा सामना करावा लागला.



श्रीलंकेचा माजी अष्टपैलू खेळाडू हथुरुसिंघे यांना गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये बांगलादेशचे प्रशिक्षक बनवण्यात आले होते. २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीपर्यंत त्यांचा कार्यकाळ होता. ५६ वर्षीय हथुरुसिंघेच्या नेतृत्वाखाली बांगलादेशने गेल्या वर्षीच्या एकदिवसीय विश्वचषक आणि यंदाच्या टी-२० विश्वचषकात अत्यंत खराब कामगिरी केली होती. बांगलादेशने पाकिस्तानविरुद्ध २-० अशी कसोटी मालिका जिंकणे ही हथुरुसिंघेची या वर्षातील सर्वोत्तम कामगिरी आहे.

### आयसीसी कडून मोठी घोषणा!


## डिविलियर्स, कूकसह एका भारतीय खेळाडूचाही होणार सन्मान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने मोठी घोषणा केली आहे. आयसीसीने यंदा हॉल ऑफ फेममध्ये तीन दिग्गजांना सामील करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये एका भारतीय खेळाडूचाही समावेश करण्यात आला आहे.

इंग्लंडचा दिग्गज फलंदाज ॲलिस्टर कूर, दक्षिण आफ्रिकेचा दिग्गज एबी डिविलियर्स आणि भारताची दिग्गज महिला खेळाडू नितू डेव्हिड यांचा हॉल ऑफ फेममध्ये समावेश करून सन्मान करण्यात आला आहे. नितू डेव्हिड या आयसीसी हॉल ऑफ फेमध्ये सामील होणाऱ्या डायना एडुलजी यांच्यानंतरच्या दुसऱ्याच भारतीय महिला क्रिकेटपटू आहेत. तसेच एकूण १० व्या भारतीय खेळाडू आहेत.





त्यांच्यापूर्वी सुनील गावसकर, बिशन सिंग बेदी, कपिल देव, अनिल कुंबळे, राहुल द्रविड, सचिन तेंडुलकर, विनू मंकड, सचिन तेंडुलकर, डायना एडुलजी आणि विरेंद्र सेहवाग या भारतीय खेळाडूंना आयसीसीच्या हॉल ऑफ फेममध्ये जागा मिळाली आहे.

इंग्लंडचा माजी कर्णधार कूकने १६१ कसोटी सामन्यांमध्ये ४५.३५ च्या सरासरीने १२,४७२ धावा केल्या आहेत. तसेच ९२ वनडेत ३६.४० च्या सरासरीने ३,२०४ धावा केल्या आहेत. तो ४ आंतरराष्ट्रीय टी२० सामने खेळले असून ६१ धावा केल्या आहेत. तो सर्वाधिक सलग १५९ कसोटी सामने खेळला आहे. तो इंग्लंडचा सर्वाधिक कसोटी धावा करणारा जो रुटनंतरचा दुसऱ्या क्रमांकाचा खेळाडू आहे. त्यानेही हॉल ऑफ फेममधील समावेशाबाबत आनंद व्यक्त केला आहे. दक्षिण आफ्रिकेच्या एबी डिविलियर्सची कारकीर्दही बहारदार ठरली. त्याने ११४ कसोटी सामन्यांमध्ये ५०.६६ च्या सरासरीने ८,७६५ धावा केल्या आहेत.



## राष्ट्रीय अंध क्रिकेटपटू दिनेश पाडळे याचा खास सत्कार

**पुणे :** कोकणस्थ परिवार पुणे चे वतीने १५ ऑक्टोबर जागतिक अंध दिन निमित्त राष्ट्रीय अंध क्रिकेटपटू दिनेश पाडळे याचा खास सत्कार अंध क्रिकेट मधील वर्ल्ड चॅम्पियन अमोल कर्चे यांच्या हस्ते पंडित नेहरू स्टेडियम पुणे येथे करण्यात आला. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ क्रीडा संघटक सुनील नेवरेकर होते . दिनेश पाडळे हा मूळचा औरंगाबाद येथील रहिवासी असून त्याने दिल्ली, उत्तराखंड येथील अंधांचे राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धांमध्ये भाग घेतला आहे .सध्या तो स.प. महाविद्यालयात प्रथम वर्ष बी.ए .करत आहे याशिवाय तो सध्या पाऱ्या ओलंपिक ची तयारी करीत आहे. चंद्रकांत खराटे यांनी स्वागत केले सचिव पराग गानू यांनी प्रास्ताविक केले. तर एडवोकेट दिनकरराव शिंदे यांनी उपस्थित त्यांचे आभार मानले. अक्षय पवळ ,संकेत शर्मा यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांची क्रीडा व युवक सेवा आयुक्तपदी बदली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांची क्रीडा व युवक सेवा आयुक्तपदी बदली करण्यात आली आहे. शिक्षण आयुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार मात्र सूरज मांढरे यांच्याकडेच ठेवण्यात आला आहे. याबाबतचे आदेश राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने काढले आहेत.

शिक्षण आयुक्तपदाचा सूरज मांढरे यांचा अडीच वर्षांचा कालावधी पुर्ण झाला आहे. मांढरे यांनी या कालावधीत शालेय शिक्षण विभागाचा चेहरामोहरा बदलण्याच्या दृष्टीने नाविन्यपुर्ण उपक्रम राबविण्याला सतत प्राधान्य दिले आहे. कामचुकार व भ्रष्ट अधिकारी, कर्मचारी यांना वठणिवर आणण्यासाठी प्रयत्न केले. भ्रष्ट कारभाराबाबत तक्रारी असलेल्या राज्यातील सुमारे ४० अधिकाऱ्यांची खुली चौकशी करण्याची मुभा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला दिली. यामुळे काही लाचखाऊ अधिकारी गोत्यातही सापडले.

मांढरे यांनी पवित्र पोर्टल मार्फत पारदर्शकपणे शिक्षक भरतीला प्राधान्य दिले. राज्यातील अनधिकृत शाळांवर कारवाईचा धडाकाही



लावण्यात आला. शाळांच्या गुणवत्ता सुधारावी व पायाभुत सुविधांमध्ये सुधारणा व्हावी यासाठी त्यांनी उत्तम उपक्रमाची आखणी करुन त्याची अंमलबजावणीही केली. अधिकारी यांना शाळा भेटीची सवयही लावण्यात आली.

शिक्षण विभागातील कामे जलद गतीने मार्गी लागावीत यासाठी सेवा हमी कायद्याची अंमलबजावणीही करण्यात आली. आवक-जावक प्रणालीत पारदर्शकता आणण्यासाठी संगणक प्रणालीचा अवलंब करण्याबाबत मांढरे यांनी सतत आग्रह धरला आहे. शैक्षणिक दिनदर्शिकाही काढण्यात आली. अधिकारी यांना दैनंदिन कामकाजाच्या नोंदी करण्यासाठी डायरी लिहिण्याची सवयही अधिकारी यांना लावण्यात आली. अधिकारी, कर्मचारी यांच्या बदल्या, पदोन्नत्यांनाही प्राधान्य दिले. मांढरे यांना डिसेंबर २०२५ मध्ये सचिव पदी पदोन्नतीही मिळणार आहे.

शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांची क्रीडा व युवक सेवा आयुक्तपदी बदली करण्यात आल्याचे आदेश सामान्य प्रशासन विभागाचे सहसचिव प्रशांत साजणीकर यांनी सोमवारी (दि.१४) जारी केले आहेत. त्यांना नवीन पदाचा कार्यभार त्वरीत स्विकारावा लागणार आहे. पुढील आदेश होई पर्यंत शिक्षण आयुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभारही धारण करावा, असे आदेशात नमुद करण्यात आले आहे.

## “हरमनप्रीतच्या जागी नवा कर्णधार नेमण्याची योग्य वेळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आयसीसी महिला टी-२० विश्वचषक २०२४ मध्ये भारतीय संघाची कामगिरी फारच



साधारण राहिली. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने प्रत्येक विभागात सर्वसाधारण कामगिरी करत चाहत्यांना निराश केले. भारतीय संघाची फलंदाजी तर फसलीच पण क्षेत्ररक्षण करताना संघाने अनेक साधे झेलही सोडले. महिला विश्वचषक जिंकण्याचे स्वप्न घेऊन आलेल्या भारतीय संघाची सुरुवात खराब झाली आणि परिणामी भारताला विश्वचषकातील गट टप्प्यातून बाहेर पडावे लागले.

भारतीय संघाला टी-२० विश्वचषक २०२४ मध्ये पहिल्याच सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. यानंतर भारतीय संघाने पाकिस्तान आणि श्रीलंकेविरुद्ध विजय निश्चितच नोंदवला, मात्र त्यानंतर एका महत्त्वाच्या सामन्यात संघाला ऑस्ट्रेलियाविरुद्ध पराभवाला सामोरे जावे लागले. टीम इंडियाने ऑस्ट्रेलियाविरुद्ध जिंकत असलेला सामना गमावला.

### आठवी एसएनबीपी अखिल भारतीय हॉकी स्पर्धा; अंतिम फेरीत आर्मी स्पोर्ट्स कंपनीवर विजय

## राउंड ग्लास अॅकॅडमीला विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राऊंड ग्लास अकॅडमीने शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी-म्हाळुंगे येथे झालेली आठवी एसएनबीपी अखिल भारतीय मुलांची (१६ वर्षांखालील) हॉकी स्पर्धा जिंकली. गतवर्षी तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागलेल्या राऊंड ग्लास अकॅडमीने अंतिम फेरीत आर्मी स्पोर्ट्स कंपनी, बंगळूरवर ४-१ असा विजय मिळवला.

दोन्ही संघांनी सावध सुरुवात केली तरी अर्शदीप सिंगने (१७') पेनल्टी



कॉर्नरचे गोलात रूपांतर करताना राऊंड ग्लास अकॅडमीला सुरुवातीलाच आघाडी मिळवून दिली. तीन मिनिटांच्या फरकाने अनुराग सिंगने (२०') आणखी एका पेनल्टी कॉर्नरच्या जोरावर संघाची आघाडी वाढवली.

उत्तरार्धाच्या सुरुवातीला अर्जुनच्या (३२') मैदानी गोलच्या जोरावर आर्मी बॉईज स्पोर्ट्स कंपनीने प्रतिस्पर्ध्यांची आघाडी थोडी कमी केली. मात्र, अर्जनदीप सिंग (४२ व्या) आणि वरिंदर सिंगने (५७'-पेनल्टी स्ट्रोक) प्रत्येकी एका गोलची भर घालताना राऊंड ग्लास अकॅडमीला ४-१ असे आघाडीवर नेले आणि जेतेपदावर शिक्कामोर्तब केले. राऊंड ग्लास अकॅडमीने सर्व आघाड्यांवर सुरेख खेळ करताना प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व राखले. विशेषतः सेट-पीसमध्ये उत्कृष्ट प्रदर्शन करताना पेनल्टी कॉर्नरच्या माध्यमातून दोन आणि पेनल्टी स्ट्रोकद्वारे एक गोल केला. आर्मी बॉईज स्पोर्ट्स कंपनीकडून काही चांगल्या चाली रचल्या गेल्या. मात्र, प्रतिस्पर्ध्यांच्या आक्रमणाची ते बरोबरी करू शकले नाहीत. प्ले-ऑफमध्ये रितू राणी अकॅडमीला एकतर्फी लढतीत ४-२ असे हरवत ध्यानचंद अकॅडमीने तिसरा क्रमांक मिळवला. योगेशचे (२२', २४') दोन तसेच तुषार शर्माच्या (३०') एका गोलच्या आधारे त्यांनी मध्यंतराला ३-० अशी मोठी आघाडी घेतली. उत्तरार्धात रितू राणी अकॅडमीकडे संजोत सिंग (३८') आणि नवप्रीत माहेने(४२') चार मिनिटांमध्ये दोन गोल करताना प्रतिस्पर्ध्यांची आघाडी ३-२ अशी कमी केली. मात्र, खेळ संपायला काही मिनिटे शिल्लक असताना रवी राजभरने (५८') पेनल्टी-कॉर्नरवर गोल केल्याने ध्यानचंद अकॅडमीने ४-२ अशा फरकाने बाजी मारली. #रा